प्रकरण २

chapter-2

# राजन गवस यांच्या कादंब-यांचे स्वरुप

प्रकरण २:

# राजन गवस यांच्या कादंब-यांचे स्वरुप

अ) कथानक विचार

आ) पात्र विचार

इ) नायक विचार

ई) निवेदक विचार

# प्रकरण २: राजन गवस यांच्या कादंब-यांचे स्वरुप

या प्रकरणात राजन गवस यांच्या कादंब-यांचे स्वरुप पाहताना कथानक, पात्रे , नायक आणि निवेदक यांचा विचार केला आहे

## अ) कथानक विचार

येथे राजन गवस यांच्या कादंब-यांच्या कथानकाचा विचार केलेला आहे.'चौंडकं' ही गवस यांची पहिली कादंबरी ही एक वेगळ्या विषयावरची कादंबरी वाचकांना चतनप्रवृत्त व अंतर्मुख करणारी आहे. ही कादंबरी तळागाळाच्या समाजाची स्पंदने टिपणारी, वेगवेगळ्या प्रकारच्या जीवनजाणिवा प्रकट करणारी, उपेक्षित - दुर्लक्षित जीवनानुभव रेखाटणारी असून तिचा आशय सामाजिक स्वरुपाचा आहे. कादंबरीची अर्पण पत्रिका वेगळी आहे.... "भंडारामाखल्या कपाळाखाली ठुसठुसणा-या वेदनाग्रस्त रेषा सांभाळत डोंगराची वाट चालणा-या असंख्य देवदासींच्या चौंडक्यांतून फुटणा-या हुंदक्यांना..." त्यामुळे ती आशयनिष्ठ झाली असून त्यात विषयानुरूप औचित्य लेखकाने साधले आहे. सामान्यत: अर्पणपत्रिका वैयक्तिक स्वरूपाची असते. परंतु येथे राजन गवस यांनी तिचे तसे स्वरूप बाजूला सारून टाकलेले दिसते व एका विशिष्ट समूहाला त्यातील दु:खाला ती अर्पण केलेली आहे.

'चौंडकं' ही कादंबरी म्हणजे एका देवदासीच्या कर्मकहाणीचा रूपबंध, प्रत्ययकारण आणि अर्थगर्भ असा, आकृतिबंध आहे. या कादंबरीची मांडणी, आशय, अभिव्यक्ति ही लक्षणीय आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. डॉ. मदन कुलकर्णी लिहितात, " 'चौंडकं' कादंबरीत तसे व्यक्तीला प्राधान्य नाही.प्राधान्य आहे देवदासीग्रस्त व्यक्ती आणि त्या सभोवतीच्या अंधश्रध्द समाजाला. ख-या अर्थाने ही समूहचित्रणात्मक कादंबरी आहे.तरीही हे समूहचित्रण काही आधार पात्रांच्या व्दारे आलेले आहे." (१)

ह्या  कादंबरीची मांडणी चार विभागात केलेली आहे. सुबाना आणि बायजा ह्या शेतकरी दांपत्याची मुलगी 'सुली' हीच या कादंबरीची कथानायिका आहे. बरेच दिवस ती आंघोळ करत नाही त्यामुळे या सुलीच्या केसांचं पिंजार होते. त्यामुळे तिच्या डोक्यात केसाच्या जटा वळतात. वेणी घालताना जेव्हा बायजाला हे कळते, तेव्हा मात्र घरात सगळेजण अस्वस्थ होतात. यल्लम्मा देवीचे हे बोलावणं टाळण्याची कोणीच हिंमत करू शकत नाही. सुरवातीला सुबाना या सगळ्यांचा विरोध करतो. त्यासाठी घरात म्हातारी आई, बायको बायजावर यांच्यावर चिडतो, वैतागतो, त्याचा विरोध करतो पण त्याचे काही चालत नाही. लोकमानसाच्या श्रद्धेपुढे त्याला मान तुकवावी लागते. शेवटी 'देवी' घरात येतात आणि 'सुली' देवदासी बनते.

आईच्या दरबारी ऽऽऽ लेक जल्माची बांधली.... परसूदेवाच्या शपथीनं – बया डोंगराची जहाली!...' हे कथासूत्र कादंबरीच्या या पहिल्या भागाचे आहे. या पहिल्या भागामध्ये निवेदन एकपदरी, सरळ अशाभाषाशैलीत असल्याने ते प्रवाही आणि प्रतितीक्षम झाले आहे. तर पुढे जाता हळू हळू हे कथानक अधिकाधिक पीळदार, नाट्यमय प्रत्ययकारी बनत जाते.  या कादंबरीची मुख्य व्यक्तिरेखा सुली हिचे यल्लमाच्या साक्षीने देवाशी लग्न लावून दिले जाते आणि तिला देवदासी बनविले जाते. यामुळे तिचं सगळं आयुष्यच बदलते, देवदासीपण वाटयाला आलेल्या सुलीच्या व्यथा, वेदनांचे हुंकार आणि उसासे ही अधिक उत्कटतेने आलेले दिसतात. या देवदासी, जोगतिणीच्या –हालअपेष्टांचे त्यांच्या मानसिक, वैचारिक घालमेलीचे, ओढाताणीचे चित्रण यामध्ये आलेले आहे. देवदासी झालेल्या सुलीच्या दैनंदिन जीवनक्रमात बदल होत जातो. या देवदासीच्या जीवनमानात होणारी मानहानी, तिच्या आईचा, आजीचा आजार, या आजाराचा तिच्या 'देवीपणाशी' जोडला जाणारा संबंध, तारूण्यसुलभ सुलीचे वयात आल्यावर गावातील बबन्यावर प्रेम जडते. सुली बबन्या यांच्या प्रेम प्रकरणाची चाहूल गावात लागते. कासळ्याची लक्ष्मी बायजाला म्हणते, "बघा बाई ऽऽ, आताच सुलीला  खरं जपाय पायजे. कुठं तरी पाय घसरंल. तिच्यावर नजर ठेवाय पायजे.न्हाईतर संगतीनं संगत वाढत जातीया. त्यातनं कायतरीच

निपाजतंय...आतापास्नं ठोका धरला तर पोरगी घरच्या अब्रूला सांभाळंल. न्हाईतर ....पोरगी म्हणजे काचेचं भांडं "(पृ.१२०) या शब्दांमुळे बायजा सुलीवर लक्ष ठेवायला लागते. ती नव–याला म्हणते,

" सुलीचं मला खरं वाटत न्हाई ऽऽ,.... कुठंतरी पाय घसरंल हेचंच भ्या वाटाय लागलंय ऽऽ "( पृ.१२१)

तरूण सुली अनैतिक मार्गावर जाईल याची धास्त घेणारी बायजा मात्र लहान सुलीला जोगतीण करताना मात्र नशिबावर सोडून देते. तेव्हा बायजा सुलीच्या भविष्याच्या काहीच विचार करत नाही. लहान सुलीला देवीला सोडण्याचे नक्की झाले. बायजाचा भाऊ तुका विचारतो,"खरं त्यात पोरगीच्या बाजूनं तुम्ही काय विचार केलाय काय?' तुका गंभीरपणे बोलला आणि बायजा दचकली.पोरगीच्या बाजूनं आपूण काय विचार करायचा? ती स्वत:च लहरीतच वाहत गेली. "(पृ२७)

त्यातून तिच्या वाटयाला गरोदरपण येते. अशावेळी गावातील शेवंता जोगतीण सुलीची चौकशी करते. "आनी वाढल्यालं प्वॉट घिऊन गावातन फिरणार? आईबाबा जगतील असं वाटतंय व्हय ग ऽऽ ? "तेव्हा सुली म्हणते,

"घरातनं भाईर काढतील! मलाबी आता त्येच पायजे हाय. जीव खराशीला आलाय ग ऽऽ "

" खुळी आहेस लेकी... आपन देवाच्या रांडा ऽऽ आपल्या बरबर संसार कोण करील?आसलं खूळ काय धरू नगस. सरळ मोकळी हो जा ऽऽ " असे शेवंताक्का सांगते. (पृ. १४४) बबन्या घर करून देतो म्हणालाय हे सुलीचे म्हणणे शेवंताला पटतच नाही, आणि ह्या अपमानास्पद स्थितीचा सुबाना आणि बायजा धसका घेतात. या मध्ये बायजा ह्या मानसिक धक्कयामुळे मृत्यू पावते.अशावेळी सुली स्वत:ला आईच्या मृत्युचे कारण मानते आणि या दु:खमग्न स्थितीतून ती देवीचा करंडा मोडून टाकते. या स्थितीमध्येच ती एका मुलीला जन्म देते.

मेहता मराठी ग्रंथ जगत यामध्ये संपादक लिहितात, "अशी या सुलीची कहाणी,

तिची जट वाढणे, तिला देवाला सोडा असे आक्कूबा जोगतीणी ने सुचवणे, तिचे देवाशी लग्न लागणे, तिने चौंडकं घेऊन जोगवा मागणे, नाचगाण्याचे कार्यक्रम करणे, आणि तारूण्यासुलभ भावनांमुळे कोणाशी तरी घसट वाढून पोट वाढणे .... हा सगळा देवदासीच्या जीवनाचा भोग राजनगवस या कादंबरीत उभा करतात, सुली, इतर जोगतिणी त्यांच्या श्रद्धा अंधश्रद्धा यांच्या समजुती, त्यांच्यातील कला, पुरूषाकडे पाहण्याची दृष्टी,समाजाची दृष्टी.हे ही त्या ओघात सांगितले जाते. हे सारे विलक्षण अस्वस्थ करणारे आहे. मनाला यातना देणारे आहे." (२) यातून आपल्या समाजात आजच्या आधुनिक युगातही अनेक अंधश्रद्धा, दुष्ट रूढी, परंपरा, चाली रीतीचे प्रस्थ दिसून येते. देवदासी, जोगतिणीची ही चाल अशीच एक घातक, दुष्ट परंपरा आहे. केसात जटा आल्या म्हणजे यल्लमा देवीचे बोलावणे आले. असे समजून अनेक लोक आपल्या मुली मुले देवीला सोडतात. आणि ही देवीला सोडलेली मुलगी, मुलगा गावाला सोडलं अशीच समजूत सगळे करून घेतात. अशावेळी सुताराची तानू म्हातारी सारख्या जोगतीण स्वत:चे सत्त्व जपून जगणा-या ही असतात. तर फुलासारख्या जोगतिणी झुलवा लावून ही कुणा एका बरोबर राहून जीवन न जगता गावभर हिंडत असते, त्यामुळे गावातील लोकांची जोगतिणीकडे पाहण्याची दृष्टी बदलू लागते. त्यातूच 'सुली' सारख्या देवदासीचे जीवन किती अवघड होत जाते. याचे चित्रण 'चौंडकं' मध्ये आलेले आहे. " 'चौंडकं' म्हणजे देवदासीच्या काखेत असणारे एक वाद्य असून त्या चौंडक्यातून निघणारे स्वर हे हळवे असून मनात रूतून बसणारे असतात. हे स्वर त्या देवदासीचे दु:ख आणि व्यथा व्यक्त करत असतात. या देवदासीच्या व्याकुळ अशा भावना, दु:खी अशा मन:स्थितीचे दर्शन या चौंडक्याच्या आवाजातून घडत असते." असे डॉ. मदन कुलकर्णी लिहितात.(३)

या कादंबरीचा प्रारंभ व शेवट हा परस्परानुंबंधित असून कथानकाशी संपूर्ण जोडला गेलेला आहे. ही कादंबरी म्हणजे देवदासीच्या वेदनांची, भावनांची, वासनांची, मन:स्थितीचे प्रत्ययकारी चित्रण आहे. चौडकं बद्दल प्रा.एस. एम्. कानडजे लिहितात, "लहानपणी

बाहुला बाहुलीच्या लग्नात नाव न घेता पळून जाणारी 'सुली' पुढे जीवनापासून ही पळून जाते, हे अर्थपूर्ण, उचित आहे." (४)

खरे पाहता अभ्यासाचे हे मत एकांगी असे आहे, हे लक्षात येते.कारण लहानपणी बाहुलाबाहुलीच्या लग्नात पळून गेलेली सुली,जगण्याला सामोरी जाणारी आहे. देवदासी बनवताना ती लहान होती. तेव्हा कसलाच प्रतिकार करण्याची सुजाणता तिच्याजवळ नाही, पण देवदासी झाल्यावर बबन्यापासून दिवस गेल्यावर,सर्वांनी नको म्हणत असताना आपला गर्भ वाढविण्याचा ती निश्चय करते. सुली घरातून निघून जात नाही, तर आईवडिलांनी तिला मामाकडे पाठवली आहे.

कादंबरीत या मुख्यकथानका सोबत उपकथानके अशी नाहीत.परंतु समूहचित्रणातून,मग ते उच्चवर्णीय घोरपडे असोत की बहुजनसमाजातील खरंदाळ असोत.या प्रकाराच्या लहानलहान व्यक्तिचित्रणातून समाजातील अंधश्रध्देतून,धार्मिक मान्यतेतून होणारी शोषणप्रक्रिया चित्रित केली जाते.कथानक विचार बहुतांशी एकाच केंद्रावर राहिल्याने सुलीच्या व्यक्तिरेखेद्वारे तिच्या जगण्यातील प्रसंगानुरोधाने कथानकाला गती मिळत राहते.

## ❖ भंडारभोग

आजच्या प्रगत, विज्ञान युगातही आपला समाज अज्ञान, अंधश्रद्धा यांच्यात गुरफटलेला आहे. जोगते आणि जोगतिणी हे आपल्या समाजाचाच एक भाग असूनही रूढी परंपरेमुळे ते वेगळे झालेले दिसतात. आपल्या समाजातील अनेक वाईट चालीरीत, रूढी पैकीच एक अनिष्ट रूढी म्हणजे देवदासीची पद्धत. या वाईट परंपरेचे बळी म्हणजे जोगतिणी आणि जोगते. अजूनही भारतातील अनेक ग्रामीण भागात असे, देवीच्या नांवावर बळी घेतले जात आहे. या जोगत्यांचं जीवन तर देवदासीपेक्षाही भयानक असते. देवदासीही झुलवा लावून त्या पुरूषाबरोबर राहू शकते. एखाद्या पुरूषाची रखेली म्हणून राहू शकते. ती मृत्यु पावली तरी तिच्या प्रेताला खांदा देण्यासाठी माणसेही जमतात. परंतु जोगत्याच्या नशिबी यातील काहीच नसते. असा हा जोगत्यांचा पंथ म्हणजे आपल्या समाजाच एक

लहान असा भाग आपल्या समाजातील अनिष्ट रूढीच्या पाशात अडकलेला आहे. हे जोगते म्हणजे पुरूष असून हे बाईपण ज्याच्यावर लादलं गेलं आहे.

'भंडारभोग' बद्दल डॉ. मदन कुलकर्णी लिहितात, "भंडारभोग ही देवदासी यल्लमा प्रथेतील जोगते जीवनावरील कादंबरी! कुठल्यातरी निमित्ताने एखाद्या मुलाला यल्लमाच्या डोंगरावर जोगता म्हणून सोडले जाते आणि त्याच्या जीवनाची त-हाच बदलून जाते पुरुषासारखा असूनही त्याला स्त्रीवेष धारण करावा लागतो.स्त्रीसारख्या भाषेत तो बोलू लागतो.कधी कधी त्याचे पुरुषत्वही नष्ट झाल्याचे प्रकार क्वचित घडतात.असे होणे म्हणजे देवीची कृपाच होय असे मानले जाते.पण ह्यामागे मानसिक परिणामातून घडलेली शारीरिक विकृती हेच प्रमुख कारण असावे.यल्लमा पंथातील ही दुसरी विकृतीच होय.देवाला वाहिलेल्या मुलाची सेवा यल्लमाला चालत नाही.म्हणून मग या मुलाने पुरुषाने स्त्रीवेष धारण करण्याची कल्पना आली असावी.पण अशा या मुलाची/पुरुषाची मानसिक अवस्था समाज विचारात घेत नाही. कधी कधी तर समाजाच्या विकृतीलाही त्यांना बळी पडावे लागते,असे दिसून आले आहे. 'नरेच केला हीन किती नर' याचा प्रत्यय ही कादंबरी वाचून आल्याशिवाय राहणार नाही.पुरुष जोगत्याच्या जीवनावरील ही एकमेव कादंबरी आहे,हे ही महत्त्वाचे!"(५)

'भंडारभोग' मध्ये तायाप्पा या, जोगत्याच्या जीवनाची कहाणी असून लहानपणी तो अतिशय आजारी पडतो. तेव्हा देवीची पूजा केली नाही, देवीच्या भंडा-याचा अपमान केला म्हणून आजारी पडला असे मानले जाते आणि तानू जोगतीण, शेवंता जोगतिणी कडून तायाप्पा बरा करायचा असल्यास त्याला देवीला सोडावे लागेल असा आग्रह केला जातो. तेव्हा तायाप्पाची आई कल्लव्वा ही तयार होते आणि घरातल्या मंडळीचा त्यासाठी होकार मिळविते. तो बरा झाला तर त्याला देवीच्या सेवेला सोडू असा नवस त्याची आई बोलते. आणि त्या प्रमाणे एक मुहूर्त काढून तायाप्पाला देवीच्या सेवेला सोडले जाते. या अशा जोगत्यांनी दररोज देवदासी बरोबर देवीच्या स्तुतीची गाणी गात गावभर फिरायचे आणि गावातील लोकां द्वारा मिळालेल्या त्या धान्यावर उदरनिर्वाह करायचा. इतकेच नाहीतर

जोगत्यांना त्यांचा वेषही स्त्रीप्रमाणेच करावयाचा असतो. तसेच सतत जोगतिणी बरोबर राहून त्यांच्यात ऊठबस केल्याने हे जोगते देखील पुरूष असूनही स्त्रीप्रमाणेच वागू, बोलू लागतात. एकमेकांशी बोलताना स्त्रीलिंगी उल्लेख करू लागतात. समाजही त्यांना पुरूष मानगत नाही. त्यांच्या वाटयाला फक्त अवहेलना आणि दु:खच येते, जोगता झाल्यावर त्याला अर्धी बाई, झालाय असे लोक हिणवतात.

'भंडारभोग' मध्ये तायाप्पा 'जोगता' होतो आणि हळूहळू त्या जगामध्ये गुरफटला जातो. त्याला या पंथाचे नियम पाळण्याचा आग्रह केला जातो. ज्यामुळे हळू हळू तायाप्पा जोगत्यांच्या पंथात स्वत:ला सामील करून घेतो. त्याचे हे जोगतेपण त्याला सर्वसामान्य अशा जगण्यापासून दूर नेत एक अशा वाटेवर घेऊन जाते की, ज्यावाटेवरून मागे कधीच फिरता येत नाही. या अशा वाटेवरून पुन्हा मागे न फिरता निमूटपणे तायाप्पाला चालावे लागते. ही वाट भंडा-यानं पिवळीशार झालेली असते; ज्याच्यावर चालताना भविष्यही गहाण ठेवावे लागते. अशा या वाटेवर तायाप्पाला त्याची आईच ढकलून देण्यास कारण होते. तायाप्पाची आई कल्लव्वा ही मात्र या अंधाराकडे नेणा-या या वाटेवर तायाप्पाला ढकलताना त्याच्या भविष्याचा किंचितही विचार करत नाही.

अशा प्रकारे जोगतेपण लादलेला तायाप्पा हा विचार करू शकत असतो, कारण जोगते होण्याआधीचे जीवन, तेव्हाची मोकळी हवा असलेलं जग त्याला माहीत असतं; त्यामुळे तो विचार करू लागतो. तेव्हा मात्र त्याला सांगितलं जात "ह्ये जलमच बिघाडलाय म्हणायचा, कशाच कायबी मनात आणायच न्हाई... रातीला झाल्यालं दिसाला तरकत ठेवायचं न्हाई, दिसाला घडल्यालं रातीला मनात घोळवायचं न्हाई..... तरच जगाय व्हईल. न्हाईतर फुकापासरी मरशील...."( पृ.१४१)

या कादंबरीमध्ये तायाप्पाचे भावविश्व हे तीन टप्यांमध्ये विभागलेले दिसून येते. ते म्हणजे तायाप्याचे जोगता होण्याअगोदरचे जीवन, त्यानंतर जोगता झाल्यानंतर चौंडक्या, मेळे, जोगतिणी यामध्येच व्यापलेले जीवन आणि नव्या जीवन जाणिवा देणारे शिकलेल्यांचे सुशिक्षितांचे जीवन अशा तीन जीवन जाणिवांमधून तायाप्या वाटचाल करतो.

कथानकाच्या गतीला या तीन अवस्थांनी वळणे मिळत कथानकात वाढ होते, व कथानकाला अनेक उपप्रवाह येऊन मिळतात. यामध्ये जोगता झाल्यावर तायाप्पा समाजापासून दूर होत जातो तर समाजाचीही त्याच्याकडे बघण्याची दृष्टी बदलते. गावातील लोक गावाची सोय केली म्हणून तायाप्पाच्या बापाला बोलू लागतात. कारण या जोगत्यांवर समाज बुळेपणाचा शिक्का मारतो, तसेच त्याला इतरांच्या विकृत वासनांची शिकार व्हावे लागते. सर्वस्व गमावून चुकलेल्या जोगत्याला जीवन जगताना आणि मेल्यावरही उपेक्षाच वाटयाला येते. कारण जोगता मेल्यावर त्याच्या तिरडीला माणूसच मिळत नाही. याचेही वर्णन कादंबरीत आलेले आहे.

जोगत्यांवर होणा-या शारीरिक आणि मानसिक अत्याचारांची समाजाला ही किंचित ही जाणीव नसते. जोगते "आरं ऽ ही भंडा-याची वाट अशीच हाय." असे म्हणत येईल ते भोग भोगत जगत जातात. दिपक घारे लिहितात, "राजन गवस यांनी तायाप्पाची होणारी घुसमट आणि भोगतालच्या जोगतिणीच्या व्यथा प्रभावीपणे मांडल्या आहेत. आशयाला भिडणारी थेट बोली, तपशिलांचा प्रतिकात्मक वापर आणि सूत्रमय वाक्ये यामुळे कादंबरीतले वातावरण जिवंत वाटते." (६)

'भंडारभोग' या कादंबरीतील कथानक म्हणजे जोगत्यांचे जीवन, देवदासी, मेळयातल्या जोगतिणी यांचे जीवन. हे समाजापुढे मांडणे हेच लेखकाचे ध्येय दिसते. कारण जोगत्यांचे विश्व हे परिणामकारकपणे प्रकट व्हावे म्हणून या कादंबरीमध्ये जोगत्यांच्या अनेक विधींचे सविस्तर चित्रण आलेलं आहे. या पंथाची दीक्षा घेण्यापासून ते या पंथामध्ये झालेल्या मरणापर्यंतच्या अनेक टप्यावरचे विधी यांचे चित्रण केलेले आहे, या विधीच्या चित्रणात अत्यंत बारकावा असल्याने हे चित्रण सूक्ष्म झालेले दिसते.

या कादंबरीमध्ये तायाप्पा हा मुख्य केंद्राशी असून त्याचे मनोव्यापार आणि त्याचे सामान्य जीवनापासून दूर होत जाणे. या सा-याचे सूक्ष्म चित्रण आलेले आहे. या मध्ये अनेक पात्रे असून कुटुंबातील शेतकरी समाज संस्कृती,सर्वसामान्य माणसांच्या जीवन धारणा भावाभावातील कलह,तंटे,आजारपण व त्यात होणारे खर्च,भोवतालच्या माणसांच्या

विविध प्रतिसादात्मक प्रतिक्रिया, जोगते व जोगतिणी यांचे विश्व, त्यातील वाद्य कला, लैंगिकता व लैंगिक अत्याचार शोषण प्रक्रिया परिवर्तनाचे विचार व त्यातील राजकारण यामुळे कादंबरीत मुख्य कथानकाला अनेक लहान लहान केंद्रांनी अनेक आयाम मिळत जातात. जोगते, जोगतिणी यांची आहेत. ज्यामुळे या कादंबरीमध्ये श्री राजन गवस यांनी 'जोगत्याच जिणं' सामूहिक पातळीवर केल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे या पंथातील या लोकांच्या जीवनाची समस्याही मांडलेल्या आहेत. कारण वास्तविकपणे जोगता हा पुरूष असूनही समाजातील रूढी परंपरा यांच्या नावाखाली दबून जातो. ज्यामध्ये त्याच्या सर्वस्वाचा नाश होतो. हे दु:ख सांगताना तायाप्पा म्हणतो, "मला देवाला सोडलं तवा सगळं व्हतं. अगदी तुमच्यावाणी! मागनं-मागनं सगळ्यानी जीवला किरीकात लावली. देवाच्या वझ्यानं मला पिडून खाल्लं, आनी माज्यातलं सगळं कव्वा संपलं माझं मलाच कळलं नाही.... परतेक जोगत्याचं असंच हाय.त्येना सांगूनबी पटत नाही. दाखवाय ईत न्हाई.... आमचं सगळंच फटकूरागत..." (पृ २१९)

अशा या 'भंडारभोग' बद्दल माधव कर्वे लिहितात, " 'भंडारभोग' ची भाषा किंवा त्याला लाभलेलं निश्चित असं प्रदेशिक परिमाण यामुळे ग्रामीण किंवा प्रादेशिक कादंबरीचीही बीज यात असलीतरी मुख्यत्वाने माणसांच्या एका उपेक्षित समूहाच्या दु:खाला वाचा कोडणारी कादंबरी म्हणूनच 'भंडारभोग' कडे बघावं लागेल."(७)

### ❖ धिंगाणा

राजन गवस यांच्या 'धिंगाणा' या कादंबरीपासून ग्रामीण भागातील रुढी परंपरेतून होणा-या शोषणाच्या सामाजिकतेबरोबर त्याला सद्य:कालीन राजकीय,शैक्षणिक भ्रष्ट अशा अवस्थेची आशयसूत्रे दिलेली आहेत. या अर्थाने या आशयविश्वाला एक वेगळा संदर्भ मिळतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ग्रामीण क्षेत्रात शैक्षणिक आणि राजकीय परिवर्तन होऊन सत्तेची आणि अर्थव्यवस्थेची केंद्रे बदलू लागली. आर्थिक विकासासाठी जवळचा मार्ग म्हणजे राजकारण आहे असे ग्रामीण परिसरातील लोकांना वाटू लागले. त्यामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभासारख्या निवडणुकां मध्ये यश

मिळवायला ग्रामीण माणूस प्रयत्न करू लागला. यामुळे राजकारणाचे सार्वत्रिकीकारण झाले. त्याचप्रमाणे शैक्षणिक साहित्यक क्षेत्रातही हे राजकारण शिरले. या अशा संक्रमित अवस्थेत तत्कालीन तरूण पिढी मात्र भांबावून गेली आणि दिशाहीन झाली. कारण या तरूण पिढीसमोर कोणतेही आदर्श, मूल्य नव्हते. तसेच परिश्रम करून ही त्याची सार्थकता नाही. या जाणीवेमुळे ही तरूण पिढी सैरभेर झालेली दिसते. ह्या शिक्षित पिढीचे चित्रण राजनगवस यांनी या कादंबरीमध्ये केलेले आहे. या कादंबरी मध्ये असलेली तरूणपिढी, तिची सैरभैर वृत्ती आपल्याला दिसते; जी ख-या अर्थाने एकूण भारतीय समाज व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करताना वाटते.

'धिंगाणा' या कादंबरीमध्ये ग्रामीण पातळीवरील चित्रण आलेले असून चेअरमन (संग्या) हे मुख्य पात्र आहे. चेअरमन हा खेडेगावात रहाणारा एक ग्रॅज्युएट झालेला बेकार तरूण आहे. त्याला नोकरी नसल्यामुळे घरात फुकटच खातो ही घरातल्यांची भावना असते. ज्यामुळे या चेअरमनला घरात पाय टाकताच जेवायला बसला की नोकरी नाही आणि घरात फुकटच खातो या बद्दलची बडबड ऐकावी लागत असते. खरे पाहता चेअरमन हा एक संवेदनशील, बुद्धिमान तरूण असून त्याला मूल्यनिष्ठतेने आयुष्य जगायचे असते. तेथे संवेदनाना बोथट करत जीवनात यश प्राप्त करण्याचा गुरूमंत्रच अन्य मुले प्राप्त करीत पुढे जात असतात, तिथे चेअरमन सारख्या तरुणांची शोकांतिका होत असते. याबद्दल अंजली कुलकर्णी लिहितात, "ही शोकांतिका तीनचार पातळ्यांवर घडत जाते. त्यातला पहिला खाजगी जीवनाचा स्तर असतो. पिढयानपिढया कुठल्याही विकसित जीवनाचा स्पर्श न झालेली परंपरा. या परंपरेत ग्रामीण भागात दलित जातीत जन्म घेणे इथून या शोकांतिकेला अप्रत्यक्ष सुरवात होते. कचाकच शिव्या घालणारे आईबाप (या तरूणांना वारसा मिळालाय तो तेवढाच) या आईबापांच्या सा-या आशा मुलाबाळांवर लागलेल्या, मुलगा कधी एकदा पोटापुरते शिकून पोटापाण्याला लागतोच याची घाई आईबापाना झालेली मुलाकडून त्यांच्या वास्तव अपेक्षा, परंतु मुलांच्याही स्वत: आयुष्याकडून काही अपेक्षा असतात त्यांच्या गावीही नसते. त्याला कसे कारकुनीत चिकटवण्यासाठी ते आतुर होतात

आणि त्याच्या गळयात ती मारण्यात यशस्वीही होतात." (८)

असा हा चेअरमन घरात शेतीच्या कामात मदतरूप होत असतो. त्याबरोबर पांग्या, बाबल्या यांच्या मदतीने गावातल्या भानगडी शोधून गावासमोर आणत असतो. त्यात गावचा आबा पाटील पांग्याला बेदम मारतो. तरीही चेअरमन चावडी जवळच्या पारावर बाबल्या शंकरदा ढोल्या, संब्या, जंब्या, किरवाड, शंकर, घुम्या या गावातील मित्र मंडळी बरोबर बसून गावाच्या राजकारणाच्या, सामाजिक हालचालीची चर्चा करत असतो. गावातल्या भोगनाळी लॉजवरही चेअरमन आणि बाबल्यांचा मुक्काम असतो. तिथे गावात घडणा-या राजकीय घटनांचा विचार करून त्याचे डावपेच नक्की केले जातात. त्यात गावाच्या डेरीमध्ये गणबाने पैसे खाल्लेले असतात अशी बातमी त्यांना लागते, तेव्हा त्याचा विरोध करायचा ते ठरवितात आणि त्याप्रमाणे गावाची ही तरूण मंडळी गणबा पाटील, हरबा झील, आबा पाटील या डेरीच्या डायरेक्टरांकडे खुलासा मागतात. तेव्हा ही नेतेमंडळी या तरूणांचा विरोध पाहून ही मिटींगच रद्द करतात. तेव्हा मात्र ही तरूणमंडळी अतिशय संतापून जाते. या संतापामागे बाबल्या, चेअरमन आणि मंडळीला गावाची आस्थाच वाटत असते.म्हणून बाबल्या म्हणतो,"संग्या ऽऽ आपल्या गावाचं कायं खरं न्हाई.....गाव पार बिघाडलं. जरा म्हणून बिघडायचं –हायाय न्हाई. गणबा,

ह-या आणि आबा गाव गिळणार. अरे ऽऽ ही रांडंची गरीबाला जगू देईना झालेत. मला सांग ह्या रांडंच्यानी आपल्या कळत्यापास्नं गावावर राज्य केलं. काय सुधारणा केली? गावात गटारं सुध्दा लोकांनी उपसून खाल्ली. तरी लोक गप्प. लोकं बी बाराबोड्याची. रांड्यास्नी शत्रू कोण कळत न्हाई. कळून तरी काय उपेग.ज्येच्या त्येच्या मागं पोट.पोटापुडं कुठलं आलंय गाव . आनि राजकारण.सकाळपास्नं रातीपर्यंत पोट.रातीला चोट. गावाला दुसरा उद्योगच न्हाई. कोण गावाचा विचारच करत न्हाई."(पृ.२७-२८) यातूनच गावात भ्रष्टाचाराची मुळे किती खोल गेलेले आहेत आणि हे सामान्य लोकांना कळत असूनही त्याचा विरोध करत नाहीत, याची खंत व्यक्त झालेली आहे.

गावपातळीवर चालणा-या राजकारणात जातियतेला दिले जाणारे महत्त्व आबा पाटिलाच्या संवादातून दिसते. आबा पाटिल बोलतो,"आर ऽऽ जातीचा पाटील हाय, तुमच्या सारख्या लिचडयाच्या तिडयाला ह्यो पट्टा बघणार न्हाई. एकेकाला व्हत्याचं न्हवतं करून ठेवीन," (पृ.३३) तसेच गावात पोलिस पाटिल म्हणून मागासवर्गीय ही अर्ज करू शकतात हे कळल्यावर मात्र गावात चर्चा सुरू होते, कारण पाटीलकीची मक्तेदारी गावातील दोन पाटलांच्या घराची असते. तेव्हा "म्हार गावचा पाटील? म्हणजे लेका गावाची अब्रूच की. म्हणून चेष्टा केलीती. जात बुडल्यागत वाटालती." (पृ.३७) असे गावातील सवर्ण मंडळीना वाटू लागते. तेथे गावात चेअरमन आणि मंडळी गावातील पुढा-यांवर जम बसवायला एक मागासवर्गीय तरूणाला अर्ज करायला लावतात.

या गावामध्ये दलित समाज मागासलेला असून तिथे शिक्षणाचा प्रवास न झाल्याने सगळी तरूण मुले अशिक्षित बेकार होऊन फिरत असतात. त्यांच्या गावातील मंडळी आपल्याला पाहिजे तसा उपयोग करत असतात. त्यातून ग्रामीण भागातील जातीयतेचे स्वरूप व प्रश्न ही दिसून येतात. त्याबद्दल मागासजातीचा गौत्या सांगतो, "तसं कसं हो ऽऽ आमाला कशाला पायजे तुमचे राजकारण? रोज उठून तुमच्या, न्हाईतर त्येंच्या बांधाला जायचं म्हटल्यावर आमाला तुमी बी तेवढंच आणि त्योबी तेवढाच की ..." (पृ.४१) त्याचप्रमाणे या राजकारणाचा या जातीचे लोक फायदा घेण्याचेही शिकलेले आहे. यावरून या जातीय राजकारणाचे स्वरूप आपल्याला लक्षात येते. त्याचप्रमाणे गावात रूढ असलेले विशिष्ट सामाजिक संदर्भ म्हणजे या कादंबरीतील 'संब्याचा मामाच लेकावळ्याचा' म्हणून दुय्यम दर्जाचा वंश सूचवला जातो.

त्याचप्रमाणे गावातील शाळामध्ये चालणा-या भ्रष्टाचाराचे वर्णनही आलेले आहे. गावातील शाळेचा काळू मास्तर हा शाळेच्या मुलांसाठीचे दूध गावातल्या गणबा पाटलाच्या घरी पाठवत असतो. हे गावाच्या तरूण मंडळीच्या लक्षात येते आणि ते याचा विरोध ही करतात. तर या मास्तरांविरूद्ध मुख्यमंत्र्याकडे अर्ज पाठविण्याची तयारी करतात. तेथे त्यांना जाणवत की याचा काही उपयोग नाही या तंत्रामध्ये वरपासून खालपर्यंत सगळे व्यवस्था

सडलेले आहे.

गावामध्ये पावसाळ्यात होणारा गोंधळ, शेतीच्या कामाची घाई, लावलेल्या पिकाची काळजी घेण्यासाठी, करावी लागणारी घडपड या सा-याचे चित्रण ही आलेले आहे. त्या बरोबर ग्रामीण जुन्या मूल्यांना अजूनही किती महत्त्व दिले जाते, याचे वर्णनही आलेले आहे. त्याचप्रमाणे गावात शिरलेल्या काही दूषणापैकीचा एक मटका लावण्याचा धंदा, दारूचे व्यसन यामुळे गावातील तरूणपिढी कशी भरकटत चालली आहे, याचेही चित्रण आलेले आहे.

खेडेगावातील सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे संदर्भ पुढील वर्णनातून मिळतात. गावात होणा-या लग्न प्रसंगी वरातीला असलेला बँड, लेझीम याचे गावक-यांना असलेले आकर्षण "वरातीला बेडकीहाळचा बँड हाय, आणि माद्याळचं लेझीम. वरातीत नाचायला बडयाच्या वाडीचा जोगता आणलाय." (पृ.६९) या घुम्याच्या शब्दातून दिसते. त्यावेळी गावातील चेअरमन, बाबल्या या तरूणांच्या मनातही लग्न करण्याची इच्छा जागृत होते. तर कुसाळ्याचा म्हातारा कसा दोन मुले असूनही एकटा राहतो. यातून गावातील सामाजिक प्रश्न मांडले जातात. संब्या तेल्या सारखे रेशनकार्डाचे दुकानदार कसे गावातील लोकांना त्रास देत असतात आणि महारवाडयातील लोकांच्या वाटयाची साखर हावबा झीलला देऊन भ्रष्टाचार करत असतात. येव्हा मात्र चेअरमन आबा पाटलाला म्हणतो, "मग सगळी गप्प बसत्यात म्हणून मीबी गप्प बसू? म्हाराच्या कार्डाची साखर तुमच्या घरला. म्हार गप्प. उरल्याली तांदळाची पोती वाण्याच्या दुकानाला जात्यात.... वाणी गप्प. लागवडीचा ट्रक माळाला उतरतोय. गाव गप्प म्हणजे कुणी काय बोलायचंच न्हाई?" (पृ. ८५) अशावेळी या सगळ्या घटना प्रसंगामध्ये चेअरमन हा पुढे असतो. अनेकवेळा या तरूणमंडळीना आबापाटलांसारखे मान देत असतात.

गावामध्ये शिकलेल्या मुलींबद्दल असलेले गैरसमज ही आलेले आहेत. तसेच मुली पाहण्याच्या प्रसंगी होणा-या प्रश्न उत्तराचे प्रसंगही आलेले आहे. त्याच बरोबर ग्रामीण भागात सामूहिक पातळीवर जगणे, लग्न, मरण चालीरीती यांना असलेले महत्व ही दिसून

येते. "सगळयांची हजेरी लागाय पाहिजे. चुलबंद म्हणजे चुलबंद. माणसं पेव फुटल्यागत. खरं एखाद्याच्यात जायचं नाही म्हटलं की, एक माणूस फिरकणार नाही. केल्यालं सगळं ढोरास्नीच घालाय पाहिजे. आयला सगळं विचित्रच." (पृ. १०४) या चेअरमनच्या संवादातून हे दिसते. गावात आनंदाच्या प्रसंगी मनोरंजनासाठी सिनेमाही दाखवला जातो.

त्याचप्रमाणे गावात या अशा सुधारणांबरोबर शाळेच्या मुलामुलीचे प्रेमप्रकरण ही सुरू झालेले दिसतात. तर ग्रामीण पातळीवर होणा-या उत्सवात चालणारे खेळ, स्पर्धा, धार्मिक मान्यता, त्यावेळचे जेवणखाण या सा-याचे वर्णन ही यामध्ये आलेले आहे. तसेच या ग्रामीण भागातील घरांची वर्णन, त्यांची बोली तेथे असणा-या जातीय व्यवस्था, लग्नपद्धती, राजकारण याचेही वर्णन प्रसंगोपात आलेले दिसते. याचा अनुभव जेव्हा चेअरमन आणि मित्र मंडळी किरवाडच्या मामाच्या गावाला चैताला जायचे ठरवतात तेव्हा येतो.

तसेच या अशा राजकीय, सामाजिक भ्रष्टतेच्या वातावरणात चेअरमन सारख्या तरूणांची मानसिक अवस्था विचित्र होऊन जाते. तो विचार करतो, "गावभर हिंडून सुद्धा उगच अस्वस्थ वाटाय लागलं... सारखं सारखं लांब कुठंतरी जाऊन गर्दीत घुसावं. कुणाला कुणाला आपली ओळख पटू नये. हे आसलं कायतरी मनात यायला लागलं. आसं कधी कधी होतंय. पण आजची अवस्था अगदीच वेगळी. असं का व्हावं ? हे कळत न्हवतं. पण आज जरा डोकं इस्काटलंत. एवढं मात्र खरं, म्हटलं आता सडगावाला गेल्याशिवाय डोकं ताळ्यावर येत न्हाई." (पृ.१२७) अशावेळी चेअरमन सारख्या तरूणांना एक बधिरपणा येऊन जातो.

गावातील निवडणुकांमध्ये जातीयतेला किती महत्त्व दिले जाते. तर आरक्षण पद्धतिमुळे मागासवर्गीयांना मिळणारे संरक्षण, स्त्रीवर्गाला मिळणारे प्रतिनिधित्व यांचा फायदा कसा घेतला जातो, याचे चित्रण ही आलेले आहे. त्यातही महार आणि मांग यांच्यात असलेल्या वैमनस्याचा फायदा गावातील सवर्ण कसा घेतात. हे ही दिसून येते.

या निवडणुकांमध्ये मात्र सामान्य माणसाची भूमिका गावातील म्हारत्यासारखीच

असते. तो म्हणतो, "ये बाबानुऽऽ तुमची निवडणूक आमी गरीब पोटभरून खाणार. कशाला पायजेत तुमची भांडणं? तुमी तसं काय समजू नका. मला तुमी बी तेवढंच. तेबी तेवढंच, तसा काय समज करून घीऊ नका."(पृ. १९५) याला कारण निवडणुकीत उभे राहणारे उमेदवार या प्रसंगी मोकळ्या हाताने दान करीत असतात. गणबा पाटील निवडणुकी सगळ्या गावाची हजामत फुकट करून घेण्यासाठी म्हारूती न्हाव्याला बसवतो तसेच आपल्या गल्लीच्या सगळ्या बायकांना बोलावून बायकोकडून खणनारळांनी ओटी भरायला लावतो. असे अनेक बक्षिसे यांची वाटप केली जाते. तरी या अशा पुढा-यांबद्दल गुंडयाची आजी विचार करत असते, "गावभर गुरवाईत फिरणा-या भाडयास्नी कोण भील रं? आनी सगळी लालघोटी कुत्री फिरल्यागत गल्ली गल्लीमनं फिरत असत्यात. ह्यास्नी काय आनु काय भीडा. फसलं द्दे-आरऽऽ ही कसली तुमची इलक्शन काय फिलक्शन... आमाच्या सात जन्मात माहीत नव्हती. कव्वातरी घोडी पाटील तराळ लावून शाळंवर शिक्का माराय बलवायचा झालं आमचं काम. आनी आता काय-तर हयो भाडया येतोय तवर त्यो भाडया जातोय. ह्यो त्येचं सांगतोय तर त्यो हेचं सांगतोय. दोनी बी निलाजरीच."(पृ.११६) अशा प्रकारे लोकांना राजकारणातला फोलपणा दिसून आलेला कळून येतो. तसेच राजकारणात जातीयतेमुळे पक्षाचे मूल्य विसरून ही पुढारी, सामान्य लोक जातीयतेला जास्त महत्व देतात. कारण चेअरमनला जेव्हा कळते की दादा मोरे असल्यानं पडला. बाबल्या पाटील असल्यानं आला. हे ऐकून हतबलच होतो.

चेअरमन सारखे तरूण जे रूढ चाकोरीबद्ध जीवन जगण्याला नकार देऊन एक विचारशील. क्रियाशील जीवन जगू इच्छितात,त्यांना आपल्या समाजात घडणा-या घटनांनी एकेक धक्के बसतात. त्यांना समाजातून, घरातून आलेल्या अनुभवातून त्यांची अवस्था दिशाहीन होऊन कुंठित होते. राजकारणामध्ये असलेले गुंते, मराठा जातीचे त्यात असलेले प्रभुत्व आणि वैयक्तिक,घरगुती खाजणी गोष्टींचा निवडणुकींवर होणारा परिणाम यासारखा बाबींचा विचार या कादंबरीमध्ये केलेला दिसतो.

## ❖ कळप

'कळप' या कादंबरी मध्ये राजन गवस समकालीन पर्यावरणात बदलत गेलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्राचा विचार केलेला दिसतो. या कादंबरीमध्ये रघू चिलमी हे मुख्यपात्र निवेदक म्हणून वाचकांपुढे येते. त्याच्या आसपास घडणा-या घटना त्याला भेटणा-या व्यक्ती यातून त्याला अनुभव येतो. 'धिंगाणा' पेक्षा यामध्ये अनेक व्यक्ती, घटना अधिक प्रमाणात सामावलेल्या दिसून येतात व त्यामुळे कादंबरीला अधिक भरीव स्वरुप प्राप्त झालेले आहे. या कादंबरीत ग्रामीण, निम शहरी असा तालुक्याचा परिसर आलेला आहे.

रघू हा गावात राहणारा तरूण असून शिकायला तालुक्यात जात असतो. त्याच्या निवेदनातून तत्कालीन ग्रामीण परिसरातील वातावरण दिसून येते. त्याच बरोबर आधुनिकतेमुळे गावात होणा-या सुधारणा, प्रगती यांच्या नांवावर चालणारा भ्रष्टाचार ही दिसून येतो. त्याच प्रमाणे ग्रामीण पातळीवर कौटुंबिक प्रश्नाची चर्चा करताना विभक्त कुटुंबामुळे घरात वाढलेले काम तसेच एकमेकांबद्दलचा वाढत चाललेला राग, व्देष यामुळे होणारे परिणाम ही सांगत असतो. उदा. "पाण्याच्या चार घागरीला तरी आईला मदत केली पाहिजे. म्हातारपणीही तिनं आम्हाला पाणी पाजायचं म्हणजे भयंकरच. पण दादा नोकरीला. माझं हे असं, पपीला सांगून उपयोग नाही. बाबा इनामदार. मग पाणी आणणार कोण? चुलते, आम्ही एकत्र होतो तेव्हा बरं होतं. चुलत्या चांगल्या धड्याकड्या. भसाभस पाणी वडायच्या. घर फुटलं आणि पाणीही फुटलं." असे रघू म्हणतो. (पृ. २८) तेव्हा शहरा प्रमाणे गावात सुरू झालेला विभक्त कुटुंब प्रथांचा संदर्भ कादंबरीत आलेला आहे.

तालुक्यात कॉलेजचे शिक्षण घ्यायला जातो आणि तेथील शिक्षणाची अवस्था पाहून मात्र रघू विचलित होऊन जातो. तेथे राहूनच गाव आणि शहर यामध्ये असलेले अंतर त्याला कळू लागते. रघू म्हणतो, "शेतक-याच्या पोरानं तुमच्यासारखा करिअरचा विचार करणं हेच मला भयंकर बेकार वाटतं. करिअर-बिरिअर भानगडीचा विचार शहरातल्या लोकांनी करावा. आम्हाला कशाला पाहिजे तसलं फालतू. आम्हाला त्यापेक्षा ब-याच

गोष्टी महत्त्वाच्या आहेत आणि कवितेचं म्हणशील तर मला कवितेपेक्षा जोगतिणी महत्त्वाच्या वाटतात." (पृ. ४८) जोगतिणीच्या पुनर्वसनाच्या कामातूनच रघूला साहित्य आणि प्रत्यक्ष जगत यांचा संबंध कळतो. त्याला जाणवते,"एक जोगतिण एक कादंबरी. जोगतिणीचे डोळे एक कविता. जोगतिणीचा देव्हारा एक नाटक. कशाला वाचायची पुस्तक? फक्त ही माणसं वाचता आली तरी चिक्कार!"(पृ.५१) आणि या अशा कार्यक्रमांचा फोलापणाही तो पाहू लागतो. त्याबद्दल तो सांगतो,"माझ्या डोक्यातून मेळावा जात नव्हता.मेळावा झाला म्हणजे काय झालं.त्यांची भाषण त्यांचे फोटो. बायका आल्या तशाच परत गेल्या की "(पृ.७४)

रघू कविता करत असल्याने नेहमी हुतात्मा पार्कवर साहित्यचर्चेत भाग घेत असतो. तेथे "सगळे पांगल्यावर सर म्हणाले,आपल्या साहित्याचे सगळे फॉर्मस् खरोखरीच उपरे झाले,आपलं असं काहीच नाही. कविता,कथा,कादंबरी,नाटक सगळंच उपरं. मी म्हणालो,ह्याला कारण आमची मातीपासून तुटलेली वाङ्मय संस्कृती. ग्रामीण,दलित वाल्यांनी खरं वास्तविक हे सगळं बदलायला पाहिजे होतं. म्हाराघरी गाणं होतं. त्याचा विचार दलित लेखकांनी केलाच नाही. उलट ते ब्राह्मणी कविता लिहून पुळचट विद्रोह व्यक्त करत राहिले आणि ग्रामीणवाले तर एकदम गांडू निघाले.

सर माझ्याकडं अविश्वासानं बघाय लागले. म्हणाले, हे तू नेमकं कशात वाचलास? च्या आयल्या,म्हणजे ह्या माणसालाही माझी गॅरंटी नाहीच. मग जोरात हसलो तर ते माझी समजूत काढाय लागले."(पृ.७०) असे मत रघू मांडतो. कथा, कविता याबद्दल साहित्य प्रकारांची चर्चा करीत असताना दलित साहित्य, ग्रामीण साहित्य याबद्दलचे असे विविध विचार ही तो सांगतो. त्याच्या मते साहित्यामधून तत्कालीन जीवनाचे संदर्भ व्यक्त होणे महत्त्वाचे असतात.

या कादंबरीमध्ये रघूची आई, बायना वहिनी, सतव्वा आणि इतर जोगतिणी या ग्रामीण स्त्रिया तसेच गौरी, गीता,सुलभा, अपर्णा संगवई सारख्या सुशिक्षित स्त्रिया आलेल्या आहेत.त्यामध्ये ग्रामीण स्त्रिया कशा समूहभावनेने जीवन जगत असतात, याचेही

चित्रण आलेले आहे, या स्त्रियांच्या जगण्यातून दिसणारी एक जिद्द त्यांना कुठल्याही परिस्थितीत साथ देत असते. उदा. बायना वहिनीच्या अनैतिक संबंधाबद्दल रघूची आई म्हणते, "तू कशाला कोण काय म्हणतय, काय करतंय करत बसतीस. तूला बरं वाटेल ते करायचं. रिकाम व्हयाचं. बोलणा–या रांडा–भाडयास्नी काय? आधीच जो भाड्या पदरात पडला तो म्हमईत आनी तू गावात. हीतं आला तर रोगात उलाथला. आवरायच आवरायचं म्हणजे मान्सानं आवरायचं तरी किती? ज्येच जळते त्येलाच कळतं. बघणा–या, बोलणा–याचं दुकतंय काय? " (पृ. ३४१) यावरून त्यांच्या ठिकाणी प्रसंगी नैतिकतेची स्वत:ची वैयक्तिक अशी कल्पना त्या स्पष्टपणे मांडताना दिसतात.

त्याचप्रमाणे रघू हा सुरेशशी ग्रामीण आणि शहरी संस्कृतीच्या अंतराबद्दल चर्चा करत असतो. सुरेशला शहरात जाऊन प्रगती करायची असते. यावरून गवस यांनी शहरीकरणात प्रत्येक गोष्टीचा विचार करताना करिअर सारख्या बाबतीची नोंद तत्कालीन पिढी कशी घेत आहे, हे दाखवून दिले आहे. रघू विचार करतो,"आपण शहराचाच विचार कराय लागलो की. म्हणजे शहर केंद्र आणि बाकीचा सगळा प्रदेश दुय्यम. च्या आयला, हे म्हणजे भयानकच. हे शहर आमच्या सर्वांगात मूळं पसरुन जगत राहणार आणि पुन्हा श्रेष्ठत्व टिमक्या मारणार.म्हणजे बांडगुळानं झाडावर साम्राज्य गाजवल्यातला परकार. मग त्याशिवाय सगळीकडं चाललंय काय?"(पृ.८३) त्याच प्रमाणे सुरेश, दिलावर सारख्या तरूणांद्वारे बेकार तरूणांची मानसिकता ही दाखवून दिली आहे. कारण या तरूणांकडे त्यांच्या पालकांचा पाहण्याचा दृष्टिकोन हा वेगळा असतो. कारण या आईबापाच्या आशा आपल्या या मुलांवरच असतात. तेव्हा मुलगा शिकून कधी नोकरीला लागतो याची त्याना घाई झालेली असते. तसे पाहिले तर यात काही गैर नाही, परंतु मुलाच्याही स्वत:च्या आयुष्याकडून काही आशा असतात. हे मात्र त्यांच्या लक्षात येत नसते. त्याला कसेही करून नोकरी लागली पाहिजे याची काळजी घेत असतात. तेव्हा हा प्रश्न ग्रामीण, शहरी सुशिक्षित, अशिक्षित श्रीमंत, गरीब या सा–यास्तरावरील कुटुंबामध्ये दिसून येतो. त्याला कारण हा दोष आपल्या परंपरेचा संस्कारांचा आहे. उदा. रघूला शाळेत क्लार्क म्हणून

नोकरी करण्याचा घरातून होणारा आग्रह. तर सुरेश, दिलावर सारख्याना नोकरी नसल्यामुळे मिळणारी उपेक्षा. यातून या समाजात तत्कालीन सुशिक्षित तरूणांना सहन करावा लागणारा मानसिक त्रास लक्षात येतो.

अशा या परिस्थितीमध्ये सुद्धा वेळप्रसंगी हे तरूण आपल्या चांगल्या आणि वाईट यांच्या कल्पना स्पष्ट करत नैतिक भूमिका घेतात. वेळ आली तर विरोधात उभी ही राहतात. उदा. साहित्य संमेलनामध्ये घोसरवाडकरसारख्या नेत्याचा अध्यक्ष म्हणून निवड करण्याचा रघू, दिलावर, शंकर सारखे ठाम शब्दात विरोध करून एक निश्चित निर्णय सांगून टाकतात.

कॉलेजमध्ये शिकत असताना, शाळेमध्ये क्लार्क म्हणून नोकरी करत असताना रघूला शिक्षणक्षेत्रातला भ्रष्टाचार, शिकण्यातला, शिकवण्यातला भंपकपणा पाहून शिक्षण क्षेत्राच्या या भ्रष्ट पद्धतीबद्दल राग येऊ लागतो. तर साहित्यक्षेत्रात होणा-या ग्रामीण दलित सुधारणेबद्दल असलेले गैरसमज वरपांगीपणा दिसून येतो. त्याचबरोबर रां.पी. सांळुखे, हाळदूळकर या साहित्य क्षेत्रातील व्यक्तिरेखेद्वारे साहित्य आणि जगणे यातील अंतर टोकाचे आहे याची जाणीव रघूसारख्या तरूणांना होते. या क्षेत्रात शिरलेल्या रोगट विकृती ही ती मंडळी दाखवून देतो. ते पाहून शंकर म्हणतो, "ह्या तुझ्या लेखकांपेक्षा गाढवंसुद्धा जातिवंत असत्यात, थू ऽऽत त्येच्या मायला! लेखकाचा धंदा करण्यापरास म्हशी फळवण्याच धंदा केलेला बरा. " (पृ. १५७)

त्याचप्रमाणे व्याख्यानाला गोविलकरसारखे लेखक येतात आणि त्यांचे चमत्कारिक वर्तन, वागणे, व्याख्यानाला गर्दी न झाल्याने या महाशयांचा होणारा संताप पाहून दिलावर म्हणतो, "इथं आपले मतभेद, सर; लेखकाचं व्यक्तिगत जीवन मांडत असलेल्या विचाराशी जुळतं असलं पाहिजे. लिहिणं जगणं. एकच असतं. त्यात फारकत कसली?" (पृ. १८३) नाहीतर कवीच्या लाळघोटपणा, संमेलनामध्ये स्वत:च्या लोकांना स्टेजवर संधी देण्यासाठी संयोजकांकडून केली जाणारी हुशारी, तसेच प्रकाशकांकडून पुस्तक प्रकाशनासाठी केले जाणारे लेखकांचे शोषण तर स्वत:च्या पुस्तकावर स्वखर्चाने चर्चासत्र घडवून आणून

सुरेशसारखे प्रसिद्धी मिळवू पाहतात. या अशा अनेक घटनातील खोटेपणा, दांभिकपणा पाहून रघू विचार करू लागतो. या सगळ्या विचारांनी त्याला वेडाचा झटका येऊन तो त्यांचे छापून आलेले सारे लेखन, लिहिलेले न्हाणीच्या चुलीत घालतो. आणि म्हणतो, " वास्तविक मी लेखन, चळवळ, वाङ्मयीन चळवळ, तात्त्विकता, नैतिकता असल्या फालतू लफड्यात पडायलाच नको होते. मीही माझा एक कळप केला असता तर दादाला विसरू शकलो असतो.महात्म्याला वंदन केलं असतं.पानक्याचा शिष्य झालो असतो. च्यायला चुकलंच!

जाऊ द्या, घडलं ते घडून गेलं. पण माझ्या मेंदूला कायमचंच भगदाड पडलं.

पण हे फक्त माझ्याबाबत घडलं का माझ्या पिढीबाबत हे समजण मात्र कठीणच." (पृ.३९५)आपल्या पिढीपासून,आपल्या आजूबाजूच्या समूहापासून तुटलेपणाची,परात्मतेची वेदना रघूला घेरून टाकते.

या कादंबरीमध्ये राजकीय सामाजिक, वाङ्मयीन चर्चेबरोबर जातियतेचीही चर्चा झालेली आहे. आपल्या समाजात असलेली वर्णव्यवस्था, यामुळे दलितावर अजूनही अत्याचार होत आहे. त्यांचे शोषण होत आहे. जरी त्यांना कायद्याने रक्षण मिळत असून नोकरीच्याजागी आरक्षण मिळत असले तरीही त्यांची प्रगती होत नाही. कारण या आरक्षणाचा फायदा या दलित समाजातील मोजके लोकंच घेत आहे. त्यामुळे या जातीच्या तरूणांची कोंडी होऊन ते तांबटसारखे आक्रमक होऊ लागते आहे. त्याचप्रमाणे भारतातील मुस्लिमांना होणारा त्रास, त्यांच्या समस्या दिलावर कथेतून सांगतो. तेव्हा शिरगावकरला ते पटत नाही. त्यावर चर्चा होते. तेव्हा रघू म्हणतो, "ह्या देशातला मुसलमानही हिंदु इतकाच जुना वाटतो. ह्या देशावर तुमचा जेवढा अधिकार आहे तेवढाच ह्या देशातल्या मुसलमानांचाही आहे, मग त्यांना हाकलण्याची भाषा करण्यात काय अर्थ? आणि मुसलमान जेवढे धर्मांध आहेत तेवढेच हिंदूही आहेत. हे स्वीकारायची तयारी ठेवा उलट दिलावरसारख्यांनी मी या देशाचा मुसलमान नागरिक आहे, तुमच्या इतकेच या देशावर आमचेही प्रेम आहे. अशी भूमिका घ्यायला पाहिजे." ( पृ. ८०) अशी तटस्थ भूमिका

रघू मांडतो.

कॉलेजमधील प्राध्यापक म्हणजे महाजन सरांसारखे हे तरूणाच्या आदर्शस्थानी असलेले वेळ आल्यावर तडजोड करतात; तर सनमाडीकरांसारखे मूल्यनिष्ठ, घोसरवाडकरसारख्याच्यामागे जाऊन कॉलेजमधील तरूणांना सामाजिक कार्याच्या नांवावर राजकीय फायदा घेऊ लागतात. हे पाहून मात्र रघू हतबल होतो. त्याला जाणवू लागते की माणसाला सत्व ठेवून जगणे शक्य नाही कारण या समाजात होत जाणारी मूल्यघसरण अतिशय वेगाने होऊन ती भयावह स्वरूप धारण करून राहिली आहे. तेव्हा याला कारण तडजोडी आहेत. कारण बायनावहिनी वेळ आल्यावर गोंद्या जवळ जाऊन राहू लागते. तर सनमाडीकर, महाजन, सुरेश, दादा कोतोलीकर सारखेही तडजोडीचे बळी असतात. जीवनात होत जाणारा चांगुलपणाचा लोप पाहून रघूला धक्काच बसतो.

## ❖ तणकट

आंबेडकरांनी चालविलेल्या चळवळीने दलित समाज जागृत होऊन संघटित होऊ लागला होता. या चळवळीमुळे त्यांना कायद्याने संरक्षण दिले जाऊ लागले. परंतु आंबेडकरांनंतर मात्र त्यांची जागा घेऊन, तसे नेतृत्व करू शकेल असे कोणी नेते दलितांना लाभले नाही. त्यांच्यानंतर त्यांची ही चळवळ पुढे नेण्याच्या ऐवजी स्वार्थी नेते स्वत:च्या तुंबडया भरू लागले. पूर्वी दलितांवर समाजातील उच्च वर्ग अन्याय करत असे. आता मात्र त्यांच्याबरोबर दलित समाजातीलच काहीजण अन्याय करू लागले. या सामाजिक, राजकीय क्षेत्रामधील भ्रष्ट वातावरणामुळे या समाजातील विविध जातीचे शिक्षित तरूण हतबल झाले. असे हे दाहक वास्तव 'तणकट' या कादंबरीत राजन गवस यांनी चित्रित केले आहे.

त्याचप्रमाणे अनेक सामाजिक समस्यांबरोबर फक्त स्वार्थासाठी चालणारी अविचारी आक्रमकता, मूल्यविवेकाच्या जोपासणीतून होणारी असहायता यांचे चित्रण ही या कादंबरी मध्ये आलेले आहे, वर्तमानकाळातील जटिल सामाजिक परिस्थितीचे सत्य दर्शन येथे घडते.

या कादंबरीमध्ये 'कबीर' या नायकाची अगतिकता व्यक्त झाली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बदललेल्या दलित आणि सवर्ण यांच्या सामाजिक संबंधाच्या संदर्भाचा, विषय यामध्ये आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अनेक वर्षापासून विषमता,उपेक्षा सहन करणा–या दलित समाजाला देश स्वतंत्र होताच कायद्याने संरक्षण मिळू लागले. तेव्हा मात्र त्याच्यावर अन्याय करणारा सवर्ण समाज अधिक प्रमाणात त्यांच्यावर दबाव वाढवू लागला. हा या कादंबरीचा मुख्य धागा असून त्यात राजकीय, सामाजिक,सांस्कृतिक, नैतिक,शैक्षणिक प्रश्नाचे अनेक विविध रंगी धागे याला येऊन भिडतात.

'तणकट' या कादंबरीद्वारा आपल्या सांस्कृतिक जीवनातील महत्त्वपूर्ण अशा प्रश्नांवर राजन गवस यांनी प्रकाश टाकला आहे. गाव आणि गावकुसाबाहेरील जीवन, या दोघांमध्ये होणारा तणाव, त्यांच्या प्रतिक्रिया या कादंबरीमध्ये आल्याने ही कादंबरी ग्रामीण साहित्यापेक्षा, दलित साहित्यापेक्षा वेगळी ठरते. या कादंबरीत ग्रामीण जीवनाकडे नव्या, पुरोगामी विधायक दृष्टिकोनातून पाहिले गेले आहे.

ग्रामीण जीवनात सुधारणा आणून त्याचा विकास व्हावा, समाजातील विषमता दूर व्हावी यासाठी महात्मा फुले, शाहू महाराज यासारख्यांनी प्रयत्न केले. तर ह. ना. आपटे, श्री. म. माटे, विभावरी शिरूरकर, उद्धव शेळके या अशा अनेक साहित्यिकांनी हे प्रश्न कलात्मक पातळीवर मांडले. त्याचप्रमाणे राजन गवस यांनी सुद्धा गाव आणि गावकुसाबाहेरील जीवन यांच्या भावविश्वाला आजच्या संदर्भाने छेद देऊन त्याला कलात्मक पातळीवर आणून त्याच्या विचार केला आहे. ज्यामुळे 'तणकट' ही आजच्या वर्तमानातील लक्षवेधी आणि परिणामकारक कलाकृती झाली आहे.

१९६० नंतर महाराष्ट्रात झालेल्या चळवळींमध्ये दलित चळवळ ही प्रभावी चळवळ होती. या चळवळीमुळे, घटनेत मिळालेल्या संरक्षणामुळे दलित वर्ग जागृत झाला आणि हा समाज सुधारू लागला तर राजकीय क्षेत्रात मराठयांचे प्रभुत्व होते. ज्यामुळे ग्रामीण क्षेत्रात मराठा वर्ग आणि दलित यांच्या तणाव वाढत गेला. या मध्ये भर घातली ती आधुनिकीकरणाच्या विकृतीने. ज्यामुळे संपूर्ण गावाचा सलोखा नाहीसा होऊन प्रत्येकजण

स्वतंत्रपणे विचार करू लागला. यातूनच जातीयता वाढू लागली आणि खेडयामध्ये सुधारणा होत असताना 'मानवीयता' नष्ट होऊ लागली.या अशा जातीय संबंधातील सूक्ष्मता चित्रित करत संपूर्ण ग्राम व्यवस्थेचे चित्रण 'तणकट' मध्ये केलेले दिसते. या कादंबरीबद्दल म्हणूनच महेन्द्र सुदाम कदम लिहितात, "कारण 'तणकट' संपूर्ण वर्तमानावर प्रभुत्व गाजवता गाजवता भविष्याच्या दिशाही सूचित करते. परंपरा आणि आधुनिकता यांचा व्यवस्थित समन्वय न झाल्यामुळे संपूर्ण ग्राम व्यवस्थाच कशी कोडयात अडकून पडली आहे. याचे तपशिलवार चित्र या कादंबरीत आलेले आहे." (९)

अशा या 'तणकट' कादंबरीने बदलत्या ग्राम व्यवस्थेचे चित्रण करत ग्रामीण, प्रादेशिक, नागर कादंबरीच्या भेदरेषा पुसून टाकल्या आहेत. यातच या कादंबरीचे यश दिसून येते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आजही गावाची सुधारणा नाही तेथे तेथील महारवाडयाची ही स्थिती तशीच आहे. इतकेच नाहीतर गाव- म्हारवाडयाची स्थिती दयनीय झाली आहे. अशोक बाबर याबाबत लिहितात, "या कादंबरीत विकेंद्रीकरणाची विचारप्रणाली स्वीकारून सामाजिक सत्य माडण्याचा प्रयत्न केला आहे. सत्य हे देशी साहित्य मूल्य खेडयातल्या जीवन चित्रणाला न्याय देऊ शकते ह्याची गवस यांना प्रचंड जाणीव असल्याने त्यांनी संबंध कादंबरीत सत्य मांडताना कुठेही दांडी मारली नाही. याची साक्ष द्यायची झाली पर कादंबरीतील दोन महत्वाची पात्रे : कबीर कांबळे आणि मोहन बल्लाळ." (१०) 'तणकट' या कादंबरीमध्ये कबीर कांबळे हे एक मध्यवर्ती पात्र आहे. कबीर हा कॉलेजात शिकणारा तरूण असून तो या कादंबरीमध्ये एक वैचारिक निरीक्षक ते नैतिक भूमिका घेत कृती करणा-या नायक स्वरुपात वावरताना दिसतो. गावाच्या महारवाडयातील तरूणमुले शाळा न शिकता गावभर हिंडून आईवडिलांच्या जीवावर जगत असतात, पुढे जाता बाळासाहेब शेडबाळेच्या नादी लागून त्याच्याकडून मिळणा-या क्षणिक फायद्यासाठी गावातील सवर्णाच्या विरूद्ध उभी राहतात, यांचा विरोध कबीर करतो. संपूर्ण महारवाड्याच्या विरोधात राहून कबीर आपली नैतिकता सांभाळतो आणि महारवाडा

वाचविण्याचा प्रयत्नही करतो तर कबीरचा मित्र मोहन बल्लाळ हा अत्यंत हुषार आणि स्वत:ची पक्की समज असलेला असा असून त्याला आपल्या देशी जाणिवेचे पूर्णभान आहे. त्याला माहीत आहेतकी कोणतीही राजकीय कृती करण्याआधी समाजातले सत्य शोधून काय बिघडलेय, त्यासाठी काय करायला हवे याची जाणीव लोकांना करून द्यायला हवी; हे नेहमी तो कबीरला सांगत असतो. तर महारवाडयातील थळू आजाही आपल्या अनुभवाच्या बळावर आपली विचारधारा कबीरला सांगत असतो. त्याच्या विचारांची नाळ गांधीजीच्या विचारांशी जोडलेली दिसते. थळू आजा म्हणतो, "लेकरा, आसं न्हाई, एकदम तोडून नाही जमत गावाला. किती केलं तरी पांढरीतलीच हाईत तीबी. काळीज एकच हाय. त्यास्नीबी न्हाई दुकवायचं. हाळूहाळू गावात बी फरोक झालाय. तुज्यासारक्या पोराला मांडीला मांडी लावून घेत्यात. पोरा, नशीबवान हाईसा. आमाला बेलटयाशिवाय थारा न्हवता. आता त्ये गेलं का न्हाई? तसं जाईल सगळं हाळूहाळू. बाबासाबाची पुण्याई. दुसरं काय?" (पृ. ६९) या मध्ये थळूआजाने ग्रामीण परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तेव्हा गांधीजी आणि आंबेडकर यांच्या विचारांची एकत्रित अशी देशी चळवळ उभी राहिली पाहिजे होती. इतकेच नाहीतर वर्तमानकाळातही तशीच चळवळ उभी करणे गरजेचे आहे भूमिका राजन गवस यांच्या या कादंबरीतून दिसून येते. तेव्हा भूमिकेतूनच मोहन बल्लाळ. थळू आजा, पितांबरसारखी पात्रे कबीर भोवती चित्रित झालेली आहेत.किंबहुना एकप्रकारे त्यात कबीरच्याच व्यक्तिमत्त्वाचे extension दिसते.गं.बा.सरदार यांची ही अशीच भूमिका दिसून येते. "दलित समाजातील बहुसंख्य लोक खेड्यापाड्यांत विखरलेले आहेत. त्यांच्यापैकी पुष्कळसे चरितार्थासाठी सवर्ण समाजावर अवलंबून आहत. कार्यकर्ता खेड्यातील असो वा शहरातील,त्याला अन्यायाशी झगडणे भागच आहे. पण शहरातील कार्यकर्त्यांनी आपण जी भाषा वापरतो,जे कार्यक्रम घेतो त्याच्या प्रतिक्रियेची झळ खेड्यातील आपल्या एकाकी बांधवांना कितपत लागेल याचा जबाबदारीने विचार केला पाहिजे. परिवर्तनाची किंमत खेड्यातील दलितांनाही द्यावी लागणारच. पण 'साहे ओझे त्यास तेंचि द्यावे' या

तुकारामांच्या वचनाचे मर्म लोकाभिमुख वृत्तीच्या कार्यकर्त्यांनी ध्यानात घ्यावयास हवे.आपल्या देशात दारिद्र्यरेषेखाली फार मोठा वर्ग आहे. त्यात सवर्ण आहेत,दलितही आहेत. ते सर्व शोषितच आहेत. त्यांच्यातील दुरावा कमी होत गेला, परस्परांच्या सहकार्याने एकत्र काम करण्याचे प्रसंग वारंवार येत गेले आणि त्यांच्यात ख-या अर्थाने बंधुभाव निर्माण झाला,तर दलितांवर हल्ला करण्याची कुणाची हिंमत होणार नाही. सगळा शोषितवर्ग त्यांच्या पाठीशी उभा राहील. गावातल्या गावात सहजपणे मिळू शकणा-या अशा संरक्षणाची हमी हेच दलितांचे खरे हुकमी बळ होय. हा संरक्षणाचा प्रश्न मूलगामी समग्र परिवर्तनापासून अलग काढता येत नाही.परिवर्तनाची प्रक्रिया ही तशी एकच आहे. तिला योग्य दिशा लाभली तर सामाजिक जीवनातील संबंधांना आपोआपच समतेचे वळण लाभेल." (११)

कबीर महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना तिथल्या वातावरणात आणि तो राहत असतो त्या ग्रामीण भागात असलेली जातीयचेची चौकट किती मजबूत आहे. ह्याची जाणीव त्याला होते. कॉलेजमध्ये असलेले प्राध्यापक ही 'जात' या संकल्पनेला प्रोत्साहन देत असतात, उदा. अवचित भालेराव हे बाबासाहेबाबरील व्याख्यानाला, महार समाजाच्या मुलांना कबीरने आणावे असे म्हणतात, तर गंजेकरसारखे प्राध्यापक जातीवरून कबीरला अपमानास्पद शब्दात बोलतात. यामुळेच जातीयतेची प्रवृत्ती वाढीस लागलेली दिसते. यात दिक्षितसारखे शाळामास्तर कधी आडनाव बदलून तर अवचित भालेराव सारखे इंग्रजीचा पद्धतीचा पोषाख घालून आपली जात लपविण्याचा प्रयत्न ही करताना दिसतात तेथे सत्यपाल धर्मरक्षी, फणिंद्र कांबळे, बाळासाहेब शेडबाळे सारखे नवशिक्षित तरूणांना हाताशी धरून त्यांची दिशाभूल करणारे ही कबीर पाहू शकतो. त्याचे मन यावर उपाय शोधू पाहत आहे. त्याची घडपड ही माणसाच्या चेह-यामागचा चेहरा बघण्यासाठी जणू आहे. जातीवरून हिणवण्याची लाज वाटावी, जातीची नव्हे, आपल्या समाजाचे स्वार्थी धोरण त्यामागची कारणे तो जाणू लागतो. त्याचे मित्रही याविषयांवर चर्चा करत असतात या

मुलांच्या विचारमंथनातूनच या समाजाच्या मूलभूत प्रश्नांची मांडणी केली आहे.आपल्या समाजात असलेले भेद विसरूनच आपण प्रगती करू शकतो ही त्याची धारणा आहे.

कबीर हा सुशिक्षित तरूण असून त्याच्या शिक्षणामुळे त्याच्या जीवनकक्षा विस्तारल्या आहेत. जीवनात आवश्यक मूल्यांची जोपासना कारणारा कबीर महारवाडयात बाळासाहेब शेडबाळेनी सुरू केलेल्या संपूर्ण गावाविरूद्धच्या कारस्थानात सामील होत नाही. तर कॉलेजमध्ये चालणा-या चळवळींमधला फसवेपणा, पोकळपणाही लक्षात आल्यावरया सा-यांपासून दूर राहू लागतो. त्याची भूमिकाही थळूआजाप्रमाणे गाववाडा समजून घेऊन स्वत: सुधारून मग जातीयता नाहीशी करण्याची आहे. त्याच्या या भूमिकेमुळेच संबंध महारवाडा त्याच्या कुटुंबापासून फटकून वागत असतो तरी त्याच्याबद्दल सर्वांना आदर असतो इतकेच नाहीतर गावातील लोकही त्याला मदत करत असतात. तर कबीर हा शिष्यवृत्तीच्या पैशाने घरात धान्यही आणत असतो तर घरातील शेळीला चरायला नेण्याची त्याला लाज वाटत नसते. त्याच्या ठिकाणी प्रचंड सहनशीलता आपल्या समाजाविषयीची तळमळ, आईवडिल आणि आपल्या कुटुंबाबद्दलचे प्रेम दिसून येते. आपल्या समाजातील दलित तरूण नोकरी लागली की पुन्हा गावात फिरकत नाही, गावात राहणा-या आईवडिलांना पैसे पाठवत नाही तर काही मुले शिष्यवृत्ती मिळाल्यावर दारू, सिगारेटच्या व्यसनात पैसे घालवतात, घरात मदत करीत नाही. शिक्षण नीट घेत नाही. ते पाहून कबीर म्हणतो, "आमच्या माणसांना सगळं फुक्कट पायजे. तेही जलद पाहिजे. फुक्कट काहीही मिळवून घेणं हा आपल्याला फार मोठा आनंद असतो. त्यामुळं जो जो फुक्कट देण्याच्या भरभरून घोषणा करील त्याच्यापाठीमागं जाण्यात आमच्या माणसांना मोठेपणा वाटतो.त्यांना सगळं तयार, फुक्कट आणि जलद मिळालं की खूश. घेणं वाईट आणि देणारा तो उपकाराखातर देतो. त्यातून मिंदेपणा येणार, हा विचार करायला आमच्या माणसांना सवड नाही. उलट घेण्याची आपली परंपरा बलुत्यासारखीच की. सततच्या अन्यायाचा हक्क म्हणून सवलती ही गोष्ट मला मान्य आहे. पण सवलतीमागची भूमिकाच आम्हाला कोणी सांगितली नाही. त्यामुळं मिळेल ते ओरबाडत सुटायचं, ही प्रवृत्ती

आमच्या नेत्यात आली आणि नेते आमच्या माणसांनाच ओरबाडून खात सुटले." (पृ. २१४) कबीरच्या या विचारातून त्याचे व्यक्तिमत्त्व वैचारिक पातळी, नैतिकता दिसून येते.

या कबीरच्या विचार करण्याच्या पद्धतीशी त्याचा मित्र बल्लाळ याचे साम्य असते. या कादंबरीमध्ये त्या दोघांचे संवाद विधायक स्वरूपात आलेले दिसून येतात. जेव्हा कबीर आपल्या महारवाडयाचे झालेले हाल पाहून दु:खी होतो. तेव्हा बल्लाळ म्हणतो, "आणि मुद्दा उरतो तो तुझा म्हारवाडा वाचवण्याचा आणि वाचण्याचा. तो वाचेल. त्याच्या स्वत:च्या हिंमतीवर तगेल. तगणे हा तर आपल्या कृषी संस्कृतीचा अद्वितीय वारसा आहे. आणि म्हारवाडा मातीला जवळचा आहे. वास्तविक तुमच्या तमाम नेत्यांनी हेच पहिल्यांदा ध्यानात ध्यायला हवं होतं की हा देश खेडयांचा आहे आणि म्हारवाडयाची सगळी मुळं खेडयातल्या जमिनीत आहेत. तेच विसरले सगळे आणि बोलत राहिले. मध्यमवर्गीय ब्राह्मणी क्रांतीचे जाहीरनामे, मग घोषणा, मोर्चे, उपोषणे आणि वळवळ. चळवळ. सगळ शहरातल्या रस्त्यावर आणि वर्तमानपत्रातल्या कागदावर. त्यांचा कधी संबंधच आला नाही तुझ्या म्हारवाड्याशी. वास्तविक ते इथलेच. पण शहरात पडले. मग त्यांचेही मध्यमवर्गीय होणे अटळ होते.ते त्यांना लाभलेल्या गतीने होत गेले.आणि मगच झाला तुझ्या या नव्या दु:खाचा जन्म! " (पृ. २३८) या बल्लाळच्या विधानातूनच राजन गवस यांनी गावातील महारवाडा आणि वर्तमान काळातील डांबरी रस्त्यावरची वर्तमानपत्रे दलित चळवळ यामुळे तेथील ग्राम्य व्यवस्थाच का अडचणीत येते हे सांगितले आहे.

कबीर, बल्लाळ, थळूआजाबरोबरच गावातील आक्काबा राणे, परंपरा आणि आधुनिकता यांच्या समन्वय मानणारे असून त्यांच्या समजंसपणाला, क्षमाशीलतेला, सहनशीलतेला सगळा गाव वचकून असतो. हे आक्काबा राणे त्यांना अडचणीत आणणा-या शेडबाळेला मारहाण झाल्यानंतर स्वत: उचलून दवाखान्यात नेतात. तर दलित सवर्ण यांचे संघर्ष होत असताना ही कबीर या दलित हुशार विद्यार्थ्याला स्वत:च्या घरातील सायकल देऊन टाकतात.

त्या विरूद्ध बाळासाहेब शेडबाळे हा गावातील सवर्ण एक अत्यंत उपद्रवी माणूस असतो. गावातील पतसंस्थेत भ्रष्टाचार करून सरपंचला, आक्का बा राणेला अडचणीत आणतो तर गावातील दलितांना चिथवून गावामध्ये जातीय संघर्ष निर्माण करतो. त्याचबरोबर महारवाडयातील सुलीशी संबंध ठेवतो इतकेच नाहीतर या महारांचा उपयोग स्वत:च्या स्वार्थासाठी करून घेत असतो. या सगळ्याचा अतिरेक झाल्यावर महारांच्या नांवावर लाखो रूपये मिळवून सुलीसह गाव सोडून जात राहतो. आणि महारवाडयाला भयंकर कर्जाखाली बुडवून टाकतो.

बाळासाहेब शेडबाळे प्रमाणेच सिद्धार्थ नसलापुरे, सत्यपाल धर्मरक्षी, भालेराव, अलताफ, फणींद्रसर, बनसोडे ही दलित नेतेमंडळी दलित समाजाला फसवत असते. कारण ही मंडळी दलितांना संघटित करून त्यांनाच लुबाडणा-या कारवाया करत आहे. त्यामुळे या दलितांच्या संघटिततेला संघर्ष, याला कोणतीच दिशा राहिली नाही. उलट त्यांचा संघर्ष हा कसा विकृत स्वरूप धारण करू लागला आहे. हे या कादंबरीद्वारे राजन गवस यांनी दाखवून दिले आहे. जातीयता दूर करा म्हणणारा दलित मांगाना नाकारतो तर सवर्णाशी संघर्ष करत आहे. यामुळेच जातीयता कमी होण्याऐवजी वाढीस लागली आहे. ही वास्तविकता गवस यांनी चित्रित केली आहे. इतकेच नाही तर आंबेडकर हे दलित चळवळीच्या केंद्रस्थानी असले तरी आजच्याकाळात दलितांकडूनच त्यांचा पराभव होत आहे हे सत्यही मांडले आहे. आजच्या वर्तमानकाळात बाबासाहेबांना नीट समजून घ्यायला हवे अशी गरज राजन गवस यांना वाटत आहे. कारण बाबासाहेबांच्या चळवळीला त्याकाळी फुले, गांधी यांची पार्श्वभूमी लाभली होती. तेव्हा अशी काही पार्श्वभूमी वर्तमानकाळात या चळवळींना नसल्याने तसेच बाबासाहेब यांनी केलेल्या चळवळीचा आणि त्यांचा काळ व आजचा काळ यातही अंतर असल्याचे ध्यानात घेतले पाहिजे. राजन गवस यांच्या मते वर्तमानकालीन आधुनिक पाश्चात्य मूल्ये, भौतिक सुखाची लालसा, राजकारणात वाढलेली सत्तेची हाव, वाढू लागलेली जातीयता, असुरक्षितता, विश्वासहनन, शिक्षणातील भ्रष्टाचार या सा-यातूनच समाजातील गुंतागुंतीचे जटिल वर्तमानकालीन

वास्तव प्रकट होते. समूहपातळीवरील जगण्याचे अस्तित्व,त्यातील मूल्यात्मकता संपणे, व्यक्तिवादी धारणा वाढीस लागणे आणि समूह फक्त झुंड पातळीवर येणे या सर्व प्रक्रिया त्यांनी चित्रित केल्या आहेत.

या कादंबरीबद्दल अशोक बाबर लिहितात,"जगभराच्या दु:खाचे मूळ शोषणात आहे. मग ते धर्म,वंश,जात,लिंग,वर्ण इत्यादी भेदांच्या साच्यात घातल्यामुळे विवेकाच्या पातळीवर टिकत नाही.कारण महार किंवा मांग हे इतरांच्यावर अन्याय करणार नाहीत,याची कधीही शाश्वती देता येणार नाही. या कादंबरीत दलितांना मिळालेल्या कायद्याच्या संरक्षणाचा ते गैरफायदा कसा घेतात, त्याचेही चित्रण केलेले आहे. म्हणून या कादंबरीमध्ये धर्म,जात, वंश,वर्ण या भेदापेक्षा प्रत्येक माणुस हा स्वभावतः दुष्ट,क्रूर,इतरांना संधीनुसार पिळणारा किंवा हीन असतो. या विचारालाच महत्त्वाचे स्थान आहे." (१२)

## (आ) पात्रविचार.

राजन गवस यांच्या कादंब-यात येणारी पात्रे विपुल प्रमाणात आहेत. त्यांच्या कादंब-यातील मुख्य पात्रे प्रत्यक्ष समाजात वावरत असताना त्यांच्या संपर्कात येणा-या अनेक व्यक्तींची चित्रणे ही वैशिष्टयपूर्ण रीतीने त्यांच्या भाषिक लकबीसह जिवंत झालेली आहेत. त्यांच्या कादंब-यांमध्ये सुली, तायाप्पा, चेअरमन, रघू, कबीर ही मुख्यपात्रे स्वतंत्र व्यक्तिमत्वांसह आली असली तरी त्यांच्या सभोवतालच्या पात्रांच्या स्वभाव वैशिष्टयांमुळे ह्या मुख्य पात्रांचे व्यक्तिमत्व अधिक ठशठशीतपणे चित्रित झाले आहे. या सभोवतालच्या पात्रात घरातील मंडळी म्हणजे आई वडील, काका काकू, भाऊ बहीण तसेच अन्य नातेवाईक घराबाहेरच्या वातावरणात गावातील मित्र मंडळ, शिकत असताना कॉलेज शाळामधील मित्र मंडळ, ज्या परिसरात राहत असतात तेथील मंडळी, नोकरीच्या जागी असलेले अन्य सहकारी, समाजात वावरताना भेटणारे अशा सर्वांचा समावेश झालेला आहे. या सभोवताली राहणा-या पात्रांमुळे त्यांचे जीवनविषयक दृष्टिकोन, त्यांचे सुखदु:ख, त्यांच्या समस्या आपल्या समोर येत जातात. यातील काही पात्रे विशिष्ट घटना दाखविण्यासाठी परिस्थितीचा परिणाम दाखविण्यासाठी येतात. म्हणजेच ती फक्त घटना,

प्रसंगांपुरती येत असली तरी ती या सामाजिक वास्तवाचा भाग म्हणून आल्याने कादंबरीत त्यांना महत्त्वाचे स्थान असतेच.

कादंबरीतील पात्रांचे प्रयोजन व त्यानुसार पात्राला मिळणारा अवकाश, काही पात्रे ही केवळ सामाजिक वास्तवांचे प्रतिनिधिरूप प्रकट करीत असली तरी त्यातील व्यक्तिविशेषाने त्याला जिवंतता येते.

चेअरमन, रघू, कबीर ही मुख्यपात्रे आपल्या सभोवतालच्या व्यक्तींचे त्यांच्या सामाजिक मूल्यांचे, मानसिकतेचे वास्तविक दृष्टिकोनातून मूल्यमापन करत असतात. तेथे तायाप्पा, सुली ही मुख्य पात्रे आपल्या अंधश्रद्धेला बळी पडलेली असून ते जोगते-देवदासींच्या व्यथा-वेदना, भाव-भावना, विकास-वासना, त्यांची होणारी मानसिक कोंडी व्यक्त करतात. यामध्ये माणसाच्या स्वभावाची सखोलता तपासून माणसांची नैतिकता तपासण्याचा प्रयत्न करत असतात. 'धिंगाणा', 'कळप', मधील नायक स्वत: निवेदक म्हणून भूमिका बजवत वेगवेगळे स्वभाव दृष्टिकोन असलेल्या मानवीसमूहाच्या पात्रांमध्ये वावरतात. या समूहामध्येच ही मुख्यपात्रे जगत राहूनच आपले व्यक्तिमत्व वाचकासमोर उभे करत असतात.

## राजन गवस यांच्या कादंब-यांत आलेल्या विविध पात्रांची विभागणी.

| कादंबरी | महत्त्वाची पात्रे (अंदाजे) | गौण पात्रे (अंदाजे) |
|---|---|---|
| चौंडकं | १० | ७० |
| भंडारभोग | २४ | १०० |
| धिंगाणा | ११ | ११० |
| कळप | १८ | १२० |
| तणकट | १० | ११० |

राजन गवस यांच्या कादंब-यातील पात्रांची वर्गवार विभागणी.

(१) कॉलेज काळातील, गावातील मित्रमंडळ

(२) शाळा, कॉलेजसारख्या शैक्षणिक क्षेत्रातील माणसे

(३) राजकीय क्षेत्रातील माणसे

(४) सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रातील माणसे

(५) धार्मिक रूढी परंपरांचे बळी झालेले (जोगते, जोगतिणी, चौंडके)

(६) ग्रामीण स्त्रिया

(७) ग्रामीण परिसरातील माणसे

(८) कादंब-यात आलेले प्राणी

## (१) कॉलेजकाळातील, गावातील मित्रमंडळ

राजन गवस यांच्या 'चौंडकं' आणि 'भंडारभोग' या कादंब-यांमध्ये या प्रकारातील पात्रे आलेली नाहीत. परंतु 'धिंगाणा', 'कळप', 'तणकट' मध्ये मात्र दिसतात.

'धिंगाणा' मध्ये चेअरमनचे गावातील मित्रमंडळ असते. चेअरमन आणि त्याचे मित्रमंडळ गावात चालणा-या भ्रष्टाचाराचा विरोध करत असतात. कधी गावातील शाळेत दूध चोरणा-या मास्तरला पकडतात. तर कधी काळू मास्तरचा मटक्याचा धंदा शोधून काढतात. अशावेळी चेअरमन, संब्या, किरवाड, बाबल्या यांच्यामध्ये शैक्षणिक स्तरावर चालणा-या भ्रष्टाचाराची चर्चाही होते. इतकेच नाही तर ही मंडळी गावात होणा-या निवडणुकांमध्ये राजकीय नेत्यांना हवालदिल करतात. त्यावेळी या तरूणमंडळींना मात करणारे जातीचे राजकारण पाहून मात्र ती आश्चर्य चकित होतात. तसेच या तरूणमंडळी द्वारा गावातील पुढा-यांचे लफडे, शाळेतील मुलींचे प्रेमप्रकरण उघड केली जातात. त्याबरोबर या तरूण मुलांच्या लग्न, नोकरी बद्दलची होणारी चर्चाही आलेली असली तरी कुठेही लैंगिक प्रश्नांची चर्चा आलेली नाही.

'कळप' मध्ये रघू हा गावातील मित्र एस.डी., सिकल्या, दिपल्या यांच्या नादाने गावातील या तरूणमंडळीं द्वारा स्थापित पतसंस्थेत सहभागी होतो. गावात चालणा-या

शाहिरकीच्या, तमाशाच्या, कीर्तनाच्या कार्यक्रमालाही तरूणमंडळी आवडीने जात असत. कॉलेजमध्ये शंक-या, दिलावर, सुरेश, आप्पया यांच्याबरोबर सामाजिक, सांस्कृतिक चळवळींमध्ये भाग घेत असतो. तेथे शंकर-गीता, सुरेश-सुलभा यांची प्रेमप्रकरणे, एस.डी. ने भीम्याच्या बायकोवर केलेली बळजबरी यातून तरूणांच्या जातीय प्रश्नांचा उल्लेख केलेला दिसून येतो.

पोराटकी करणारी ही तरूणमंडळी बापय्या आणि शेवंता जोगतिणीचे लग्न लावून देतात. आणि ख-या समाज सुधारणेची कल्पना ढोंगी पुढा-यांना देतात. रघूचा एक मुस्लिम मित्र दिलावर हा एक चांगला लेखकही असतो. दिलावर द्वारा राजन गवस यांनी भारतातील मुसलमानांची व्यथा मांडलेली आहे. त्यांच्या घराचे, घरातील माणसांचे विस्तृत चित्रण मात्र आलेले नाही. असा हा दिलावर कुंडलीशास्त्र जाणणारा असुनही स्वत:च्या वर्तमानाला कंटाळलेला असुन भविष्यातील आशावादावर जगत असतो. त्याला नोकरी मिळत नाही म्हणून रिक्शा चालवून उदरनिर्वाह करत असतो. तसेच तेथील परिसरात होणा-या विविध साहित्यिक उपक्रम मध्येही भाग घेत असतो.

रघूचा आणखी एक मित्र सुरेश संकेश्वरी हा हुशार विद्यार्थी गरीबीला कंटाळलेला असतो. शिक्षण घेऊनही नोकरी न मिळाल्याने घरातून त्रास दिला जातो. अशावेळी रघू, शंक-या कॉलेजमधील प्राध्यापकांच्या मदतीने सुरेशला कॉलेजमध्ये नोकरी लावून देतात. अशा या सुरेशला नंतर साहित्यिक क्षेत्रात प्रसिद्धी मिळवायची हाव वाटू लागते. त्यासाठी तो आवश्यक असे सगळे प्रयत्न करू लागतो आणि त्याच्या सामान्य प्रतीच्या लेखनाला बक्षिसेही मिळू लागतात. त्याच्यामते खेडयात राहून प्रगती होणे शक्यच नाही. त्यासाठी शहरात राहणे त्याला आवश्यक वाटत असते.

तांबट हा सुशिक्षित दलित तरूण रघूचा मित्र असतो. शहरात शिकायला आलेला हा तांबट शहरी संस्कृतीत आपल्याला सामावून घेतो. शहरात राहत असताना अनेक त-हेवाईक साहित्यिकांशी त्याचा परिचय होतो. असा हा तांबट नोकरीच्या शोधात निघतो तेव्हा मात्र जातीच्या राजकारणाने हतबल होतो. त्याच्या लक्षात येते की तत्कालीन समाजात

दलितांना आरक्षण मिळत असले तरी त्याचा फायदा या समाजातील तळागाळातील लोकांना होत नसून त्याचा फायदा या समाजातील मोजके सुशिक्षित लोकच घेत आहे. त्यामुळेच दलित समाज हा अजूनही मागासलेलाच राहिला आहे. तेथे आप्पया सारखा रघूचा सहपाठी आर्थिक विषम परिस्थितीमुळे शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या मागे लागतो. घरातील दारिद्रयामुळे, जवाबदारीमुळे नोकरी मिळविणे त्याला गरजेचे होऊन जाते.

'तणकट' मध्येही कॉलेज जाणा–या कबीरचे मित्र सुबाना, मोहन बल्लाळ, पितांबर इ. असतात. सुबाना हा कॉलेजच्या प्राचार्यांसमोर जतियतेवरून आलेल्या मोर्चाचा आक्रमक भाषेत सामना करतो. कबीरच्या मित्रांची नेहमी दलित समाजाच्या समस्यांवर चर्चा होत असते. दलितांना असणारे महत्त्वाचे प्रश्न, त्यांची उकल याबाबतीत विचारणा करत असतात. या सुशिक्षित दलित तरूण मंडळींना आंबेडकरांचा काळ आणि आजचा काळ यात असलेला फरक लक्षात घेऊनच दलित चळवळी करायला हव्या असे वाटत असते. त्यांच्या मते आंबेडकरांच्या कर्तृत्वाला म.गांधी, म.फुले यांची पार्श्वभूमी लाभली होती. तशी मूल्ये आता नाहीत. तेव्हा वर्तमानात आंबेडकरांची मूल्येच समजून घेऊन आपल्या ग्रामीण संस्कृतीच्या मूळात असलेल्या तत्त्वांना सामील करूनच दलित चळवळी केल्या तर त्याचा फायदा संपूर्ण दलित समाजाला होईल. या संदर्भात महेंद्र सुदाम कदम लिहितात, "आजचे आधुनिक पाश्चात्य मूल्यधारणा, अतिरेकी, व्यक्तिवाद, भौतिक सुखांची लालसा, सत्तालोलुप राजकारण, वाढीस लागलेली जातीयता, असुरक्षितता, अविश्वासर्हता, शिक्षणातील अनाचार आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आज प्रत्येकाने स्वत: टिकण्याची धडपड केली पाहिजे. आजचे वर्तमानच इतके जटील आणि गुंतागुंतीचे आहे की, तेथे समूहाला, समाजाला महत्त्व राहिले नाही, हे सर्वांनीच ध्यानात घेण्याची गरज आहे, असे राजन गवस यांना वाटते." (१३)

## (२) शाळा कॉलेजसारख्या क्षेत्रातील माणसे –

राजन गवस यांच्या कादंब–यांमध्ये शैक्षणिक क्षेत्राचा विस्तृत पट आलेला असून गावातील शाळा, तालुका पातळीवरील कॉलेजमध्ये चालणारे भ्रष्टाचार, राजकारण यांचा

विस्तृत विचार केला गेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक क्षेत्रात झालेल्या परिवर्तनाचा आढावा या कादंब–यांमध्ये घेतलेला दिसतो. गावातील, तालुक्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये असलेले भ्रष्ट शिक्षक गण संस्थांमध्ये चालणारे गैरव्यवहार, पक्षाच्या जातीचे राजकारण, भ्रष्टता, शिक्षकांची, प्राध्यापकांची न–नैतिकता, विद्यार्थ्यांची उदासीनता अशा अनेक बाजूंनी या क्षेत्रातील किडलेपण दाखवून देण्याचा प्रयत्न राजन गवस यांनी केला आहे. या क्षेत्रातील अनेक स्तरांवरील पात्रे आपल्या भूमिकेतून आपले दृष्टिकोन व्यक्त करत असतात. 'धिंगाणा' मध्ये काळू मास्तर शाळेच्या मुलांना देण्याचे दूध बाहेर विकत असतो. कांबळे मास्तर मटका चालविण्याचे काम करत असतो. अशा या भ्रष्ट, अनैतिक कार्य करणा–या शिक्षकांच्या तक्रारी शिक्षणाधिका–यांकडे करूनही उपयोग होत नाही. तसेच 'कळप' मध्ये शैक्षणिक क्षेत्रात शिरलेले किडलेपण किती खोलवर गेलेले आहे, हे दाखविले आहे. त्यातील कॉलेजचा प्राचार्य फडणीस, प्रा. बलुतेदार सारख्यांना मदत करत असतो. सनमाडीकर, महाजन सारखे मूल्यनिष्ठ प्राध्यापक काही काळाने पक्षाच्या राजकारणाला मोहून घोसरवाडकर सारख्या भ्रष्ट पुढा–यांसाठी कसलीही तडजोड करू लागतात. हे पाहूनच रघू, शंकर, दिलावर सारख्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या वरील असलेला विश्वास उडून जातो.

या कादंबरीमध्येच रघू हा परीक्षेत एका पेपरमध्ये बाप्पा शेवंताच्य लग्नाचे विस्तृत वर्णन लिहून येतो तरीही पास होतो. त्यावरून आपल्या परीक्षा पद्धतीतील पोकळपणा राजन गवस यांनी दाखवून दिला आहे. शाळेमध्ये लाच देऊन आलेले शिक्षक मुलांना गाईड वाचून शिकवत असतात. शाळेच्या कंटीजन्सीमध्येही घोटाळे करत असतात. शाळेचे मुख्याध्यापक साने, शाळेतील शिक्षक कानझाडे, बी.सी.के., एस.व्ही.के. चौगुले, गुरव तसेच मेवेकर सारख्या कारकूनांना पाहून रघूचा संताप होत असतो. 'तणकट' मध्ये सवर्ण गंजेकरसारखे प्राध्यापक जातीयवादाला प्रोत्साहन देत असतात. तेथे दलित प्राध्यापक अवचित भालेराव, वनवने सुद्धा दलित चळवळीच्या नांवावर आपला स्वार्थ साधत असतात. गावातील शाळेत आलेले दिक्षित सारखे दलित शिक्षक आडनाव बदलून जात

लपविण्याचा प्रयत्न करत असतात. फणींद्र कांबळे सारखे दलित शिक्षकही काही काळाने आपली भूमिका बदलत जातात.

'भंडारभोग' मध्येही मास्तर देवदासींच्या कल्याणासाठी चळवळी करत असतात. त्यासाठी तायाप्पाची मदत ही घेतात. परंतु काही काळाने तायाप्पाच्या लक्षात येते की या चळवळीमागे देवदासींच्या कल्याणापेक्षा मास्तर आणि अन्य मंडळींचा स्वत:चा स्वार्थ आहे. या चळवळीं द्वारा प्रसिद्धी, पैसा प्राप्त करायचाच हेतू मास्तरांचा असतो.

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दलच्या उदासिनतेला कारण इकानॉमिक्स शिकविणा-या बाई, बलुतेदार, गाईड वाचून शिकविणारे साने, बी.सी.के. सारखे शिक्षक 'कळप' मध्ये दिसतात. तेथे लॉजिक शिकविणा-या सोरटेबाई 'तणकट' मध्ये पाहू शकतो. अशी ही शैक्षणिक न-नैतिक पात्रे जवाबदार झालेली दिसतात. कॉलेजमध्ये प्राध्यापक स्वत:चे गट तयार करत असतात आणि वेळ आल्यावर आपल्या विद्यार्थ्यांचे मोर्चे काढून विरोध दाखवत असतात.

## (३) राजकीय क्षेत्रातील माणसे -

राजन गवस यांच्या 'भंडारभोग', 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' या कादंब-यांमध्ये राजकीय पार्श्वभूमी आलेली आहे. 'भंडारभोग' मध्ये मास्तर हे तायाप्पाला नव्या युगाची चाहूल लावून देतात. देवदासींच्या कल्याणासाठी चळवळी, मोर्चे काढले जातात. सरकारकडे त्यांचे प्रश्न मांडले जातात. परंतु त्यामागे मास्तरांचा राजकीय प्रसिद्धी मिळवायचा हेतू असतो. त्यामुळे पुढेजाता या सुधारणेचा फोलपणा तायाप्पाला दिसू लागतो.

'धिंगाणा' मध्ये गावात भ्रष्टाचार करणारा सरपंच आबा पाटील, रेशनवर मिळणारी साखर गडप करणारा हारबा झील, तांदुळाची पोती घरात घालणारा वाणी, सारखे राजकारणी पात्रे आहेत. हे भ्रष्ट राजकारणी गावातील सोसायटीमध्ये ही भ्रष्टाचार करत असतात. गावात पोलिस पाटील करण्यामागे जातीचे राजकारण खेळून गणबा पाटील त्यांच्या मुलाला आंद्याला पोलिस पाटील करून टाकतो. गावातील हे राजकारणी लोक डेरीमध्यें असाच भ्रष्टाचार करून डेरीमधील साधन सामग्री विकूनही टाकतात.

असे हे राजकारणी लोक गावात निवडणूक आल्यावर लोकांना लालूच देऊन वोट घेऊ पाहतात. अशावेळी आबा पाटील त्याच्या भावीवर गावातल्या बायकांना पाणी भरू देतो तर हारबा गावातील लोकांचे फुकटात कळवून देतो. अशाप्रकारे लोकांची मते घेण्यासाठी काही न काही देऊ करणारे हे राजकारणी लोक पंच म्हणून निवडून आल्यावर या लोकांनाच लुटत असतात.

गावातील राजकारणात जातीलाही महत्त्व असते. गावामध्ये सवर्ण–दलितांचे संघर्ष होत असतात तेथे दलितांमध्ये महार–मांग यांचेही वैमनस्य काही घटनातून दिसून येते. राजकीय डावपेचांमध्ये दलितांचा उपयोग केला जातो. या राजकीय खेळात मात्र गरीब माणसांना क्षणिक फायदा होऊन जातो. म्हणूनच म्हारत्या म्हणतो, "ये बाबानुऽऽ तुमची निवडणूक आमी गरीब पोट भरून खाणार. कशाला पायजेत तुमची भांडण ?" (पृ.१९५) इतकेच नाहीतर राजकारणी लोक देवाचे नवस बोलून लोकांना फसविण्याचे परवाने मिळवत असतात.

'कळप' मध्ये घोसरवाडकर हा राजकीय पक्षाचा माणूस प्राध्यापकांच्या मदतीने कॉलेजमध्ये राजकीय पक्षाच्या कारवाया चालवत असतो. या सामाजिक चळवळींच्या नांवावर देणग्या मिळवून स्वत:च्या तुंबडया भरत असतो. तसेच ज्या गावात रघू राहत असतो. त्या गावातील सरपंचही लोकांचे पैसे खाऊन टाकतो ; ज्यामुळे पंचायतीचे लाईट कनेक्शनच कापले जाते. तेथे रघूचा मित्र एस.डी. हा तरूण नेता गावात पतसंस्था उघडून लोकांचा पैसा बुडवतो.

'तणकट' मध्ये गावातील राजकारण, दलितांच्या चळवळी, शैक्षणिक क्षेत्रात चालणारे राजकारण राजन गवस यांनी दाखविले आहे. गावात आक्कबा राणे सारखा गावाची निष्ठा जपणारा माणूस आहे तर गणबा पाटील, बंडू चेअरमन सारखे मराठा जातीचे नेते गावातल्या राजकारणात स्वत:चा प्रभाव टिकवून ठेवतात. गावातील बोर्डात शेडबाळे हा (कडू जातीचा) गोंधळ करतो. तेव्हा मात्र ही मंडळी काहीच करू शकत नाही. हा बाळासाहेब शेडबाळे सवर्ण असून दलितांचा नेता होऊन गावामध्ये सवर्ण आणि दलित

असा संघर्ष उभा करून राजकारण खेळतो. तेथे महारवाडयाला खोटया आशा दाखवून लाखोंच्या कर्जात बुडवून पळून जातो. शेडबाळे सारखेच जालिंदर बनसोडे, आनंदा कांबळे, अवचित भालेराव हे लबाड दलित नेते गावपातळीवर झालेल्या दलितांवरील अन्यायाला मोठे स्वरूप देऊन आंदोलन करू लागतात. दलितांना भडकवून, अयोग्य मार्गाने चळवळी चालवतात. ज्याचा फायदा ह्या नेते मंडळींना होतो आणि तोटा मात्र या समाजातील गरीब लोकांचा होतो. सत्यपाल धर्मरक्षी सारखे नेते दलितांना भडकविणारी भाषणे देत असतात. ही सारी दलित नेते मंडळी आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचे विकृतीकरण करून स्वत:चा स्वार्थ साधत असतात असे लक्षात येते.

अशा या विविध पात्रांबद्दल महेंद्र सुदाम कदम लिहितात, "या सर्व व्यक्तिरेखा आपापल्या परीने जीवनाला आकार देण्याचा प्रयत्न करतात आणि त्याचवेळी स्वत:चे परखड आत्मपरीक्षणही करतात. यामुळेच शेडबाळे उपद्रव देत असला तरी आतून वचकून आहे, हे त्याला स्वत:ला चांगले माहीत आहे. यातूनच सत्य नाकारून जगणा-या व्यक्ती कितीही गुंड असल्या तरी त्यांना आतून प्रचंड धास्ती वाटत असते, हे सनातन वास्तवही गवस यांनी शेडबाळेच्या रूपाने मांडले आहे." (१४) स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात अनेक परिवर्तने घडून आली आहेत. त्याचा प्रत्यय 'कळप' मध्ये येतो. या 'कळप' बद्दल सदानंद देशमुख लिहितात, "ह्या कादंबरीत वर्तमान समाज व्यवस्थेचे असे प्रभावी चित्रण आहे. तसेच आजच्या पिढीतील शिक्षित, सैरभैर वृत्तीच्या पिढीची काळीजकापी चिंतनशीलता आहे. आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर आपणही एखाद्या कळपाशी जुळवून घेतले पाहिजे. आपले अंगभूत स्वत्व दडपून प्रवाहात सामील झाले पाहिजे. ही खरे म्हणजे कोणत्याही मनस्वी कलावंताच्या दृष्टीने दुर्दैवाची बाब आहे. मात्र असे हे कळप एकटया पडलेल्यांची मेल्या म्हशी प्रमाणे दुर्दशा करून टाकतात, असे सूचित करणारा 'कळप' कादंबरीतील एक प्रतिकात्मक उतारा मला नेहमीच अस्वस्थ करून जातो." (१५) अशाप्रकारे राजन गवस यांच्या कादंब-यातून राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्टता दिसून येते.

## (४) सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रातील माणसे -

राजन गवस यांच्या 'कळप' या कादंबरीमध्ये सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रात असलेला ढोंगीपणा दाखविलेला आहे. 'कळप' मधील रघू हा शाळेत जात असतानाच लेखन करत असतो. वाचनाची विशेष आवड असल्याने कॉलेजमध्ये गेल्यावर हळूहळू साहित्यिक प्रवृत्तींमध्ये भाग घेऊ लागतो. त्यामध्ये चालणाऱ्या ग्रामीण साहित्य चळवळ, काव्यवाचन, चर्चासत्रे, जिल्हा पातळीवरच्या साहित्य संस्थांचे कार्यक्रम, संमेलने यात भाग घेत असताना त्यातला दांभिकपणा, खोटेपणा, प्रसिद्धीचा सोस, आत्मवंचना याचे अनुभव येऊ लागतात. गोविलकर सारखे व्याख्यानाला येणारे लेखक त्यांचे विक्षिप्त वर्तन, कर्णिका सारख्या कवींचा लाळघोटेपणा, कुंडलगावकर, भादवणकर सारख्यांचे आपल्याच लोकांना स्टेजवर आणण्याचा प्रयत्न करणे, स्वतःच्या कादंबरीवर स्वखर्चाने चर्चासत्र घडवून आणण्याचा सुरेश संकेश्वरीचा प्रयत्न, संमेलनामध्ये महाजनसर सारख्या निष्ठावान माणसाला तडजोडी करताना पाहून रघू सारखा संवेदनाक्षम माणूस संतापतो आणि आपले मनोगत व्यक्त करताना लिहितो, 'वास्तविक मी चळवळ, लेखन, वाङ्‌मयीन चळवळी, तात्त्विकता, नैतिकता असल्या फालतू लफडयात पडायलाच नको होते." (पृ.३९५)

या कादंबरीमध्ये ग्रामीण साहित्य म्हणजे काय ? दलित साहित्य म्हणजे काय ? लोककथा व कथा यातील फरक, अशा अनेक साहित्यिक प्रश्नांवर चर्चा झालेली दिसून येते. त्याबदृल रघूने मांडलेल्या विचारां विषयी जी.के.ऐनापुरे लिहितात, "लोककथा आणि कथा यात मूलभूत वेगळेपणा आहे. पण लोककथेची शक्ती कथेत आणता आली तर काय वाईट" (पृ.४७), "गोंधळ्याची कथा मला कथेतील सर्वश्रेष्ठ कथा वाटते." (पृ.७०) "आपल्या साहित्यातील सगळे फॉर्मस खरोखरीच उपरे झाले, आपलं असं काहीच नाही." (पृ.५०), "ग्रामीण - दलितवाल्यांनी खरं वास्तविक सगळं बदलायला पाहिजे होतं. म्हाराघरी गाणं होतं. त्यांचा विचार दलित लेखकांनी केलाच नाही. उलट ते ब्राह्मणी कविता लिहून पुळचट विद्रोह व्यक्त करत राहिले आणि ग्रामीणवाले तर एकदम गांडू निघाले ?" (पृ.७०) "मला भजन आणि तमाशा एकत्र मिसळून नाटक लिहायचं आहे. भजनातला

सूत्रधार आणि तमाशातला मावश्या एकत्र आणता आले पाहिजेत." (पृ.९८) इत्यादि अनेक विधाने विचारवर्धक वाटतात." (१६)

### (५) धार्मिक रूढी, परंपरांचे बळी झालेले (जोगते, जोगतिणी, चौंडके) -

भारतीय समाज व्यवस्थेत आजच्या २१व्या शतकात विज्ञानयुगातही अनेक अंधश्रद्धा, दुष्ट चालीरीती, घातक परंपरा मानल्या जातात. देवदासी, जोगतिणींची परंपरा ही अशीच अजूनपर्यंत चालत असलेली दुष्ट प्रथा आहे. केसात जटा झाल्या म्हणजे यल्लमादेवीचे बोलावणे आले असे समजून अनेक लहानमुली यल्लमादेवीला सोडतात. देवीला सोडलेल्या या मुली गावासाठी सोडल्या, असेच समजले जाते. यातून या देवदासी, जोगतिणी, अनैतिकतेच्या मार्गांवर जातात आणि अंध:कारमय भविष्य असलेले जीवन जगू लागतात. अशाच एका जोगतिणीची कर्मकहाणी 'चौंडकं' मध्ये आलेली आहे. यामध्ये 'सुली' या जोगतिणी द्वारा त्यांची व्यथा, भावभावना बरोबर विकार, मानसिक कुचंबणा व्यक्त झालेली आहे. या कादंबरीत आलेल्या शेवंता, तानू सुतारीण, रत्नी, फूला या इतर जोगतिणींकडून त्यांच्या श्रद्धा-अंधश्रद्धा, पुरूषाकडे पाहण्याची दृष्टी, समाजाची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टीही व्यक्त झाली आहे. त्यातील तानू सुतारीण ही जोगतीण असूनही तिच्या स-त्वामुळे तिला गावात आदर असतो. शेवंताक्का ही झुलवा लावून स्थिर जीवन जगण्याचा प्रयत्न करते. ज्यामुळे तिचे अनैतिक जीवन जगणे नाकारले जाते. तेथे फुला ही जोगतीण दर महिन्याला नव्या माणसाशी झुलवा लावते आणि अनैतिक जीवन जगत असते. या कारणानीच गावात तिच्याकडे वेश्येच्या दृष्टीने पाहिले जाते. म्हणूनच शेवंताक्का सारखी जोगतीण आपल्या देवदासींच्या परंपरेला बदनाम करणा-या फुलाला शिव्या घालत असते.

आपल्या समाजाच्या अशाच अनेक वाईट चालीरीती, रूढी, परंपरेचा आणखी एक बळी म्हणजे जोगता. ग्रामीण भागामध्ये देवीला मुली सोडतात. तसेच मुलेही सोडतात. ही मुलेच पुढे 'जोगता' म्हणून ओळखले जातात. या 'जोगत्याचं' जीवन तर जोगतीणींच्या जीवनापेक्षाही भयंकर वाईट असतं. जोगतिणी झुलवा लावू शकते म्हणजेच कोणाची तरी

रखेली म्हणून राहू शकते. तिच्या मृत्यूनंतर प्रेताला खांदा द्यायला गावातून चार माणसेही जमतात. त्या उलट 'जोगत्याच्या' प्रेताला उचलायला माणसचं मिळत नाही. खरे तर जोगते हे पुरूषासारखे पुरूष असतात. परंतु रूढी, परंपरांच्या नांवाखाली त्याला दबवून टाकले जाते आणि नपुंसकतेचा शिक्का मारला जातो. अशाच जोगत्याची कहाणी 'भंडारभोग' मध्ये राजन गवस यांनी मांडली आहे. या कादंबरीमध्ये 'तायाप्पा' या जोगत्याची व्यथा असून त्यामध्ये जोगत्यांचे विश्व, त्यांचे विधी सोहळे, मेळे, मरणानंतरच्या विधीचे चित्रण आलेले आहे. यातूनच जोगते जोगतिर्णी, चौंडके यांचे जीवनही दर्शविले आहे. तायाप्पाचे रत्नव्वाशी संबंध जुळतात पण इतर जोगतीर्णींच्या द्वेषाने ते दुरावतात. भाऊ, यमनाक्का सारखे विकृत वासना बाळगणारे जोगता, म्हादू जोग्या राघू, तमनाप्पा, तानाप्पा सारख्या जोगत्यांचे जीवनही चित्रित झाले आहे. त्याच बरोबर शेवंताक्का, पारव्वा, आक्कव्वा, इ. जोगतीर्णींचे चित्रण केलेले आहे. जोगतीर्णींच्या जीवन चित्रण मधून जोगतिर्णींचे जगणे, त्यांची इच्छा, अपेक्षा, स्वप्न दिसून येतात. फुलासारखी दलित जोगतीण अनैतिक जीवनातच आपले सुख मानत असते. कमळाक्का सारख्या जोगतीणीला बाळकू चौंडक्या सोडून देतो तेव्हा आप्पया तिला आधार देतो. मेळा उभा करून देतो. पुढे काही काळाने आप्पयाही कमळाक्काला सोडून देतो. अशाप्रकारे जोगतिर्णी या स्थिर जीवन जगूच शकत नसतात.

जोगतीर्णींचे मुले 'चौंडके' यांचेही जीवन जगणे निरर्थक असते. चौंडक्याच्या जीवनाबद्दल तायाप्पा मास्तरांना सांगतो, "मास्तर, चौंडक्याला कोण पोरगी देणार ? ह्यास्नी जात काय गोत ? कुठल्यातरी जोगतीला झालेलं वावरं पौर." (भंडारभोग- पृ.२११) असे हे चौंडके काहीवेळा अनैतिक जीवन जगत असतात. निंग्या चौंडक्या सिधु जोग्याबरोबर राहतो. बाळकु चौंडक्या कमळाक्का नंतर जखेवाडीच्या नव्या जोगतिणी बरोबर राहत असतो.

अशाप्रकारे जोगते, जोगतिणी, चौंडके समाजापासून उपेक्षित जीवन जगत असतात. त्यांच्यावर शारीरिक, मानसिक अत्याचारही केले जातात. याचे चित्रण 'चौंडकं' , 'भंडारभोग' आणि 'कळप' मध्ये आलेले आहे.

## (६) ग्रामीण स्त्रिया -

राजन गवस यांच्या सर्व कादंब-यांना ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेली दिसते. कादंब-यांमध्ये आलेला ग्रामीण परिसर, तेथील कुटुंब व्यवस्था, कुटुंबातील स्त्रिया यांचेही चित्रण आलेले आहे. 'चौंडकं' ही कादंबरी वगळता राजन गवस यांच्या अन्य कादंब-यांमध्ये नायिकेचे पात्र नाही. कादंबरीमध्ये आलेल्या या स्त्रिया मुख्य पात्राच्या घरातील, बाहेर वावरताना संपर्कात येणा-या अशा आहेत. 'चौंडकं' मध्ये सुलीची आई बायजा ही अशीच ग्रामीणस्त्रीचे प्रतिनिधित्व करणारी असून घराच्या, स्वत:च्या समस्यांसाठी सुलीला देवीच्या पायावर सोडते. पुढे जाता सुलीही अनैतिकतेच्या मार्गावर ढकलली जाते. तेव्हा मात्र बायजा हे सहन करू शकत नाही आणि मृत्यू पावते. कादंबरीतील सुलीची आई या ग्रामीण संस्कृतीतील सासू-सुनांच्या प्रतीक म्हणून आल्या आहेत.

'चौंडकं' मध्ये सुलीच्या अत्यंत जवळच्या व्यक्तीमधील स्त्रिया म्हणजे बायजा, आजी, बेळगुदीची मावशी, मामी, आजी (आईची आई) या आहेत. तेथे गावात राहणा-या कामाच्या ठिकाणी भेटणा-या स्त्रिया मध्ये निकमाची लक्ष्मी, ढगा-याची हौशी, कमळा सुतारीण, सुनंदा, शिंधाची म्हातारी, भिमी पाटलाची बायको, शांता पाटील, पाटलाची लक्ष्मी, उत्तूरची आक्का, मो-याची बनी, कणश्याची बायको, खोरटयाची कमळा, सुताराची पारू, कसाळ्याची तानू, शिंधाची गंगू, सोनाराची जनाबाई, कमळा म्हातारी, सुबाना पोटयाची बायको, मगदुमाची कल्पी, होळ्याची शेवंता, सुताराची कमळी, गोदा मोटिन, कसाळ्याची लक्ष्मी, , मान्याची चांगुणा, खरंदाळची बायको, , गंगू म्हातारी, नानू मामी, मान्याची सुजोसा, पाटलाची सखू, मंगव्वा गुणवंता, शिंधाची बायना, गोडश्याची नानू, न्हाव्याची म्हातारी, पाटलाची गोंधा, मान्याची शांता, लक्ष्मी कसाळीन इ. आहेत.

'चौंडकं' मधील जोगतीणी - आक्कूजोगतीण, शेवंता जोगतीण, शांताबाई जोगतीण, गंगूबाई जोगतीण, तानू जोगतीण, महाराची रत्नी, यसाधाची फुला, तायाक्का, तंगव्वा, सिद्धवा, बना इ.

'भंडारभोग' मध्ये तायाप्पाच्या परिवारातील स्त्रियांमध्ये त्याची आई कल्लवा,

काकू, आत्या या आहेत. घराबाहेर वावरताना प्रसंगा निमित्ते, जोगता म्हणून जगताना भेटणा-या स्त्रियामध्ये तानू सुतारीण, शिंधाची बायजा, जनाक्का, घेवाडयाची हौसा, यरगुंडयाची सुंदरा, पाटण्याची किसना आजी, फुलाची आई, कोंडकरची लक्ष्मी, घोरपडयाची म्हातारी, मिसाळाची बसव्वा, गुरवीण, मस्करची आक्कवा, म्हातारी, सुन, पारव्वांची काकू, सत्यव्वा, शामरू मिसाळची म्हातारी, गोदा मोटीन, यरगुडयाची म्हवना, गिरजाक्का, तंगव्वाची बहिण, सखू काकू, दादू पाटलाची बायको, मगदुमाची म्हातारी, सुंदरी काकू, सुताराची हौसा, शिंधाची म्हवना, आक्कू मानीन, गोडशाची कमळा, कासाराची थोरलीसून.

'भंडारभोग' मधील जोगतीणी – कसाळ्याची गंगव्वा , देववाली शेवंता, आक्का , फुला, जाधवाची पारव्वा , मोहित्याची गंगव्वा , लिकमाची म्हातारी , गोडश्याची लक्ष्मी, मस्करची रत्नी , जाधवाची पारव्वा , मल्लव्वा , यमान्नाका , तंगव्वा, रकमी (मांगाची), कमळा , सुंदरा , यल्लवा , गंगव्वा , इमला (बा. जोगतीण) इ.

'धिंगाणा' मध्ये आलेल्या ग्रामीण स्त्रिया मध्ये चेअरमनची आई, सुमी बायना शिदीन संब्याची आई, कान्याची काकू, धोंडू आजी, कासू आजी, तायना काकू, यशोदा काकू, शिवु कतगरिन, कमी, गणबाची आई, गुना व्हावीन, शनबाची बायको इ. आहेत.

'कळप' मध्ये रघूच्या घरात आई, लहान बहीण, वहिनी आहे तर गावात राहणा-या स्त्रियांमध्ये एस.डी.ची. आई, बायना वहिनी, सुंदरा वयनी, इ. आहेत.

'कळप' मधील जोगतीणी – सत्तव्वा, कमळा, गोजा , तानव्वा, गंगाबाई, बेबी जोगतिण, शेवंता इ.

'तणकट' मध्ये आलेल्या ग्रामीण स्त्रिया म्हणजे कबीरची आई गंगव्वा, किसना शिंदेची बायको, तानू आजी, भीम्या म्हारची बायको सगुणा, सुली शेडबाडेची बायको तारा, शेडबाळेची आई, फुला, तानक्का, कमळव्वा, आक्कवा, जनाक्का, पुतळा काकू, तायव्वा, सकन्याची सखू म्हातारी, गुणाकाकू, सकल्याची राधा वयनी, देववाली शेवंता, बाळबाची

बायको, इळक्याची भिवश, सकटयाची सून, गोंदा म्हार, गौरा सुतारीण, कसाळनी, सिदबाची बायको इ. आहेत.

या ग्रामीण स्त्रिया वेळप्रसंगी आपली स्पष्ट मत ही देतात आणि वेळ आली तर स्त्रियांवर अत्याचार करणा-याला धडाही शिकवत असतात. उदा. 'धिंगाणा' मध्ये राजकारणात आलेला भ्रष्टाचार पाहून गुंडयाची म्हातारी सांगते, 'धोंडी पाटील व्हता तवा बायका वाडयावरनं जातानंबी चपल्या हातात घीवून जायच्या. रस्त्याला दिसला तर पाटमो-या व्हयाच्या. गडी शब्दाचा इमानी. गाव शब्दाचं ताबेदार. आनी आता काय रं ऽऽ छे ? हागाय बसलेल्या बायका हालत न्हाईत. त्ये भाडे पुढारी झाल्यात ऽऽ मातीत गेलं पुढारीपण ! (पृ.२२४) तसेच 'तणकट' मध्ये शेडबाळेचे सुलीशी अनैतिक संबंध असतात. काही काळ शेडबाळेची बायको तारा हे सहन करते. पुढे जाता ती त्याचा विरोध करते. तेव्हा शेडबाळे ताराला बेदम मारतो, अशावेळी गल्लीतील स्त्रिया एकत्र होऊन त्याला मारतात आणि गल्लीबाहेर फेकून ही देतात.

## (७) ग्रामीण परिसरातील माणसे. -

राजन गवस यांच्या कादंब-यांमध्ये तालुक्यात, गावात राहणारी साधी सरळ, कुठे लबाड, स्वार्थी अशी खेडवळ, अडाणी माणसे आलेली आहेत. ही माणसे लहान सहान व्यवसाय करणारी, सामान्य नोकरी करणारी अशी आहेत. 'चौंडकं' या कादंबरीत सुलीचे वडील सुबाना त्याला मदत करणारा गणपू मिसाळ, सुलीचा मामा, तुकूदा, बाळूदा, तात्या, भीमा पाटील गावातील मंडळी आहे. 'भंडारभोग' मध्ये लकडीबाईचा मुलगा, मिसाळ सारखे तायाप्पाच्या जोगतेपणाची कुचेष्टा करतात तेथे परसू सारखे विकृत मानसिकता असलेलेही आहेत. तसेच तायाप्पाचे काका संगप्पा, त्याला शेतात मदत करणारा गुरव, पानाच्या खोक्यावर बसणारा शिरपाही आहे. 'धिंगाणा' मध्ये चेअरमनचे वडील त्याचे भाऊ, ग्रामीण मूल्ये तत्त्वे सांगणारा पिचक्या, हरी तात्या, सडगावचा पाप्या पानाच्या खोल्यावाला, संब्याचा मामा, त्याची आई, दादा, राणू गुरव अशी मंडळी आहे. 'कळप' मध्ये शाहीर हरीदा, जाधवसर, दादा कोतोलीकर, सरदार महागावकर, त्यांचा नोकर

धोंडया, हॉटेलवाला, त्याचा नोकर, विसावा हॉटेल, तळसीकर महाराज, हायस्कूल तपासणीचा साहेब, सरपंच आबा तात्या, बिट्टया (पानाचा खोकेवाला) दत्त न्हावी, बाळ्या, भीमा दिवटया, अशी अनेक मंडळी ग्रामीण स्तरातील आहे. 'तणकट' मध्ये कबीरचे वडिल, भाऊ, यळूआज्या, गज्या मुळीक, यल्लपा दावणे, भीम्या महार, दादू महार, रामा महार, तुका जाखल्या, जानबा मास्तर, बारदेस्कर सर, हॉटेलवाला दगडू देसाई अशी विविध माणसे आहेत.

## (८) कादंब-यात आलेले प्राणी

राजन गवस यांच्या कादंब-यात प्राण्यांचेही चित्रण आलेले असून मानवाशी निगडित हे प्राणी आपले अस्तित्व दाखवितात. राजन गवस यांच्या 'चौंडकं' ते 'तणकट' या कादंब-यांमध्ये घरात असलेल्या बैल, म्हशी, गाई, शेळ्या, कुत्रे, खेकडे यांचा संदर्भ आपल्याला मिळतो.

कारण 'चौंडकं' ते 'तणकट' या कादंब-यातील कथानक हे ग्रामीण शेतकरी कुटुंबाशी निगडित आहे.

'धिंगाणा' मध्ये चेअरमन स्वत:च्या बेकारीचा विचार करताना सांगतो, "सुबरू तात्याच्या पक्यानं घरातल्या म्हशी विकून मास्तरकी मिळवली. मास्तरकी काय म्हशीच्या किंमतीची नोकरी ? करत्यात लेकाचे करू द्या. मला तरी नोकरी मिळवायची नाही." (पृ.२) चेअरमन या ग्रॅज्युएट तरूणाला शेतीची कामे, म्हशीला गोठणावर नेण्याचे. शेतात नांगरणी करताना बैलामागून फिरण्याचे ही कामे करावी लागतात. म्हणूनच त्याला 'गोठणाचा चेअरमन' हे नांव दिले जाते. म्हशींना पाणी देण्याच्या, गोठणावर नेण्याच्या प्रवृत्तीतून चेअरमनची जगण्याची निष्क्रियता, मानसिक हताशा दाखवली गेली आहे. 'कळप' मध्ये शेतीची कामे करतच रघू कॉलेज करत असतो. आपल्या समाजातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रामध्ये लागलेली कीड, सर्वत्र पसरलेले भ्रष्टतेचे, अनैतिकतेचे वातावरणात नैतिक, स्वाभिमान स्वत्त्व जपणा-यांना होणारा त्रास याचा विचार करताना रघू म्हणतो, "सकाळी सकाळी घर सोडलं पाय गळटून गेलेले. धाप लागली,

गोठणावर थांबलो. तर प्रचंड मोठया गिधाडांच्या कळपांनी गोठण भरलेला. हळूहळू सरकत सरकत गिधाडांच्या जवळ पोहचलो. तीन चार फुट उंचीचं एक एक. भली मोठी दणकट चोच. पंखावर काळपट घाणेरडी पिसं. काळेशार पाय. क्रूर डोळे. पन्नास शंभराचा एक एक कळप. मध्ये मेलेल्या म्हशीचा आडवा पडलेला टरटरीत फुगलेला देह. बोचकरून बोचकरून मास बाहेर आलेलं. तांबूस पांढरट. गिधाडांची स्पर्धा. आभाळभर. भोवती. शंभरभर. आजुबाजुला तेवढीच घिरटया घालत. चांगला बचक्याचा गुड उचलला. बळ एकवटून नेम धरून फेकला. तर तो म्हशीच्या टरटरीत फुगलेल्या पोटावरच बसला. फक्त आवाज झाला. गिधाडं जराशी बावचळली. पुन्हा उद्योगात. मग फक्त बघत बसलो. त्यांच्या चोचीत लोंबकळणारे मांसाचे लगदे." (पृ.३८८) या कादंबरीत आळ्या, बांडगुळ यांचे उल्लेख ही आलेले आहेत.

'तणकट' मध्येही कबीर हा कॉलेजला जाणारा मुलगा शेळीला चरायला गावाबाहेर पांदीत घेऊन जात असतो. तसेच गावात बेंदराच्या सणाला करीला बैल बांधला जातो. यातून ग्रामीण संस्कृतीमध्ये प्राण्यांना दिला जाणारा मान ही दिसून येतो.

अशा प्रकारे राजन गवस यांच्या कादंब-यांमध्ये या प्राण्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्व 'माणसांच्या' संदर्भासह दिसून येते.

राजन गवस यांच्या कादंब-यांचा विचार करताना त्यातील पात्रांची रचना, त्याची मांडणी, शैली पाहता लक्षात येते की या कादंब-यामध्ये केंद्राशी एक पात्र असते. त्याच्या आसपास अनेक पात्रे येत असतात, जेव्हा त्यांची आवश्यकता असते. त्यातून ही येणारी पात्रे मुख्य पात्रांचे व्यक्तिमत्व उभारण्याचे, त्याचे स्वभाव विशेष दाखविण्याचे कार्य करतात. त्यातूनच या गौण पात्रांच्या प्रवृत्ती, त्यांचे कार्य, नैतिकता ही दिसून येते.

## राजन गवस यांच्या कादंब-यांतील पात्रांचे वैविध्यपूर्ण वर्गीकरण :

'चौंडकं' या कादंबरीत सुली, बायजा, सुबान्या, म्हातारी, बबन्या ही मुख्य पात्रे आहेत. बायजा, म्हातारी ज्या परिसरात राहतात तिथं यल्लमाचं 'म्हातम' असंख्य लोकांच्या मनावर अनेक वर्षांच्या रूढीपरंपरेच्या संस्कारातून आलेले आहे. बायजा आणि म्हातारी

दोघींच्या मनावर त्याचा पगडा आहे. घरातल्या एकेक कौटुंबिक आपत्ती, अभाव, दुखणी या सा-यांचा मूळ या 'जटेत' आहे. हे त्यांचे 'पाहण' ही याच रूढिग्रस्ततेचा भाग आहे. सुबान्या हाही हा पगडा नाकारता नाकारता त्याचा भाग असतो. सुलीच्या जगण्यातील वेदनेचा प्रवास या पगडयात जगणा-या, त्याला अगतिकतेनं शरण जाणा-या परंपराग्रस्त शोषितांच्या मधूनच होतो.

गावातील उच्चवर्गीय खरंदाळची बायको, घोरपडनी या घरात आंबील घुग-याची जत्रा करण्यासाठी, मेळे करण्यासाठी, गावातल्या जोगतिणींना बोलावत असतात. तसेच शेतात कामावर येणा-या गावातील बायका म्हणजे खोरटयाची कमळा, कणश्याची बायको, सुतारची पारू, कसाळ्याची तानू वगैरे ही आहेत. अशाप्रकारे गावातील उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय असे वेगवेगळ्या वृत्तिप्रवृत्तींचे लोक ही आलेले आहेत.

या कादंबरीत राजन गवस सुबान्या, बायजा आणि म्हातारी यांची ही भावनिक, मानसिक 'अबोध' अवस्था या पात्रांच्या द्वारे सूक्ष्मरीतीने रेखाटतात. शोषितांच्याकडूनच अजून एका शोषणाचा प्रवास सुरू होतो. सुली, शेवंता, फुला, रत्नी, गंगूबाई, तंगव्वा, सिद्धव्वा, बना या सारख्या लहानमोठया देवदासींच्या पात्र चित्रणातून या समूहाचं चित्रण ही लेखकानं त्याला त्याचा अवकाश, देत प्रकट केला आहे. समूहभावानं जगता जगताही 'व्यक्ती' नव्हे, माणूस म्हणून सहजपणानं येणा-या पात्राच्या मनातील क्रिया प्रतिक्रियात्मक वर्तन यांचे चित्रण येते, त्यांना जिवंततेचा स्पर्श होतो. उदा. सुली विचार करते, ......... "आजीला आजार झाला नसता तर ह्यो भोग तरी चुकला असता. करमाचा भोग हाय, त्येला आजी तरी काय करील...... ! न्हाई खरं सगळ्याचं कारण माझ्यावर कसं येतं. हिटणीच्या देववालीला माझ्याशिवाय कोण दिसतच नसंल...... असू दे. तिकडं माझं माझ्यासंग ऽऽ म्हातारी झटक्यासरशी गेली असती तर ........." सुली एकदम दचाकली. (पृ.७०)

सुलीच्या जोगतीण होण्याबद्दल बबन्या, सुलीची मावशी, तुकामामा हे कळकळ व्यक्त करत असतात.

शेवंता जोगतीण ही वेळोवेळी जोगतीणीच्या नैतिकतेबद्दल सांगून सुलीला अनैतिक

मार्गावर न जाण्याबद्दल बजावत असते. पण तरीही सुली तारूण्यसुलभ भावनेमध्ये वहात जाऊन अनैतिकतेच्या मार्गावर जाऊन पोहचते. सुलीला यल्लमाच्या डोंगरावर घेऊन जाताना गावातील श्रद्धाळू डोंगरावर जाणारे त्या परिसरातील भक्तांचा त्यांच्या स्वभाव वैशिष्टयांसह उल्लेख यामध्ये ओघाने आलेला आहे.

या ग्रामीण परिसरात असलेली सहकाराची भावना गणपू मिसाळ, आप्पा शेलार यांच्या द्वारे दिसून आलेली आहे.

राजन गवस यांच्या बद्दल चंद्रकांत भंडारी सांगतात, "आपल्याला जे 'मांडायचं' आहे, त्याचं व्यवस्थित 'भान' असलेला, भाषेचा योग्य वापर करत कादंबरीलेखन करणारा आणि लेखनाचे विविध पातळीवर 'प्रयोग' करणारा राजन कादंबरीकडे नेहमीच 'आव्हान' म्हणून पहात आलाय." (१७) यावरूनच राजन गवस यांच्या 'चौंडकं' या कादंबरीचा विषय हा वाचकांना चिंतनप्रवृत्त व अंतर्मुख करणारा विषय त्यांनी का घेतला, हे लक्षात येते.

राजन गवस यांच्या 'भंडारभोग' या कादंबरीबद्दल माधव कर्वे लिहितात, "कोणत्याही कादंबरीचं यश कादंबरीसाठी निवडलेला विषय आणि त्या विषयाची योग्य संतुलित हाताळणी यावर अवलंबून असतं. यातील आशयाच्या सर्व शक्यतांचा वेध लेखनातून घेता आला तर अशी कादंबरी सखोल आशयघन ठरू शकते. विषय जर अगदी चाकोरी बाहेरचा असेल तर कादंबरीकाराच्या दृष्टीनं ते एक आव्हानच असतं. 'भंडारभोग' या आपल्या कादंबरीत राजन गवस अशाच एक आव्हानाला सामोरे गेले आहेत." (१८)

'भंडारभोग' या कादंबरीतही 'चौंडकं' या कादंबरी प्रमाणेच यल्लम्माचं 'म्हातम' असणारा परिसर आलेला आहे. या परिसरातील लोकांवरही त्याचा पगडा आहे. घरात येणा-या अनेक अडचणी, आजारपण हे 'यल्लमा'च्या कोपानेच आलेले आहे, असे मानणारी कल्लव्वा ही तायाप्पाची आई त्यावर उपाय म्हणून तायाप्पाला जोगते करते.

अशाप्रकारे तायाप्पा हा तरूण 'जोगत्या' होतो आणि हळूहळू जोगत्यांच्या जगात गुरफटला जातो. त्यांच्यावर 'जोगतेपण' लादायला त्याचे घरचे, आजूबाजूचे लोकही

कारणीभूत होतात. 'जोगत्यां'च्या जगाचे विचित्र असे नियम पाळत त्याच जोगतंपण त्याला सर्वसामान्य जगण्यापासून दूर नेतं.

त्याबद्दल माधव कर्वे लिहितात, "आपल्यावर लादलेल्या या 'भंडारभोगा' वर तायाप्पा विचार करू शकतो कारण त्याआधीचं मोकळी हवा असलेलं जग त्याला माहीत आहे. तो विचार करू लागतो तेव्हा त्याला सांगितल जातं, 'ह्यो जलमच बिघाडलाय. म्हणायचा. कशाच कायबी मनात आणायचं न्हाई....... रातीला झाल्यालं दिसाला तरकत ठेवायचं न्हाई, दिसाला घडल्यालं रातीला मनात घोळवायचं न्हाई ....... तरच जगाय व्हईल. न्हाईतर फुकापासरी मरशील.......' वाटयाला आलेलं उपेक्षित लाजिरवाण, समाजाबाहेरचं जग स्वीकारण याशिवाय अन्य कोणतीहि प्रतिक्रिया जोगत्याला वर्ज्यच आहे." (१९)

असे जोगत्याचं जीवन जगणा-या तायाप्पाच्या घरात आईवडील, कल्लव्वा, बसप्पा, काका काकू संगप्पा, आक्कावा आणि भावंडे बबन्या, किसन्या, सुमी, पमी ही असतात. असा संयुक्त कुटुंबामध्ये राहणारा तायाप्पा 'जोगता' झाल्यावर जोगवा मागून आलेले धान्य घरात देत नाही. या शंकेने काका संगप्पाचा मार खातो. घरात, गावात तायाप्पामुळे भांडणे होऊ लागल्यावर त्यांची आई कल्लव्वा स्वत:च्या कुटुंबासाठी, मुलांसाठी तायाप्पाला घर सोडायला लावते आणि तायाप्पा घरापासून विमुख होऊन जोगते जोगतीणींच्या जगात प्रवेश करतो. जोगत्या म्हणून जगताना पुरूषाने बाईसारखे कपडे घालायचे, बाईसारखे वागायचे. पुरूषपण नाकारल्यावर समाज बुळेपणाचा शिक्का मारतो, असे जीवन तायाप्पा जगू लागतो.

असे जीवन जगताना तायाप्पामध्ये ही बदल होऊ लागतात. उदा. "पोरं एकदम गप्प झाली. गाणं पुन्हा सुरू झालं. एवढयात कुणीतरी तायाप्पाला खुणवलं. तायाप्पानं खाली मान घातली. एवढेच बघून जवळ बसलेलं पोरगं सरकत सरकत तायाप्पाला भिडलं. त्यानं तायाप्पाच्या अंगावर हात टाकला. तायाप्पा एकदम बिघडला. जागा सोडून घरात गेला. त्याचं त्यालाच कळंना. मघाशी पोरांच्या बरबर बोलतानं गोड वायलतं. त्या पोरानं खोपरात

हात घातला तवा अंगात काय तरी भिनल्यागत झालतं आनी एकदम पोराचा राग आला. ह्ये आसं का व्हवावं ? त्याचा तोच गडबडला. बाहेर चालत्यालं गाणं बी त्याला एकू येईनासं झालं. त्याचे मन उडत उडत लांब गेलं." (पृ. १५७) 'जोगते' पण स्वीकारल्यावर तायाप्पाचा शेवंताक्का, पारव्वा, म्हादू जोग्या, तानू सुतारीण, मल्लव्वा, हालगीवाला बाळू म्हाता-या, यमनाक्का, तानाक्का, फुला, आक्कव्वा, राघू, रकमी, तमनाप्पा, तानाप्पा, भाऊ, सुंदरा, बाबू चौंडक्या, कमला, आप्पया, कमळाक्का, यमन्या, गंगव्वा, राऊ, सखु, सुबाना, चौंडक्या इ. जोगते, जोगतिणीं देवी यल्लमाच्या सोहळ्यामध्ये, पूजाविधीमध्ये, मेळ्यामध्ये भेटतात. ही सारी पात्रे त्यांच्या गुणदोषासह साकार झालेली आहेत. तायाप्पा जोगता झाल्यावर गावातील लकडीबाईचा मुलगा, मिसाळ गणप्पा, परसू गावाची सोय झाली म्हणून खूष होतात. तेथे या अंधारलेल्या मार्गावरून प्रकाशाच्या मार्गावर नेणारे मास्तरही भेटतात.

यल्लमाच्या डोंगरावर जाताना भेटणारी मंडळी, तिथला पुजारी, विविध रीति रिवांजामध्ये भेटणारे जोगते - जोगतिणी, चौंडके, गावातील मंडळी या सा-या पात्रांशी तायाप्पाचे असणारे संबंध, त्यांची मानसिकता आपल्याला सामूहिक पातळीवर दिसून येते. यातूनच 'जोगत्याचं जिणं' आपले लक्ष वेधून घेतं.

'चौंडकं' मधील सुलीच्या तुलनेने तायाप्पाचे जगणे, त्याचे मानसिक चलनवलन आंदोलने गवस अधिक सूक्ष्म रूपात व्यक्त करतात, त्यामुळेच परिवर्तनाच्या चळवळीतील त्याचा सहभागापर्यंतचा प्रवास लेखक रेखाटू शकतात.

भारतात स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाही जीवन पद्धतीचा स्वीकार झाला. या लोकशाहीचा ग्रामीण भागावरही निश्चितच काही चांगला वाईट परिणामही झाला आहे. ग्रामीण भागातून नेतृत्व केले जाऊ लागले, राजकारणात विविध अपप्रवृत्तींचा प्रवेश होऊ लागल्याने मात्र ग्रामीण माणसाची मुस्कुटदाबी होऊ लागली. या अशा लोकशाहीच्या प्रक्रियेकडे ग्रामीण पातळीवरील माणूस कोणत्या दृष्टिकोनातून पाहत आहे. त्याचा विचार राजन गवस यांनी 'धिंगाणा' मध्ये केला आहे. त्यामध्येही ग्रामीण पातळी वरील राजकारणात तेथील तरूण पिढीची कशी कुचंबणा होते हे चित्रित केले आहे.

'धिंगाणा' या कादंबरीमध्ये चेअरमन हा खेडयातील शेतकरी कुटुंबातील ग्रॅज्युएट झालेला तरूण स्वत:च्या काही नीतिमूल्यांना मानत लाच देऊन नोकरी करणे नाकारतो. तेथे कोणतीही नोकरी करणे हीच त्याच्या आईवडिलांची अपेक्षा असते. पिढयान्‌पिढया कुठल्याही विकसित जीवनाचा स्पर्श न झालेल्या परंपरेत जन्मलेल्या या तरूणांनी शिकून पोटापाण्याचा प्रश्न सोडवावा हीच घाई या ग्रामीण संस्कृतितील शहरीकरणाच्या प्रभावाखाली आलेल्या आई-वडिलांना असते. त्या बद्दल चेअरमन सांगतो, "आमच्या बाप मला उपकाराखातर जेवाय घालतो. हा त्याचा समज. बापाचा हा समज मी दहाविला आल्यापासूनचा. तेव्हापासून त्याला सारखं वाटतं मला खायला घातलेली खाद फुकटच गेली. त्याचं म्हणणं कदाचित खरंही असेल. पण माझ्या सारखंच पक्क्या आणि बाळ्याबाबत मात्र नाही. ते त्याचे लाडके. बाळ्या तर आता नोकरी लागल्यापासून बापासारखीच समजूत करून आहे. बोलतनाही पण त्यालाही वाटतं, आपण मिळवतो. हा वळूसारखा फिरून खातो. त्याचं म्हणणं खोटं नाही. मी फिरून खातो. पण वळूसारखं फिरून खातो, हे काय म्हणणं झालं? "(पृ.१) अशाप्रकारे चेअरमनला नोकरी नसल्यामुळे घरात दोन वेळ जेवणही अवघड होऊन जाते.

अशा या चेअरमनच्या घरात त्याचे आईवडील, नोकरी करणारे भाऊ ही आहेत. घराबाहेर असलेल्या मित्रवर्तुळामध्ये बबन्या, पांग्या, किरवाड, शंक-या, सुब्या, ढोल्या, जंब्या, घुम्या, बाशा, बाळ्या वगैरे पात्रे आहेत. त्यांच्या बरोबर राहून गावातील भ्रष्ट राजकारण दूर करताना समाज सुधारणा करताना गणबा पाटील, हारबा झील, आबा पाटील, काळू मास्तर सारख्या भ्रष्ट राजकारणींशी सामना होतो. तसेच गावातील मंडळी, तालुक्याला गेल्यावर भेटणारा पानवाला, तिथला दुकानदार, गावात राहणारा पिचक्या हा गरीब असला तरी नीतीने जगणारा म्हातारा, सामान्य माणसांचे राजकारणींविषयी बदलू लागलेले विचार सांगणारी म्हातारी ही आहे. अशी अनेक पात्रे विविध घटना प्रसंगांतून येताना दिसतात.

राजन गवस यांच्या 'कळप' या कादंबरीत गडहिंग्लज, कोल्हापूर इ. शहरी,

निमशहरी भागाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. या परिसरात होणा-या साहित्य चळवळी, लेखक, कवी, राजकारण, शैक्षणिक संस्था, साहित्य संमेलने - परिसंवाद, देवदासी चळवळीं ही आलेल्या आहेत. ह्या सर्व प्रवृत्तींकडे रघू चिलमी या तरूणाची पाहण्याची दृष्टी, प्रगल्भ असल्याने त्या सा-यांतील फोलपणाही पाहू शकत असतो.

या कादंबरीत साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील, सामान्य माणसांच्या वैयक्तिक जीवनातील वास्तव आणि त्यातील प्रश्नही मांडले गेले आहेत.

तसेच या कादंबरीमध्ये एका संवेदनशील प्रतिभावान तरूणाच्या जीवनाची शोकांतिका दाखविली आहे. मूल्यनिष्ठ आयुष्य जगू पाहणा-या रघूच्या जीवनाच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा झालेला दिसतो. मूल्यांशी तडजोड न करत जगणारे इथे जगायला लायक ठरत नाहीत. हे सत्य इथे दाखविले गेले आहे. तेथे संवेदनांना बोथट करून यशस्वी जीवन जगण्याचा गुरूमंत्र आत्मसात करणारे सुरेश सारखे ही तरूण दिसत आहेत. तेथे रघू सारख्यांची मात्र शोकांतिका होते. 'कळप' या कादंबरीबद्दल अंजली कुलकर्णी लिहितात, "माणसाला सत्व ठेवून जगणे शक्य नाही. हेच या सा-याचे सूत्र. हे सूत्र घेऊन राजन गवस बाह्य वास्तवाकडून आंतरिक वास्तवाच्या गाभ्यापर्यंत पोहोचतात." (२०)

हे सूत्र मनात घेणा-या राजन गवस यांच्या या कादंबरीमध्ये रघू चिलमीच्या घरात आईवडील, भाऊ बहीण, भावजय अशी मंडळी आहे. त्याचे गावातील मित्र म्हणजे एस.डी., सिकल्या, इ. आहेत तर कॉलेजमध्ये शंक-या, दिलावर, आप्पया, सुरेश तांबट असे मित्र आहेत. कॉलेजमध्ये शिकविणारे सनमाडीकर, महाजन, बलुतेदार सारखे प्राध्यापक, फडणीस हे प्राचार्य, ढब्बू हा लायब्ररीयन, देवदासीच्या चळवळीत भाग घेतल्यामुळे घोसरवाडकर सारखे नेते यांच्या संपर्कात येतो. तर नोकरी लावणारे जाधव गुरूजी, नोकरी लागल्यावर साने हे मुख्याध्यापक, मेवेकर सारखे क्लार्क, कानझडे, एस.व्ही.के, बी.सी.के. सारखे शिक्षक ही भेटतात. सांस्कृतिक कार्यक्रमात गोविलकर, कलंदर पानके भादवणकर, कलावती चित्रगार, अपर्णा संगवई, इ. साहित्यिक भेटतात. रघू हा देवदासी चळवळींमध्ये भाग घेतो. त्यामुळे देवदासींच्या समस्याही त्याला कळतात तेथे

गावात राहणा-या सिकल्याची आई, बायना वहिनी सारख्या बायकांचे प्रश्न पाहुन तो भांबावून जातो. असा हा रघू हंबीरराव महागावकर सारख्या प्रचंड व्यक्तिमत्त्वाला पाहून ही आश्चर्यचकित होतो.

अशाप्रकारे रघूच्या संपर्कात येणारी ही विविध वर्गातील, स्तरातील पात्रे आपल्या भूमिका बजवत वास्तवतेचे चित्रण अधिक प्रभावी करतात. ही सारी पात्रे त्यांच्या भाषीय लकबीसह जिवंत झालेली आहेत.

राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीचा विषय स्वातंत्र्योत्तर काळातील दलितसवर्णांच्या बदलत्या सामाजिक संबंधाचा आहे. १९६० नंतरच्या काळात सुरू झालेली दलित चळवळ, त्यातून जागृत झालेल्या दलित वर्ग आणि या जागृतीमधूनच दलित साहित्य निर्माण झाले. खेडयापाडयातही दलित समाजात सुधारणा होऊ लागली. ग्रामीण पातळीवरील राजकारणात मराठयांचे प्रभुत्व असल्याने तेथे मराठावर्ग आणि दलितवर्ग यांच्यातील ताणतणाव वाढत गेला. या तणावांस आधुनिकीकरणाच्या विकृतीने अधिकच खतपाणी घातले गेले. सबंध गावाचे ऐक्य, सलोखा नाहीसा होऊ लागला. जातीयता नष्ट होण्याऐवजी ती वाढीस लागली. त्यामुळे खेडयामधील 'मानवीयता' हा महत्त्वाचा स्थायीभाव लोप पावू लागला. या अशा बदलत्या ग्रामव्यवस्थेचा विचार 'तणकट' मध्ये केला गेलेला आहे.

या कादंबरीबद्दल महेंद्र सुदाम कदम लिहितात, " 'बनगरवाडी', 'टारफुला', 'इंधन' या कादंब-यांच्या परंपरेत बसणारी 'तणकट' त्याच्याही एक पाऊल पुढे गेलेली कादंबरी आहे. 'बनगरवाडी'तील समूहप्रधानता, 'टारफुला' मधील बदलते सत्ताकारण आणि 'इंधन' मधील जातीय संबंधातील सूक्ष्मता या सा-यांना कवेत घेऊन 'तणकट' समर्थपणे संपूर्ण ग्रामव्यवस्थेचे चित्रण करताना दिसते. परंतु त्याचवेळी ती परंपरेत अडकून न पडता स्वत:चा वेगळा ठसा उमटवते. हे ध्यानात घेण्यासारखे आहे. कारण 'तणकट' संपूर्ण वर्तमानावर प्रभुत्व गाजवता गाजवता भविष्याच्या दिशाही सूचित करते. परंपरा आणि आधुनिकता यांचा व्यवस्थित समन्वय न झाल्यामुळे संपूर्ण ग्रामव्यवस्थाच कशी कोडयात

अडकून पडली आहे, याचे तपशीलवार चित्र या कादंबरीत आलेले आहे." (२१)

या कादंबरीत कबीर व त्याचा महारवाडा, त्याचा गाव हे केंद्रस्थानी आहे. कबीर हा सुशिक्षित दलित तरूण विद्रोही असला तरी समतोल विचार करणाराही आहे. प्रत्येक प्रश्न ाच्या दोन्ही बाजू पाहण्याची त्याची दृष्टी आहे. अशा या कबीरच्या घरात आई वडील आणि भाऊ आहे. वडिलांचा शिक्षणाबद्दलचा रोष पत्करूनही कबीर कॉलेज शिकत असतो. काहीकाळाने मात्र त्याच्या वडिलांचा राग दूर होऊन त्यांना कबीरचा अभिमान वाटू लागतो.

तालुक्यात शिकायला गेल्यावर मोहन बल्लाळ, पितांबर, राजा, जयाप्पा, सुबाना, कांबळे, काशिनाथ, हिरामण सारखे मित्र भेटतात. तेथे कॉलेजमध्ये शिकविणारे प्रा.गंजेकर, अवचित भालेराव, फर्णींद्र कांबळे सारखे शिक्षक ही भेटतात. महारवाडयात यकूआजा, गावात आब्बा राणे सारखे विचार करणारी माणसे, महारवाडयाला फसविणारा शेडबाळे सारखा सवर्ण नेता, जालिंदर बनसोडे, अलताप कांबळे, सत्यापाल धर्मरक्षी सारखे दलित नेते, दलितांनाच लुबाडणारे ही दिसतात.

या कादंबरीत अनेक स्त्री पात्रे आलेली आहेत. ती ग्रामीण संस्कृतीतील अर्थमूल्यांना नीतिमूल्यांना आपापल्या परीने जपणारी आहेत. त्यात कबीरची आई गंगव्वा, डेप्युटी गोपाळची पत्नी, सुली, तारा इ. पात्रे येतात. या स्त्रिया खूप कष्ट करणा-या असून जीवनातील समस्यांवर मात करणा-याही आहेत.

कादंबरीतील सर्व व्यक्तिरेखांबद्दल महेंद्र सुदाम कदम लिहितात, "या सर्व व्यक्तिरेखा आपापल्या परीने जीवनाला आकार देण्याचा प्रयत्न करतात आणि त्याचवेळी स्वतःचे परखड आत्मपरीक्षणही करतात. यामुळेच शेडबाळे उपद्रव देत असला तरी आतून वचकून आहे, हे त्याला स्वतःला चांगले माहीत आहे. यातूनच सत्य नाकारून जगणा-या व्यक्ती कितीही गुंड असल्या तरी त्यांना आतून प्रचंड धास्ती वाटत असते, हे सनातन वास्तवही गवस यांनी शेडबाळेच्या रूपाने मांडले आहे. तसेच उपद्रवामुळे काहीकाळ अशा व्यक्ती प्रकाशझोतात येत असल्यातरी तो झोत अल्पकाळ असतो. हे कबीर, थळू आजा

यांच्या व्यक्तिरेखेवरून लक्षात येते. प्रस्तुत व्यक्तिरेखा अत्यंत स्वाभाविक जगत आहेत. त्यामुळे त्या त्या ठिकाणी त्या त्या व्यक्तिरेखा प्रभावी आणि परिणामकारकच ठरल्या आहेत. शेडबाळेची बायको तारा याचे चांगले उदा. आहे. नव-याने संसाराकडे दुर्लक्ष केले तरी ती कठीण प्रसंगी विरघळून जात नाही. तग धरून राहणे हा स्त्रियांचा खास धर्म तिच्या रूपाने कादंबरीत अवतरला आहे." (२२)

## (इ) नायक विचार

मराठी समीक्षेत कादंबरी या वाङ्मय प्रकारासंदर्भात नायक संकल्पनेत वेगवेगळे विचार दिसून येतात. अभिजातवादी कल्पनेनुसार नाटक हे उच्चवर्णीय, आदर्शवादी अनेक गुणांनी युक्त असे असावेत हे मानण्याची पद्धत असावी.

आशय आणि रूप या दोन्ही बाबतीत वास्तववादी साहित्याने आपला खास ठसा उमटवला आहे. सरंजामी साहित्यामुळे विषयवस्तूवर पडणारी बंधने वास्तववादी साहित्याने मोडून टाकली. राजेरजवाडे आणि समाजातील सत्ताधारी वर्गातील व्यक्तींच्या जीवनाचे, त्यांच्या मूल्यव्यवस्थेचे चित्रण ही प्रवृत्ती टाकून देऊन तत्कालीन खालच्या वर्गातील लोकजीवनाचे चित्रण करण्याची नवी पद्धत वास्तववाद्यांनी रूढ केली. मध्यमवर्गीय कनिष्ठ मध्यमवर्गीय आणि पुढे कामगार वर्गीय जीवनाचे चित्रण गांधीवाद, मार्क्सवाद यांसारख्या विचारसरणीमधून साहित्यातून दिसू लागले. हे चित्रण कल्पनाशक्तीच्या विभ्रमातून होत नाही, तर ती लेखकाच्या निरीक्षणाची निर्मिती असे मांडण्यात होऊ लागते. व्यक्ती समाजाशी ह्या ना त्या नात्याने बांधलेली असल्याने सामाजिक, आर्थिक नात्यांचे चित्रण होणे आवश्यक आहे हे गृहीत धरण्यात येऊ लागले. अभिजात वाङ्मयात केवळ मनोरंजनासाठी वापरण्यात येणा-या तळाच्या वर्गातील व्यक्तींना स्वत:चे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व या साहित्यातून प्राप्त होऊ लागले. विविध मानसिक आंदोलनापासून ते लैंगिक अनुभवांचे चित्रण करण्यापर्यंत विविधवस्तूंची व्याप्ती वाढली. वस्तुमय जगाच्या भरगच्च वातावरणातील व्यक्तींच्या चित्रणाबरोबर समूहांचे स्वतंत्र अस्तित्वही मांडण्यात होऊ लागले. हिरॉइक

नायकाच्या जागी आता गुंतागुंतीचे व्यक्तिमत्त्व असणारा, समाजाच्या नियमांनी बांधला गेलेला, तो नियम स्वीकारणारा, सर्वसामान्य जनतेच्या प्रतिनिधी नायक बनला.

मराठी कादंबरीक्षेत्रात 'यमुनापर्यटन' या सामाजिक वास्तववादी कादंबरीने 'यमू' सारखी नायिका चित्रित केली. त्यामागोमागच ह.ना.आपटे यांची 'पण लक्षांत कोण घेतो ?' अथवा वि.स.खांडेकरांच्या कादंबरीतील काही पात्रे, विभावरी शिरूरकरांच्या कादंबरीतील आबा यांना नायक पद मिळालेले दिसते. म्हणजे आदर्शाच्या संकल्पनेतून नायकाची कल्पना बाहेर येत. सामान्य माणसाला नायकत्व दिलेले दिसते. १९६० नंतर मराठी कादंबरीत नायकाची संकल्पना सामान्य माणसापर्यंत आलेली असली तरी "नायकाच्या भोवती जातीचे आणि वर्गीय भावनेचे वलय उभे करण्यात आले. चाकोरीच्या बाहेर पडणा-या नायकांचे नायकत्व अमान्य करण्यात होऊ लागले." (२३) त्या मधूनच मराठी कादंबरीच्या नायक संकल्पनेत प्रतिनायकाची चर्चा सुरू झाली.

या.वा.वडस्कर म्हणतात, "वाङ्मय कृतीमधील प्रमुख पात्र सामान्य माणूस असेल तर त्याला प्रतिनायक म्हणण्याचे प्रयत्न सुरू झाले. Anti-hero या शब्दाचा आज रूढ झालेला व शब्दकोशात ग्रंथित झालेला अर्थ (in fiction and drama) 'Protogonist lacking the traditional characteristics of a hero, such as courage and dignity) असा आहे. या सिद्धांतानुसार साहित्यकृतीत मध्यवर्ती स्थान असलेल्या प्रति-नायकात धैर्य व धीरोदात्त हे गुण नसतात. दुस-या शब्दात हे गुण फक्त पारंपरिक नायकात म्हणजेच प्राचीन कालीन राजे-महाराजे इत्यादींच्या नायक वर्गातच असतात. सर्वसामान्य माणूस मात्र भेकड, साहसशून्य, मूल्यविहीन इत्यादी असतो." (२४) म्हणजेच प्रतिनायक हा पारंपरिक नायक कल्पनेनुसार मूल्य नसलेला भित्रा, भेकड, असतो, असे मानावे लागते. हे गुणधर्म राजे-महाराजे उच्चवर्णीय इ.च्याच अंगात असतात. हे तत्त्व स्वीकारावे लागते. प्रत्यक्ष मानवी जीवन व्यवहाराकडे पाहिले तर अनेक सामान्य माणसांच्या अंगीही आपल्याला वरील गुणांच्या आढळ होत असतो. जीवनाच्या संघर्षाशी दोन हात करण्याचे धैर्य, माणसांविषयीची अनुकंपा आपण घेतलेल्या

निर्णयाचे परिणाम स्वीकारणारी नैतिकता सामान्य माणसाच्या अंगीही दिसून होते. त्यांच्या कृतीयुक्तीत आपल्याला जगण्याच्या उमदेपणा अनेक साध्यासाध्या प्रसंगातून दिसून येतो.

या दृष्टिकोनातून पाहिले असता भालचंद्र नेमाडे नायक संकल्पनेविषयी लिहितात, "मराठी समीक्षेत ह्या कादंब-याच्या नायकांना अस्तित्ववादी, प्रतिनायक अशा प्रवृत्तींनी संबोधलेले दिसते. हिंदु समाजरचनेत ह्या प्रवृत्ती टिकण्याची-जन्मण्याची अर्थातच शक्यता नाही. खरे तर हे नायक मधल्या काळातल्या आंग्लवसाहतवादी प्रवृत्ती झुगारणारे परंपरेतले, पद्मनजी ते साने गुरूजी ह्या वाङ्मयीन परंपरेतले आहेत. ह्या नायकांजवळ ध्येयवाद, उदात्तता, मानवतावाद, प्रीती, प्रणय इ. खोटे वसाहतवादी चलन नव्हते, हीरोगिरीला आवश्यक रीतीवादी-लैंगिक पुस्तकी धाडस नव्हते. कारण हिंदु वास्तवात ह्या गोष्टी सापडत नाहीत. व्यक्ती व समाज यांच्यामधील समस्यांबदूल भाषिक कृती मांडणा-या ह्या नव्या कादंब-यांची पात्रावर भिस्त नव्हती, तर पात्रांभोवतीच्या सामाजिक आवरणावर, व्यक्ती व समाज ह्यांच्यातील परस्परावलंबी नात्यावर भिस्त होती. ह्या नायकांमध्ये असणारी परात्मतेची जाणीव मराठीत पहिल्यांदा दिसते, हे विधानही कादंबरीपुरतेच खरे आहे. मराठीत तेराव्या शतकापासून कित्येक कवींना परात्मता आली होती. समाजाभिमुख होणे हा हिंदु सांस्कृतिक गुणधर्म पूर्वीच्या परात्मतेत होता तसाच आताही आहे. अराजकतेऐवजी व्यवस्थेकडे ह्या नायकांचा कल आहे." (२५)

या नायक संकल्पनेप्रमाणे विचार केला असता राजन गवस यांच्या कादंब-यांमध्येही सामान्य माणूस हाच मुख्य व्यक्तिरेखा म्हणून आलेला दिसतो. 'चौडकं' मधील सुली ही लहानसा शेततुकडा असलेल्या सुबान्याची मुलगी असते. घरातील अडचणी आणि सुलीच्या डोक्यात दिसलेल्या जटा यांचा परंपरेनुसार चालत आलेला अर्थ लावत सुलीला देवदासीच्या वाटेने जावे लागते. किरकोळ शेतक-याची ती मुलगी असली तरी त्यांच्या घराण्यात नैतिकतेच्या कल्पना प्रखर आहेत, हे आजोबांनी आत्याला डोंगरावरून खाली ढकलून दिल्याच्या संदर्भाने कळते. आज सुली देवदासी संदर्भातील समाजाची कल्पना दृष्टिकोण आणि वर्तन व बायजाची तिच्या पाय न घसरण्याची चिंता यांच्या घुसमटीत

सुलीचे जगणे कोंडते, घुसमटते. तारूण्य सुलभ भावनांना शरण जात सुलीला दिवस गेले तरी ती आपल्या वर्तनाला धैर्याने सामोरी जाते. लहानपणी खेळातून पळून जाणारी तरूण सुली आलेल्या परिस्थितीतही मागे न फिरता धैर्याने समोर जाते सुली आणि शेवंताआक्काच्या संवादातून हे आपल्याला दिसते.

सुली आणि शेवंताआक्काच्या संवादामध्ये सुलीला शेवंताआक्का सांगते,

"खुळी हाईस लेकी. आसं नसतंय. आपुण देवांच्या रांडाऽऽ आपल्या बरबर संसार कोण करील ? आसलं खूळ काय धरू नगस. सरळ मोकळी हो जा ऽऽ" शेवंताआक्का कळकळून बोलली. सुली एकदम भ्याली. तिच्या आंगचं पाणी पाणी झालं. तिला शेवंताआक्काला वरडून सांगाव असं वाटाय लागलं – "मी तसं कारणार न्हाई..." तिन मनाला आवरलं, तशीच कोलमडून बसली. तिच तोंड व्याकुळ झालं. डोळ्यातून एकाएकीच पाणी गळाया लागलं. हुंदका आवरत शेवंताआक्काला सांगितलं, "मी मोकळी व्हणार न्हाई ऽऽ" शेवंताआक्का तिच्या डोळ्याकडं बघतच बसली." (पृ.१४४) लहानपणी खेळातून पळून जाणारी तरूण सुली आलेल्या परिस्थितीतही मागे न फरता धैर्याने सामोर जाते. सुली आणि शेवंताआक्काच्या संवादातून हे आपल्या दिसते.

सुली ज्या देवदासींच्या बरोबर वावरते त्यामध्ये परिस्थितीशरणतेने आलेल्या अनेक गोष्टी दिसत असल्या तरी शेवंताआक्का किंवा तानू आजी ह्यासारख्या देवदासी आपले सत्त्व जपताना दिसतात. राजन गवस यांच्या ह्या कादंबरीतील सुली ही अति सामान्यवर्गातील असली तरी तिच्यामध्ये हे जे धैर्य दिसते. ते प्रतिनायिकेसारखे नसून नायिकसमकल्पनेतच मोडणारे दिसते. सुलीचे सुंदर असणे हा मात्र ह्या संदर्भात विचार करायला लावणारा घटक आहे. समजा सुली सुंदर नसती तर तिचे आयुष्य वेगळे झाले असते कां ? किंबहुना तिच्या सुंदरतेमुळे बबन्याच्या तिच्याशी असणा–या वर्तनात फरक पडलेला दिसतो का ? किंवा ती सुंदर असल्यामुळे बबन्या तिच्याशी सर्वसंकेत मोडून तिच्याशी लग्न करतो का ? असे काही घडताना दिसत नाही. कदाचित नायिके विषयीच्या पारंपरिक संकेताचे प्राबल्य त्यांच्या पहिल्याच कादंबरीमध्ये उमटलेले दिसते. यर्थात ही

सांकेतिकता त्यांच्यात देवदासींच्या जीवनचित्रणावर कुठेही फारशी कुरघोडी करताना दिसत नाही.

राजन गवस यांच्या कादंबरीतील नायक हे आपल्याच भूपरिसरातील माणसांच्या जगण्याच्या परंपरेतून आलेले आहेत. त्यांच्या भोवतीचे सामाजिक पर्यावरण व्यक्ती आणि समाज यांच्या परस्परसंबंधनात्यातून त्यांचे जगणे प्रकट होते. त्यात आपल्या परंपरेतील समाजाभिमुख प्रवृत्ती दिसून येते. तायाप्पा हा अधिक संवेदनशील माणूस स्वत:च्या जीवनात घडणा-या प्रत्येकच घटनांचा विचार त्यांचे मन सूक्ष्मपणाने करत असते. भल्याथोरल्या कुटुंबातून त्याला 'जोगता' म्हणून सोडणे. बाकी त्यांनी त्याच्याकडे कुत्सिंत नजरेने पाहणे, रत्नव्वासी त्याचे गाढ संबंध, घरातील भांडण, तायाप्पाचे घर सोडून जाणे, जोगत्यांच्या समूहात जगणे, त्यामधील त्याची गाढ गुंतवणूक, अत्याचाराने अनेकदा झालेली परात्मता, लिंगजाणिवेनी मानसिकतेत होत असलेले सूक्ष्म परिवर्तन सारूष धैर्याने अनुभवतो, जगतो. तायाप्पाच्या या सूक्ष्म संवेदनशीलतेमुळे, माणसाकडे सहानुभूतीने पाहणारे, त्याच्या जगण्यात परिवर्तन आणू पाहणारे, विचार, चळवळ तो स्वीकारू शकतो. तायाप्पाचां हा मानसिक प्रवास गवस यांनी फार सूक्ष्मपणाने रेखाटलेला आहे.

तानाक्कच्या मृत्यूनंतर तिच्या गादीवर बसलेला तायाप्पा ही शोषणाची परंपरा चालू देत असला तरी मास्तरांच्या संपर्कात आल्यानंतर मात्र तो ही परंपरा पुढे न नेण्याचा निर्धार करतो. तायाप्पाला दाखवायला आलेला परीट आणि त्याचा मुलगा यांना सांगतो "पोराला कायच व्हयायला नाही. चांगल्या डाकदाराला दाखीव – देवाकडं परत जावू नको. वाईट व्हईल...." (पृ.२०९) तायाप्पाचे हे नैतिकभान त्याची मानवतावादी जीवनशैली प्रगट करते. त्यामुळे नेमाडेंनी वर प्रगट केलेली नायकाबदलची भूमिका तायाप्पाला लागू पडते.

'धिंगाणा' मधील चेअरमन हा बाह्यत: थोडासा विक्षिप्त असा वाटतो. तो तसा सुस्थितीतील शेतक-याचा मुलगा घरातले भाऊ नोकरी करणारे, पण श्रीमंत घरातला नाही, म्हणजे या अर्थाने तो ग्रामीण घरातला सामान्यवर्गाचा प्रतिनिधीच. पण चेअरमन आणि त्याचाच मुलगा. त्याचे वेळीअवेळी घरी येणे, माळरानावर तासनतास बसणे. हे एक प्रकारे

व्यवस्थेला प्रतिकारात्मक आहे. ह्या प्रतिकारात्मकतेमुळे या कादंबरीतील भाषा उपरोधिक होते. पण त्याच्या या व्यवस्थेच्या विद्रोहामागे, विक्षिप्त वाटणा-या वर्तनामागे अंत:स्तरावर समाजाच्या भ्रष्टतेबद्देल, मूल्यविहीनतेबद्दल, ढोंगीपणाबद्दल, उद्वेग, चीड आणि संताप आहे. उदा. कांबळे मास्तरच्या मटका लावण्याच्या धंद्याविषयी गावातील चेअरमन आणि अन्य तरूणमंडळी उच्च अधिका-यांना तक्रार करायची ठरवितात. तेव्हा "मग शिक्षणाधिका-याकडे तक्रार करायची", बबल्यानं डोकं लढवल. "खुळंच हाय तेच्या आयला. त्या काळूमास्तर विरूद्ध तक्रार केली, काय झालं ? शिक्षणाधिका-यानं उपडली त्याची लेका, साखळी असती त्येंची उलट काळू मास्तर काल समोरनं आला. माझ्यासमोर आल्यावर मिश्या पिळाय लागलां. काय झेटं झाली काय ? अशा डोळ्यानं बघाय लागला. मारल्यागत पुढं झालो. लांब जाईपर्यंत मागं बी बघितले नाही आणि कांबळ्यावर तक्रार करून काय करणार ? बाबल्यासमोर मी प्रश्न टाकला. बाबल्या थंडगार." (पृ.६८) या भ्रष्टाचाराशी त्याला विद्रोह करावयाचा आहे ही मूल्यविहीनता त्याला अमान्य आहे पण चेअरमन आणि त्याचे त्याच्याच सारखे मित्रगण या मूल्यविहीनतेशी लढा देऊ पाहतात तो परत प्रस्थापितांचाच मार्ग असतो या दृष्टीने चेरमन हा संभ्रमित अवस्थेतला नायक वाटतो. उदा."गोठणाचा चेरमन ! म्हणत मी भन्नाट हसलो की समोरचा माणूस एकदम गोंधळायचा. मग मला एकदम ग्रेट वाटायचं. डोक्यातून काय केलं तरी हे सगळं जाईना. तळ्याच्या काटावर आलो. सगळं गाव समोर. घरांची गर्दी. गल्ली, गल्ली डोळ्यासमोरून सरकाय लागली. मग चावडीवर नजर स्थिरावली. चावडी पेटवून टाकावी, असा भन्नाट विचार डोक्यातून वर आला. डोकं जरासं उतरलं. तडक चावडीवर आलो तर चावडीवर निवडून आलेली मंडळी मला बघीतल्या बधीतल्या त्यांची चर्चा थांबली." (पृ.२६५)

'कळप' मधील रघू चिलमी या नायकाची निर्मिती ही साठोत्तरी काळातील तरूणांच्या तत्कालीन धारणेमधून झालेली दिसते. रघू चिलमी हा नव्याने लेखन करणारा तरूण, कॉलेजमधले मित्र, प्राध्यापक निरनिराळ्या चळवळी यांच्यात वावरणारा नायक आहे. कॉलेजच्या या वर्तुळातील माणसांचा परीघ विस्तारत जाऊन समाजातल्या अनेक

वेगवेगळ्या लोकांशी संवाद साधण्याचा त्याचा प्रयत्न आहे. शैक्षणिक वर्तुळातल्या ह्या भिंगातून समाजाचा होणारा -हास तो पहात राहतो. उदा. रघू सांगतो,

"गाईडात लोक काहीही लिहितात. कशी वाचवतात कोण जाणे. जगण्याची गाईड तयार झाली पाहिजेत. माणसांची गाईडं केली पाहिजेत. गाईडंच गाईड."

"नुस्तं गाईड आणि गाईड." (पृ.२९३) भारतीय समाजातील अनेक जातिधर्मांची त्याची कल्पना ही सामग्र्याची आहे. म्हणून तो दिलावरला त्यांच्या प्रश्नांसह, कोंडीसह समजून घेऊ शकतो आणि त्याच्या लिखाणातून दिसू लागलेल्या धार्मिक पक्षपाती दृष्टिकोनातून संतापून ही जातो. उदा. रघू आणि दिलावरचा भारतीय मुसलमानांविषयीचा संवाद – "हुतात्मा पार्कात वातावरण एकदम तापलं. संकेश्वरीनं दिलावरच्या कथेवर जोरदार हल्ला चढवला. शिरगावकर दिलावर हा जातीयवादी विचार करतो असं तावातावानं म्हणाय लागला. मग सरांनी हस्तक्षेप केला. म्हणाले, दिलावरनं मुसलमान समाजाचं चित्रण कथेत बारकाईन केलेलं आहे. कथेचा नायक संवेदनशील आहे. त्यामुळं चाललेल्या घटना त्याला बोचतात. त्यामुळे तो त्यावर तिखट प्रतिक्रिया व्यक्त करतो. त्या नाटकाच्या प्रतिक्रिया आहेत. दिलावरच्या नव्हेत. हे पहिल्यांदा समजून घेतलं पाहिजे आपण घोटाळा इथंच करतो. उलट ही मुस्लिम जीवन चित्रित करणारी महत्त्वाची कथा आहे. तर शिरगावकर म्हणाला, हमीद दलवाईच्या कथा ह्या कितीतरी चांगल्या जीवन मांडणा-या कथा आहेत. दिलावरला तसं जमणं कठीण. दलवाई वाचा. आता गप्प बसणंच कठीण. म्हणालो, मुळात दिलावरची कथा तुम्हाला समजलीच नाही. दिलावरची मुस्लिम लोकांच्या विरोधात भूमिका न घेता तो त्या समाजातील दोषांवर बोट ठेवतो आणि त्याबरोबरच हिंदूंच्या चुकाही तो सगळ्यांसमोर ठेवतो. पण दलवाई मुसलमान असणं नाकारतात आणि साहित्य मांडतात. हे मला खटकतं............ डोकं एकदम सणकलं. पुन्हा आवरलं आणि मग शांतपणे म्हणालो, शिरगावकर वाचलेलं बडबडायची मला सवय नाही. ही पहिली गोष्ट आणि स्वत:च्या विचाराबाबत म्हणाल तर ही कथा राहू दे बाजूला पण मला ह्या देशातला मुसलमानही हिंदू इतकाच जुना वाटतो. ह्या देशावर तुमच्या जेवढा अधिकार आहे तेवढाच ह्या देशातल्या

मुसलमानांचाही आहे. मग त्यांना हाकलण्याची भाषा करण्यात काय अर्थ ? आणि मुसलमान जेवढे धर्मांध आहेत तेवढे हिंदूही आहेत. हे स्वीकारायची तयारी ठेवा. उलट दिलावर सारख्यांनी मी या देशाच्या मुसलमान नागरिक आहे. तुमच्या इतकेच ह्या देशावर आमचेही प्रेम आहे. अशी भूमिका घ्यायला पाहिजे." (पृ.७९-८०)

या मूल्य-हासाकडे उघडया डोळ्यांनी पहात आपल्या जगण्याचा समाजातूनच जाणारा असा मार्ग तो निवडत राहतो. त्याचा मार्ग आहे माणसाने माणसाला समजून घेण्याचा, माणसाने माणुसकीने वागविण्याचा बलुतेदार भेटायला आल्यावर मागच्या अप्रिय प्रसंगाने रघूला राग आलेला पण त्याची अडचण जाणून, "मग इतक्या वयाच्या माणसाशी कशाला वाईट वगायचं हा विचार एकदम प्रबळ होत गेला." (पृ.१७५)

रघू लेखक असल्याने कादंबरीत साहित्य संमेलने, तालुक्यापातळीवरील विविध साहित्य संस्थांचे कारभार, लेखकांच्या वर्तनातील जगणे आणि लिहिणे यातील अंतर, लोकसाहित्य आणि मौखिक साहित्य यातील वाङ्मय, नेमाडेसारख्या लेखकांना तरूणांवर असणारा प्रभाव या सर्व पाहण्यामधून आणि चर्चामधून रघूचा विद्रोहीपणा आणि त्याने मूल्यविहीनतेला केलेला प्रतिकार आणि त्याची नैतिक भूमिका प्रकट होते. उदा. रघू सांगतो, "मग खेडयातल्या लोकगीतांची, कथांची, भजनाची, गोंधळाची, तमाशाची संस्कृती कशाची म्हणायची?

ते लोकसाहित्य झालं.त्याचा आणि वाङ्मयीन संस्कृतीचा तसा सरळ संबंध नाही. आता अभ्यासक दूरान्वयानं संबंध जोडताहेत. पण त्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. लेखकाला लोकसाहित्याचा अभ्यास असण्यापेक्षा वाङ्मयाच्या आकृतिबंधांचा अभ्यास असणं गरजेचं." (पृ.२८९) तिथे लेखकाच्या ढासळत जाण्या-या नैतिकतेबद्दल तो सांगतो, "........ पत्रिकेत नाव घालण्यासाठी पानकेना पार्टी द्यावी लागली तर आपण देऊन टाकू. ह्याचा अर्थ काय ? पानकेनं ह्याआधी पाटया काढल्या असल्या पाहिजेत. मग त्याची भट्टी लावायचीच. याच्यावर आमचं जोरदार एकमत झालं. साले कशातही पैसे मिळवतात. दारवा काढतात. बायका फिरवतात. ह्यांना लेखक तरी कसं म्हणायचं ?" (पृ.३७१)

'कळप ' मधल्या रघू चिलमीने कोणती कृतिशीलता प्रकट केली हा प्रश्न विचारल्यास रघूला कृतिशील नैतिकतेचे झुकते अधिक माप द्यावे लागेल. वाङ्मयीन चळवळीतील त्याची मते आणि पानकेंचे वर्तन पाहता संमेलन रद्द करण्याची ठाम भूमिका, त्याचे शंकर याला मदत करणे कुठल्याही कळपात न शिरता स्वतःच्या भूमिकेशी प्रामाणिक राहण्याची कृती करणे या मधून त्याचे नायकरूप प्रकट होत राहते. महागावकरांसारखी बडी आसामी पाठीशी असतानाही कुणालाच विकले न जाण्याच्या वृत्तीमुळे आपले अस्तित्व तो स्वतःच्या हिंमतीवर पेलताना दिसतो. आपले अस्तित्व आपल्या जगण्याच्या प्रामाणिकतेवर तोलण्याची रघू ही जगण्याची वृत्ती महत्त्वाची असून कादंबरीच्या अखेरीस लेखनातील खोटेपणापेक्षा मूल्यात्मक जगण्यावरील निष्ठा प्रकट करते. रघू चिलमीच्या मानाने 'तणकट' मधील कबीर हा प्रत्यक्ष परिवर्तनाचे काम करताना दिसत नाही. दलित समाजातला, महारवाडयातला महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेला कबीर आपल्या सभोवतालच्या समाजात घडणा-या अनेक घटनाप्रसंगांचे, विचारप्रणालींचे वैचारिक वादविवादांचे सूक्ष्मतर आकलन करणारा आहे. सत्यपाल धर्मरक्षी यांच्या भाषणाच्या प्रसंगात कबीरची वैचारिकता दिसून येते. "अखेर सत्यपाल धर्मरक्षी यांनी आपले व्याख्यान संपवले. शेवटपर्यंत त्यांनी 'आंबेडकरांनी धर्मांतर का केलं ?' या प्रश्नाला स्पर्श करण्याचे टाळले. शेवटी शेवटी तर त्यांनी आपण करत असलेल्या दलित उद्धार चळवळीचा पाढा वाचून आपले आत्मकथन करणे पसंत केले. त्यामुळे त्यांचे व्याख्यान संपल्यासंपल्या टाळ्या बाजवण्याच्या फंदात फारसे कोणी पडले नाही. सगळे पटापट बाहेर पडले आणि प्राचार्य तवंदीकरानी निश्वास टाकला.

'साले हे तुमच्यातले विद्वान म्हणवून घेणारे लोक अभ्यास न करता काहीही भंपक बोलत असतात आणि आंबेडकरांना छोटं करतात. असं मला वाटाय लागलंय'. कबीर शेजारी नेहमी बसणारा मोहन बल्लाळ कार्यक्रम संपवून बाहेर पडता पडताच म्हणाला. कबीरला त्याचं म्हणणं ह्या व्याख्यानापुरतं तर पटलेलं होतं. फारच उथळ आणि भंपक बोलला

प्राध्यापक सत्यपाल धर्मरक्षी पण. त्यानं ते सरळसरळ मोहन बल्लाळ समोर कबूल केलं नाही." (पृ.३७)

दलित, ग्रामीण, चळवळी त्यातील राजकारण, सत्तास्पर्धा, अर्थकारण, शोषण प्रक्रिया, दृष्टिकोन काय बिघडले आहे हे दाखवून देणारा आहे. कबीर सांगतो, "आपल्याला दिल्या जाणा-या सवलतीत याचं उत्तर आहे. आमच्या माणसांना सगळं फुक्कट पायजे. तेही जलद पाहिजे. फुक्कट काहीही मिळवून घेणं हा आपल्याला फार मोठा आनंद असतो. त्यामुळे जो जो फुक्कट देण्याच्या भरभरून घोषणा करील त्याच्या पाठीमागं जाण्यात आमच्या माणसांना मोठेपणा वाटतो. त्यांना सगळं तयार, फुक्कट आणि जलद मिळालं की खूश. घेणं वाईट आणि देणारा तो उपकाराखातर देतो. त्यातून मिंधेपणा येणार, हा विचार करायला आमच्या माणसांना सवड नाही. उलट घेण्याची आपली परंपरा बलुत्यासारखीच की. सततच्या अन्यायाचा हक्क म्हणून सवलती ही गोष्ट मला मान्य आहे. पण सवलती मागची भूमिकाच आम्हाला कुणी सांगितली नाही. त्यामुळं मिळेल ते ओरबाडत सुटायचं, ही प्रवृत्ती आमच्या नेत्यात आली आणि नेते आमच्या माणसांनाच ओरबाडून खात सुटले. फक्त आता ते हुशारी कराय लागले. आपल्या समाजाला ओरबाडून खायचं पण खाण्याआधी, म्हशीला दूध काढण्यापूर्वी भरडा देवतात तसं काहीतरी ठेवत राहायचं हे शहाणपण त्यांनी मलावलय आणि हे शहाणपण तुमच्याजवळ नसल्यामुळं माणसं त्यांच्याकडं जातात. तुमच्याकडं येत नाहीत." कबीर थांबला. त्याला मोकळं वाटलं. (पृ.२१४) त्याचे एकांगी भरकटलेले रूप गौत्यामधून दिसते तर अधिक थोर परिपक्वरूप मोहन बल्लाळ मधून दिसते.

शेडबाळेपासून महारवाडयाला वाचविण्याचा त्याचा प्रयत्न सफल होत नाही पण स्वत:ला मात्र यापासून उग्र भूमिका घेत तो बाजूला ठेवू शकतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला अशा काही घटना- प्रसंगांच्या मधून जगण्याच्या अस्सलतेच्या आणि नायक कृतीचा भाव प्रकट होतो. समाजातील फोकावलेली अनिष्ट प्रवृत्तींची 'तणकट' उपटून टाकणारी ही वृत्ती तणकटांची जाणिव आपल्या कलाकृतीच्या द्वारे निर्माण करतो. जीवनाकडे अत्यंत गंभीरपणे

पाहण्याचा मूल्यनिष्ठ नैतिक संस्कार या कादंबरीतून केला जातो. समाजातील अनेक पातळीवरचा अनेक माणसे उभी करत त्यांच्या क्रिया प्रतिक्रियात्मकतेमधून 'तणकट' मधील कबीर आपल्यासोर उभा राहतो.

## (ई) निवेदक विचार

कथा, कादंबरीमध्ये पात्रे ही त्यांच्या परस्पर संबंधात निर्माण झालेल्या जगात वावरत असतात. हे संबंध विशिष्ट अशा मूल्यव्यवस्थेवर आधारित असल्यामुळे पात्रांची कृती ही निश्चित होत जाते. तेव्हा लेखक त्याची सर्जनशीलता, कलात्मकता, साहित्याच्या रूपबंधातून दाखवतो. या रूपबंधाच्या मदतीने लेखक वाचकांना या पात्रांच्या विश्वाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पहावे, हे सुचवतो. हा रूपबंध म्हणजेच लेखकाने या पात्रांच्या मूल्यविश्वावर केलेले अप्रत्यक्ष भाष्य असते. या रूपबंधाचा विचार केला तर कथानकाचा निवेदक, त्याचे निवेदन या निवेदनातून केलेली कार्ये या महत्त्वाच्या गोष्टी असतात.

उषा हस्तकांच्या मते, "कादंबरीच्या रचनेत भाषिक निवेदनाला अतिशय महत्त्व आहे. त्याचे कारण तिचा समग्र पट वाचकांसमोर उलगडण्यासाठी निवेदनाशिवाय दुसरा पर्याय नाही." (२६) कादंबरीच्या रचनेतील सर्व घटकांची माहिती त्यांचे दृष्टिकोण त्यांची मांडणी करण्यासाठी 'निवेदन' हे एक साधन लेखकाजवळ असते. लेखक निवेदनाच्या तंत्रात विविध प्रयोग करीत असतात. या निवेदनाचे सूत्र लेखकाजवळ असते. काहीवेळा कादंबरीतील एका पात्राकडे किंवा अनेक पात्रांकडे निवेदनाचे सूत्र असते, तर काहीवेळा कादंबरीमधील पत्रे, डायरी आणि इतर माहितीचे निवेदन या सगळ्यांचा एकत्र उपयोग केला जातो. काहीवेळा कादंबरीत एकाच विशिष्ट कालावधीत वेगवेगळ्या व्यक्तींच्या संदर्भात घडणा-या घटनांचे निवेदन कालानुक्रमाने केले जात नाही. तर काहीवेळा कादंबरीतील निवेदन म्हणजे प्रसंगांची मालिका असते. मुख्यत्वे कादंब-यांमध्ये वर्तमानकाळात घडणा-या घटनांचे कालानुक्रमाने निवेदन आलेले असते. निवेदनाच्या संदर्भात कादंबरीकार नावीन्यपूर्ण आणि अर्थपूर्ण असा प्रकार प्रयोगात आणतात. तरी पुष्कळशा कादंब-यांमधील निवेदन पारंपरिक स्वरूपाचे म्हणजे कादंबरीमध्ये वर्तमानात

घडणाऱ्या घटनांचे कालानुक्रमी निवेदन असते.

कादंबरीकार कादंबरीचा एक समग्र पट त्याच्या निवेदनातून वाचकांसमोर उघडत असतात. त्यामुळे हे निवेदन कसेही करून चालत नाही. कादंबरीतील एकात्मता आणून देण्याचे कार्य 'निवेदका'लाच करावे लागते. उषा हस्तकांच्या मते, "यासाठी कादंबरीकार तीन सूत्रांचा आधार घेतात." (२७) त्यामध्ये कादंबरीत घडणाऱ्या घटना ज्या विशिष्ट काळात घडतात. त्याचा उपयोग करून 'काळा'चे एकसूत्र कादंबरीकार आपल्या हाती ठेवतात. यामुळे कादंबरीतील घडणाऱ्या घटनांचे निवेदन सलगपणे करता येते. काहीवेळा एका विशिष्ट काळातील घटना ही अनेक व्यक्तींच्या संदर्भात घडत असतात. या अनेक व्यक्तींच्या संदर्भात घडणाऱ्या घटनांचे निवेदन एकाचवेळी करणे शक्य नसते. अशावेळी कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा केंद्रस्थानी ठेवून तिचे अन्य व्यक्तीशी असणारे तिचे संबंध जोडून या मुख्य व्यक्तिरेखेचे सूत्र प्रारंभापासून अंतापर्यंत कायम ठेवले जाते. तसेच कादंबरीमध्ये घडणाऱ्या घटना या व्यक्तींच्या संदर्भातच घडत असतात. त्याला काही कारणे असतात. संपूर्ण कादंबरीतून कादंबरीकार एक परिमाण साधित असतो. त्याच्यावर अधिक लक्ष देऊनच त्यांचे निवेदन केले जाते. त्यामुळे या घटना घडण्यामागेही कार्यकारणभाव असतो. या सूत्रामुळे या घटनांचा परस्परांशी संबंध जुळलेला असतो. त्यामुळे या निवेदनात गती येते." (२८) असे उषा हस्तक सांगतात.

कादंबरीमध्ये घडणाऱ्या घटनांचे घडामोडींच्या तपशीलाशी प्रमाण किती ठेवावे याकडे कादंबरीकाराला निवेदन करताना लक्ष द्यावे लागते. कादंबरीत योग्य असे चित्रण करण्यापुरते तपशील देण्यासाठीचे वर्णन आलेले असते. काहीवेळा अधिक तपशिलामुळे कादंबरीचे वाचन कंटाळवाणे होते. तेव्हा या तपशिलाचे निवेदन प्रमाणात आणि अर्थपूर्णतेचे असावे लागते.

निवेदकाचे महत्त्वाचे कार्य म्हणजे कथानकात निवेदन करणे हे असते. त्याशिवाय कथानकातील पात्रांचाही तो परिचय करून देतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना देतो. उदा. 'तणकट' मध्ये सुली या व्यक्तिरेखेचे वर्णन, "सुली रामा म्हाराची बायको. रंगानं काळी

सावळी असली तरी ठेवण तशी उजवीच होती. लग्न होऊन म्हारवाडयात आली तेव्हा आडदांड रामाला बायको मात्र फैना मिळाली, अशी चर्चा सगळ्यांच्याच तोंडात होती. लग्न झालं तेव्हा साधारण किरपण असणारी सुली लग्नानंतर सहा महिन्यात हळूहळू बदलत गेली. फाटक्या-तुटक्या लुगडयातूनही तिचा बांधा तसा उठूनच दिसायचा. खायला-प्यायला नसणा-या घरात जरी ती पडली असली तरी राबायला चांगली खवट होती. त्यामुळं गावातल्या कुणाच्याही बांधाला गेल्यावर कधी उलटा शब्द ऐकायला मिळाला नव्हता. उलट ती कामाला यावी म्हणून रामा म्हाराला जो तो मिणत्या करून आपल्यात कामाला घेऊन जायचा. सुली कामाला कुणाच्यातही गेली तरी वरमान काढून बोलायची नाही. कामात कधी अंग राखून राहायची नाही. त्यामुळं गावातल्या बायका तिला विशेष जवळ करायच्या. "(पृ.३१)

निवेदक कथानकात घडणा-या घटनांचे अर्थ काढून, त्यांची सुसंगती स्पष्ट करून वर्णनेही करत असतो. उदा. 'धिंगाणा' मध्ये "आबा पाटलानं आपल्या पोरग्याचा-आंधाचा अर्ज पोलीस पाटलासाठी भरून टाकलाता. म्हणजे पाटलांच्या पार्टीतनं आंधाशिवाय कुणाचा अर्ज जाणं शक्य नव्हतं, उलट आबा पाटलानं प्रत्येकाला तंबी देऊन अर्ज करू नका म्हणून सांगायला सुरवात केली होती." (पृ. ३४)

प्राथमिक स्वरूपात निवेदकाचे दोन प्रकार असून कथानकातील पात्रच कथानक सांगण्याचे कार्य करते. ज्याला 'कथांतर्गत निवेदक' म्हणतात. हा एक प्रकार तर कथानकाच्या बाहेरून जो कथानक निवेदन करत असतो. ज्याला 'कथा बाह्य निवेदक' म्हणतात. हा दुसरा प्रकार. (२९) असे हे दोन प्रकार श्री हरिश्चंद्र थोरात यांनी सांगितलेले आहे.

किशोर सानप यांच्या मते तर "प्रायोगिक कादंबरीमध्ये वापर केल्या जाणा-या तंत्रापैकी एक तंत्र म्हणजे लेखनतंत्र. या लेखनतंत्रामध्ये लेखनाच्या दोन वेगळ्या पद्धती आहेत. यामध्ये आत्मनिवेदन स्वरूपाचे म्हणजे प्रथमपुरूषी लेखन पद्धती आणि लेखकाने त्रयस्थाची भूमिका घेऊन केलेले निवेदन म्हणजे तृतीयपुरूषी लेखन पद्धती होय. काहीवेळा

या दोन्ही पद्धतीमध्ये लेखकाचे एक स्वतंत्र पात्र ही दिसू शकते. काहीवेळा स्वतंत्र निवेदन या तंत्राचा प्रयोग म्हणूनही वापर केला जातो. तर काहीवेळा दोन्ही निवेदन पद्धती ही एकत्र करून मिश्र निवेदन पद्धती वापरली जाते. म्हणजेच प्रथमपुरूषी निवेदन आणि तृतीयपुरूषी निवेदन यांचा मिश्र पद्धतीने वापर केला जातो. " (३०)

निवेदकाच्या भूमिकेबद्दल किशोर सानप लिहितात. "प्रायोगिक कादंबरीत कादंबरीकार निवेदक पात्रांच्या माध्यमातून आपली नैतिक भूमिका मांडत असतो." (३१)

राजन गवस यांच्या कादंब-यांचे निवेदन पद्धतीचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे. तृतीयपुरूषीचे निवेदन - 'चौंडकं', 'भंडारभोग', 'तणकट'. प्रथमपुरूषी निवेदन - 'धिंगाणा', 'कळप'.

श्री प्रभाकर वासुदेव बापट आणि श्री नारायण गोडबोले लिहितात, "प्रा.कुलकर्णी यांनी 'कादंबरी रचना' या पुस्तकात प्रा.वा.म.जोशी यांच्या एका लेखाच्या आधारे 'स्वमुखी कथन', 'पात्रमुखी कथन' व 'पत्रात्मक कथन' असे या पद्धतीचे वर्गीकरण केले आहे." (३२) इतकेच नाहीतर त्यांच्या मते, 'कादंबरी लेखनात लेखक स्वत:चे अस्तित्व झाकण्यासाठी कथानकातील पात्रांमधील एखाद्याशी किंवा अनेकांशी तादात्म्य पावला तर त्या नायकाच्या आत्मचरित्राचे रूप कादंबरीला येते. या पद्धतीला आत्मनिवेदनपर कादंबरी म्हटले जाते. यामध्ये "आत्मनिवेदन हे लेखकाचे नसून ज्यापात्राशी तो तादात्म्यता पावला त्याचे असते." (३३) याचा प्रत्यय राजन गवस यांच्या 'धिंगाणा', 'कळप' या कादंब-यातून येतो. उदा. 'धिंगाणा' मध्ये "भर दुपारी जाग आली. डोळे उघडून बघीतलं तरीही मी कुठं आहे हेच कळेना. जरासं अंग ताणलं. लांबलचक जांभई दिली. पूर्ण शुद्धीवर आल्यावर समजलं. आपण झोपलेल्या ठिकाणीच, भोगनाळी लॉजमध्ये आहोत. उठून भिंतीला टेकून बसलो. पुन्हा अंग ताणून आळस झटकला. घराकडं जाऊन काय होतंय बघावं ? असा ब-याच जणांचा सल्ला. पण घरात पाय टाकायचा नाही, हा माझा निर्णय. अर्थात हा निर्णय तसा बरोबर आहे, असं अजिबात नाही." (पृ. २६४-२६५) हे आत्मनिवेदन.

या प्रकारात लेखक कथानकातील एखाद्या पात्राशी समरस झाल्यामुळे तो अनेकांगी आणि व्यापक अशी दृष्टी न ठेवता एकाच दृष्टिकोनातून जगाकडे पाहतो. यामुळे कादंबरीला एकसूत्रीपणा येतो. या त-हेच्या निवेदनामुळे 'धिंगाणा' या कादंबरीमध्ये चेअरमनचा दृष्टिकोनच त्याच्या सर्व मित्रमंडळींवर प्रभाव दिसतो. कादंबरीत चेअरमनच्या मित्रमंडळी पैकी कुणीही तसेच गावातील राजकारणी भ्रष्ट मंडळी आपल्या समोर येतात. ती फक्त चेअरमन आणि त्यांच्या मित्रमंडळींच्या दृष्टीकोनातून त्यामुळे त्यांच्या द्वारे या भ्रष्ट राजकारण्याचे झालेले चित्रण हे ही एकाच आवाजात होते.

आत्मनिवेदनपर कादंब-यांचा एक विशेष म्हणजे प्रथमपुरूषी भूमिका-मनोविश्लेषण करण्यासाठी ही पद्धती अत्यंत सोयीची आहे. या पद्धतीमध्ये लेखक एका पात्राशी तादात्म्य कल्पित असल्याने या पात्राच्या मनातील विचारांचे निरनिराळे पदर उलगडून दाखविता येतात. यावेळी एक प्रकारची सहजता आलेली दिसते. उदा. 'कळप' मध्ये निवेदक सांगतो, "मग डोली उचलल्यासारखं उचलून मला घरात नेलं. जाग आली तेव्हा बैलाच्या गोरणीत होतो. किती छान! आपण जनावरांच्या गोटयात आलो. इथं महाजनही असणार नाही आणि सनमाडीकरही. मान्याच्या दारू दुकानात माझं ढोसणं सुरू होतं. बाप्या घामाघूम होऊन आला. एकदम म्हणाला, दादा कोतोलीकरन आत्महत्या केली. चल लवकर. प्रेत तुझ्या आणि शंकर साळोखेच्या ताब्यात द्या. असं त्यानं चिठ्ठीत लिहून ठेवलंय. च्याआयला, जातानाही यानं आपल्याला कर्जातच ठेवलं. एकदम अंग गारगार पडत चाललं. बाप्या काय बडबडतोय कळत नव्हतं. सगळं गरागर फिरत होतं, आणि मध्ये मी.बाप्या मला ढकलून नेत होता. तोही माझ्या भोवती पंख्यासारखा गरगरत होता." (पृ. ३९४)

पात्रमुखी निवेदनपद्धती हा आत्मनिवेदनपर पद्धतीचा म्हणजेच प्रथम पुरूषी निवेदनाचा एक प्रकार आहे. यामध्ये लेखक कादंबरीतील एकाच पात्राशी एकावेळेस या क्रमाने सर्व पात्रांशी तादात्म्य पावू शकतो.

पात्रमुखी निवेदन पद्धतीमध्ये कथानकातील विविध पात्रांची मनोदशा जास्त स्पष्ट होते. त्यामुळे मनोविश्लेषणासाठी ही पद्धती वापरली जाते. या पद्धतीमुळे विशिष्ट घटनांमुळे

भिन्नभिन्न पात्रांच्या प्रतिक्रिया काय झाल्या. त्यांच्या भावना कशा जागृत झाल्या हे अधिक परिणामकारकतेने दाखवता येते. पात्रांच्या वर्णनावर आणि स्वभाव वैशिष्टयावर ही अधिक प्रकाश पडतो. आत्मनिवेदनपर व पात्रमुखी या दोन्ही निवेदनपद्धती. उदा. 'कळप' मध्ये रघू सांगतो. "मग आम्ही हॉटेलात गेलो. बसल्या बसल्या सुरेश प्राध्यापक म्हणाला, तू आणि दिलावर मला आता टाळत आहात. कारण काय ? मी म्हणालो, तुझ्या सॉरी तुमच्यासारख्या मोठया माणसाला भेटून तरी काय उपयोग ? उलट त्रासच तुला सॉरी तुम्हाला ! हे तू काय लावलायेस तू सॉरी तुम्ही. चेष्टेलाही काही मर्यादा असते. सरळसरळ तूच का म्हणत नाहीस. खाजगीत कशाला पाहिजे आहे – जाहो ? कॉलेजात, रस्त्यात, चार–चौघात ते ठीक आहे. पण इथं कशाला ? इथंच तुझं आमचं जमत नाही. त्यामुळं तुला भेटणंही बोअर वाटतं. चार–चौघात एक, खाजगीत एक हा दुटप्पी व्यवहार आपल्याला जमत नाही." (पृ.२९७, २९८)

तृतीयपुरूषी किंवा अन्य पुरूषी भूमिकेमध्ये लेखक कथानकामध्ये स्वत:चा कोठलाही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष असा संबंध ठेवत नाही. तो फक्त साक्षीभूत त्रयस्थाची भूमिका घेऊन कथानक सांगत असतो.

श्री. बापट आणि गोडबोले यांनी "त्यामध्ये ही वर्गीकरण करून 'वैहायस' आणि 'दृश्यात्मक' या पद्धती सांगितल्या आहेत." (३४) एखाद्याने कोणतीही गोष्ट सांगणे आणि आपण ती प्रत्यक्षात पाहणे, यामध्ये जो फरक आहे, तोच फरक 'वैहायस' आणि 'दृश्यात्मक' पद्धतीमध्ये आहे. 'वैहायस' मध्ये गतकालात झालेल्या घटनांचे विहंगावलोकन पद्धतीने कथन असते तर 'दृश्यात्मक' मध्ये त्या घटना जणू प्रत्यक्ष आपल्यासमोर घडत आहेत. अशा पद्धतीचे वर्णन केलेले असते.

'वैहायस' पद्धतीमध्ये लेखक अनेकवेळा फक्त पात्रांचा परिचय वाचकांना करून देऊन थांबत नाही, तर कादंबरीला योग्य असे वातावरण निर्माण करून कथानकाची दिशा वाचकांना दाखवत जातो. उदा. 'भंडारभोग' मध्ये निवेदक तायाप्पाबद्दल सांगत असतो. "त्याला पुन्हा मघाच्या स्वप्नाची आठवण झाली. त्यातली देववाली म्हातारी बी अशीच

होती - असं वाटून त्यानं डोळे मिटलं. गच्च अंधाराची वर्तुळ त्याच्या डोळ्यांसमोरून सरकू लागली. काय घडतंय हे त्याचं त्यालाही कळेना. तो तसाच बसून राहिला. आणि त्याला एकदम आठवलं - इचलकरंजीच्या मागावर काम करतानां एकदा आसंच झालं आणि आपण घेरी येऊन पडलो - त्याची त्याला भीती वाटू लागली. त्यानं डोळं उघडलं. समोरच्या फिक्क ट प्रकाश त्याला कसातरीच वाटू लागला. त्यानं गल्लीकडचं तोंड सोप्याकडं वळवलं. तो मदघराच्या चौकटीवर नजर रूतवून बसला. पाठीमागनं कुणाची तरी पावलं वाजली. त्यानं मान वळवून बघितलं. बाबा हातात कसलं तरी पिसवाट घेऊन दारात उभा होता." (पृ. १२)

'दृश्यात्मक' मध्ये निवेदन नसून लेखक स्वत: वाचकांना माहिती सांगण्याऐवजी विविध प्रसंगाच्या संगतीने वाचकांच्या डोळ्यापुढे दृश्य उभे करून त्यांना जी माहिती हवी ती घेण्याचे काम वाचकांवर सोपवतो. उदा. 'तणकट' मध्ये निवेदक सांगतो, "तक्क्याजवळ बसलेली तीन-चार कुत्री ढगामुळं अंधारल्यानंतर काचबारून उठली. कान फडफडत इकडं-तिकडं बघाय लागली. त्यांनाही त्या ढगाचं आश्चर्यच वाटल असावं. त्यातलं एक कुत्रं कबीरच्या दिशेनं अंग ताणून आळोखे पिळोखे देऊन त्याच्या पायाला अंग घासू लागलं. कबीर आश्चर्यानं त्याच्याकडं बघत उभा राहिला. बराच वेळ. मग अचानक ढग सरकत सरकत गावच्या गावंदरी वरनं जळकीच्या वडयाकडं सरकला. म्हारवाडयात फेक्क उजेड पडला. कबीरला मोकळं मोकळं वाटलं. तो जागचं हालला. खोपटात जाऊन त्यानं खुटयाला बांधलेली शेळी सोडली. शेळी धडपडून उठली. तिनं अंग झिंजाडलं आणि दोरीला वड बसायच्या आत खोपटाच्या बाहेर आली. कसं कळतं या मुक्या जनावरांना ? आपल्या मनातलं पटकन त्यांच्याप्रत पोहचतं. लगोलग जाग्यावरनं हालतात. सवयीनं होत असेल का हे सारं ? कबीरनं खोपटाचं दार लावून घेतलं. दार कसलं ? उभा केलेलं पत्र्याचं पान. कुलूप लावायला तो विसरला नाही. कशाला लावायचं कुलूप ? काय घेऊन जाणार आपल्या खोपटातून कोण ? चार गाडगी आणि फाटकी कापडं. जमवलेलं खिडूकमिडूक आणि चोरानं यायचंच ठरवलं तर खोपटाच्या दाराकडं यायची गरजच नाही.

खोपटाला तुरकाटयाचा कुड. जरा जरी हिसकाहिसकी केली तरी आख्खं खोपाट उघडं होऊन पडेल. मग कशाला या कुलपाचा खटाटोप ? त्याचं त्यालाच हसू आलं." (पृ.८)

अशाप्रकारे या पद्धतीमुळे कथानकाचा विकास आपल्याला कळतो. वैहायस पद्धतीच्या कादंब-यांमध्ये कथानकाचा विकास निवेदनाच्या रूपाने दाखविला जातो. उदा. 'चौंडकं' मध्ये "हळूहळू घरातलं एकएक माणूस कमी होत गेलं. आयाबायांनी आपापलं घर गाठलं. कोण चुकचुकत होतं, कोण सुबनाच्या हेकेखोरपणाला शिव्या देत होत. बायजा आपल्या संसाराचं कसं व्हणार, ह्याच विचारात गुतपळून गेलती, म्हातारी अजूनबी बार भरूनच बसलीती. अशातच शेणाची बुट्टी घेऊन सुली दारात आली. आई खोपडा घेऊन बसल्याली बघितल्यावर तिला कसंसंच वाटलं. आज काय तरी घरात भिनसलंय, हे तिनं मनातल्या मनात ओळखलं. तिला काय करावं सुचना. चौकटीला गच्च धरून फक्त उभी -हायली. म्हातारी अजूनबी फुरफुरतच होती. बायजाची गुडघ्यातली मान गुडघ्यातच होती. सुबाना कपाळाला सतरा आठया पाडून तंबाखू मळत होता. सुलीला जास्त काळ गप्प बसावं असं वाटेना. तिनं हळूच पाय उचलला." (पृ.१७) या निवेदनामुळे घरातील माणसांच्या घटनेवरील सूक्ष्म मानस प्रतिक्रिया लेखक आपल्या समोर प्रकट करीत पुढील घटनाप्रसंगाच्या दिशेने निवेदनाची वाटचाल सुरू होते.

श्री हरिश्चंद्र थोरात निवेदकाबद्दल लिहितात, "कथाबाह्य निवेदक हा प्राचीन काळापासूनच्या कथनपरंपरेने जोपासलेला पारंपरिक निवेदक आहे. तो कथेमध्ये घडणा-या घटनांचे निवेदन कथेबाहेरून करतो. कथांतर्गत निवेदकावर येणा-या मर्यादांपासून तो मुक्त असतो. तो कोठेही जाऊ शकतो. त्याला हव्या त्या पात्राच्या मनात तो उतरू शकतो ; हवे असेल तर कोठल्याही पात्राच्या मनात न उतरता त्यांचे बाहेरून चित्रणही करू शकतो. भोवतालच्या जगाकडे तो परमेश्वरासारखा पाहू शकतो. त्याच्यामध्ये अशाप्रकारे सर्वसाक्षी होण्याच्या क्षमता असतात." (३५)

आपले आशयविश्व प्रकट करण्यासाठी प्रगट करण्यासाठी लेखक अनेक निवेदन पद्धतींचा वापर करीत असतो. उदा. 'चौंडकं' मध्ये तृतीयपुरूषी निवेदन पद्धतीचा वापर

करणारे गवस प्रथमपुरूषी निवेदनाचा ही उपयोग करून आपला आशय प्रकट करताना दिसतात. उदा. 'चौंडकं' मध्ये, "आता कुठं गावाची एक गल्ली संपलीती. अजून सुबाना पोटयाचा खोपडा, वरची गल्ली, मधली गल्ली तश्याच व्हत्या. घर-बार कराव याचं तिच्या जिवावर आलतं. आता फक्त मधली गल्ली तेवढी सापवावी. असं ठरवून ती मधल्या गल्लीत वळली. उन्हं दाट होत आलती. गल्लीत फिरणा-या पोरांची संख्या कमी झालती. सुलीला घामाचं थेंब कपाळावर जमा झाल्यागत वाटलं. तिनं घाम निरीपला. आजूबाजूला बघितलं. एखाद-दुसरा बापयं हिकडं-तिकडं करालता, तेवढाच तिनं सुबाना पोठयाच्या दारात पाय टाकला, जोगवा बाहेर आला. तिनं काढता पाय घेतला." (पृ. ६९)

'चौंडकं' या कादंबरीमध्ये निवेदन तृतीयपुरूषी असून त्यातील मुख्य व्यक्तिरेखा 'सुली' ही आहे. बायजा, सुबाना, म्हातारी, बबन्या यांच्या स्वभावचित्रणातून निवेदकाने 'सुली' चे व्यक्तिचित्रण अधिक परिणामकारक, सूक्ष्म सखोल असे केले आहे. त्यात आक्कु जोगतीण, शेवंता जोगतीण, तानू जोगतीण, फुला यांच्या उल्लेखातून 'सुली' चे व्यक्तिचित्रण स्वाभाविक असे झालेले आहे. उदा. 'न्हाणीत उतरल्या उतरल्या सुलीला रडावं असं वाटाय लागलं, पण मावशीच्या समोर रडायचं म्हणजे तिला कसंतरीच वाटाय लागलं. तिनं मन घट्ट केलं. हळूहळू पाण्याचा तांब्या आपल्याच हातात कसा येईल त्यासाठी कलागत सुरू केली. बायजाला भलतीच गम्मत वाटायेला लागली. काही आपण पाणी घालताना कधी गुमान पाणी न्हाली न्हाई आणि आजच तिला कसं गोड वाटाय लागलं. तिनं त्यातनंबी सुलीला डिवचलं.

"आज मावशीच्या हातचं पाणी म्हणून गोड लगलंय व्हय गं मैने ऽऽ. सुलीला हसू आलं, पण हसता हसताच तिनं आईला दात झपकून यडवान दाखवलं. मावशीला हसू आलं. तिनं हसता हसताच तिच्या डोक्यावर तीन-चार तांबे रिकामे केले. सुलीला लईलई बरं वाटलं, डोक्यातली भगभग थांबल्यागत वाटाय लागलं. तिनं मावशीजवळ पुन्हा हट्ट धरला. मावशीनं तिच्या केसातून हात फिरवताच पाण्याचा तांब्या मोकळा केला". (पृ.२०) येथे सुलीच्या मनात होणारे बदल, मनातील खळबळ आणि तिचे अजाणतेपण हे दोन्ही

दाखविण्यासाठी लेखकाने तृतीयपुरूषी निवेदन पद्धतीचा वापर केलेला आहे.

या कादंबरीमध्ये निवेदक त्रयस्थाची भूमिका घेऊन निवेदन करत असतो. हा निवेदक सुलीच्या मनाची स्थिती सांगताना, "तळं शांत होतं, कुठंच कशाची हालचाल नव्हती. आभाळाचं दिसणारं पाण्यातलं रूप ख-या आभाळापेक्षा भलतंच गोड वाटलतं. काठावरच्या बाभळीच्या झाडांच्या सावळ्या पाण्यात हळूवार वा-यानं सुद्धा हेलकावाय लागल्यात्या. आख्या तळ्यातलं पाणी संथ वलयांकित होऊन सुलीला निरखत बसलतं. सुलीला कशाचीच जाणीव नव्हती. कव्वा एकदा ह्यो ढीग आटपतोय असं तिला झालंतं. पायाला ढसणा-या चिंगळ्या मसळ्यासुद्धा तिला जाणवेनाशा झालत्या. ती तिच्याच तालात एक एक मळका पिळा काढून काढालती. मळीचा पाट दगडाभोत्यानं पाण्यात मिसळलाता." (पृ.१००) असे वर्णन करतो.

त्याच प्रमाणे 'भंडारभोग' मध्ये लेखक तृतीयपुरूषी निवेदक 'तायाप्पा' या मुख्य व्यक्तिरेखेच्या आसपासचे चित्रण करत असून जोगत्यांच्या या पंथातल्या पद्धती अनिष्ट गोष्टींच्या चित्रणावर अधिक भर दिलेला असून या पंथाचे सामूहिक पातळीवर जगण्याचे चित्रण केलेले आहे. उदा. "जोगळ भावीवरचं सगळं आटपून डोंगराच्या वाटला लागायला दिवस डोक्यावर आला. सगळ्यांच्याच पोटात कलकल सुरू झाली. वाटंवरच्या दुकानातनं कायबाय मिळंल ते विकत घेवून बाकनायला सुरवात झालती. तायाप्पाला पेकाळल्यागत झालतं. भूक लागून लागून आतडी आळलीती. चालायचं म्हणजे त्याच्या जीवावरं आलतं. पण मध्येच कोणीतरी उदं गऽऽ आई उदंऽऽ म्हणायचं आणि त्या आवाजासरशी अंगातली मरगळ निघून जायची. चालायचा हुरूप यायचा. शेवन्ताक्क ा आणि तानू सुतारीण सगळ्यांच्या पुढे पळायला लागल्यात्या. सगळ्या बायका त्यांच्याकडं टकामका बघाय लागल्या होत्या. काय म्हणायला पारव्वाचा पाऊल तेवढाच मागंमागं रेंगाळाय लागलाता. या मिळपात आता अनेक गावची माणसं होऊन मिसळलिती. रस्त्याच्या ज्या बाजूनं वाट मिळंल त्या बाजूनं माणसं पुढं सरकत होती. दोन्ही बाजूला भिका-यांनी तर हैदोस घातला. कुणी पुखन घेवून मुंडकं वर ठेवलंतं, कुणी हात बाहेर ठेवलाता. कोण तसाच उपडा

पडलाता. कुणी लुळ्या पोराला रस्त्यावरच सोपवलंतं. तायाप्पाच्या डोळ्यांना सगळंच इपरीत वाटाय लागलंतं." (पृ. ४६)

'भंडारभोग' मध्ये तायाप्पा हा एका लहानशा खेडयात राहणारा, शेतकरी कुटुंबातील मुलगा आहे. त्याच्या सतत चालणा-या आजारपणामुळे त्याची आई कल्लव्वाछी त्याला हाल्लमी देवीच्या पायाशी सोडण्यास तयार होते. त्यावेळी संयुक्त कुटुंबात राहणा-या तायाप्पाचे वडिल, काका मात्र त्याचा विरोध करत असतात. तसेच त्याची आत्याही दुस-या जोगतिणींकडे जाऊन त्याला जोगते होण्याचे टाळण्याचे प्रयत्न करत असते. परंतु तायाप्पाची आई कल्लव्वा हिच्या मतानुसार तायाप्पाला जोगता केले जाते आणि त्यानंतर मात्र घरातील, गावातील लोकांची त्याच्याकडे बघण्याची दृष्टीच बदलून जाते.

महेंद्र सुदाम कदम लिहितात," 'तणकट' या कादंबरीमध्ये काही केंद्रवर्ती व्यक्तिरेखांचा स्वत:चा आत्मशोध आणि निवेदकाचा समूहाचा शोध घेता घेता संपूर्ण गावाचा आणि हळूहळू समाजाचा म्हणजेच जीवनशोध घेण्याचा प्रवास यामुळे कादंबरीला आत्मशोध आणि जीवनशोध असे दुहेरी परिमाण प्राप्त झाल्याने कादंबरीतील वास्तव प्रत्यक्ष वास्तवा सारखे भासत असूनही त्यातील कलात्मकता उणावली नाही." (३६) त्याला कारण 'तणकट' मध्ये आलेले पुढील प्रकारचे वर्णन आहे. निवेदक सांगतो,"करीला बांधायसाठी भरमूनानानं घरच्या गाईच्या पाडयाची निवड केली होती. गेली दोन महिने घराच्या गोठयात अंधारी खोली करून त्याला भरडा सुरू केला होता. गावात करीची मानकरी पाच खुटाणी. त्यात जगदाळे, राणे, देसाई आणि पाटलांची दोन घरं. त्यामुळं आलटून पालटून या पाच घरातच करीचा बैल बांधला जायचा. आणि गावातल्या इतर लोकांच्या दृष्टीनं तेच फायद्याचं होतं. नाही म्हटलं तरी दोन महिने बैल बांधायचा म्हणजे त्याला हरहुन्नरी खाद घालायला लागायची. हारभ-यापासून ते जुंधळाच्या खिचडीपर्यंत त्याला नाना प्रकारची खाद जगदाळे, राणे, देसाई आणि पाटलानांच परवडणारी होती. गरीबाला हे सोसण्यातलं काम नव्हतं आणि पुन्हा बेंदरादिवशी दोन-तीन हजाराचा खर्च

म्हणजे कंबारडं मोडायचंच काम होतं पण ही पाच घर हौशेनं बैल बांधायची आणि हात सैल सोडून खर्च करायची. त्यामुळं चार खेडयातले लोक बेंदरादिवशी फक्त कर बघायला यायचे." (पृ.१६२) कादंबरीतला हा निवेदक गावगाडयातील इतर बलुतेदार त्यांची मानसिकता, मराठयांमध्ये असलेली भाऊबंदकी, गावात चालणारे जातीचे राजकारण आणि निसर्गाचा गावावर होणारा परिणाम अशा अनेक बाबतीत शोध घेताना दिसतो. उदा. 'तणकट' मध्ये निवेदक सांगतो, "शेडबाळ्या लेकावळ्याचा. त्यात त्याचा लोकावळा कुणब्याचा म्हणजे अधिक खालच्या पायरीचा. डंग्या मारूतीनं त्याच्या कडूपणाची वाच्यता केल्यावर सगळ्यांनीच तोंड मोकळं करायला सुरवात केली. तसा मिसाळाचा आप्पया जोग्यावरच वळवळाय लागला. हे आक्का राणेच्या मुरब्बी नजरेतून सुटलं नाही. तो एकदम खेसकला." (पृ.४३)

श्री हरिश्चंद्र थोरात यांनी सांगितल्याप्रमाणे दृष्टिक्षेत्र नियंत्रक पात्राची योजना या कादंब-यांमध्ये आपण पाहू शकतो. या कादंब-यांमध्ये एकापेक्षा अधिक दृष्टिक्षेत्र नियंत्रक पात्रे असल्याने प्रत्येक पात्राला स्वतंत्र भाषिक अवकाश मिळालेला असतो. या विशिष्ट भाषिक अवकाशात निवेदक फक्त विशिष्ट पात्रांच्या मनात उतरतो. या पात्राला जे दिसेल तेच पाहतो. हा भाविक अवकाश दीर्घ असून तो संपला की मग दुसरे पात्र दृष्टिक्षेत्र नियंत्रक म्हणून पुढे येते. यामुळे दृष्टिक्षेत्र नियंत्रक पात्राची जाणिवेचे स्वरूप सांगत असतात. उदा. 'चौंडकं' मध्ये सुली विचार करते, "..... आजीला आजार आला नसता तर ह्यो भोग तरी चुकला असता. करमाचा भोग हाय, त्येला आजी तरी काय करील....... ! न्हाई खरं सगळ्याचं कारण माझ्यावर कसं येतं. हिटणीच्या देववालीला माझ्याशिवाय कोण दिसतच नसंल........... असू दे तिकडं माझं माझ्या संगऽऽ म्हातारी झटक्यासरशी गेली असती तर ..........." (पृ.७०)

कथानकाच्या प्रारंभी कथाबाह्य निवेदक हा बाहेरून मुख्य पात्राकडे पहात असतो. कुठले तरी निसर्गदृश्य किंवा घटना थोडक्यात सांगितली जाते. त्यानंतर मात्र हा निवेदक दृष्टिक्षेत्र नियंत्रक पात्राच्या दृष्टिकोनातून सर्वत्र पाहू लागतो, वावरू लागतो, इतकेच नाही

तर त्या पात्राच्या मनात उतरून गेल्याने यापुढे आलेल्या निवेदनात दृष्टिक्षेत्र नियंत्रक पात्राच्या जाणिवा व्यक्त होतात. राजन गवस यांनी अनेक कादंब-यात दृष्टिक्षेप नियंत्रकाचा वापर केलेला आहे. उदा. 'तणकट' मध्ये "एक गडद काळा ढग गावच्या चावडीवर आला. नंतर तो सरकत सरकत म्हरोडयावर स्थिर झाला. एकदम अंधारले. हवेत उष्मा नव्हता. वा-याला नेहमी सारखीच संथ गती होती. पाऊस पडेल अशी शक्यताही नव्हती. ढग जागच्या जाग्याला स्थिरच. कबीरला ढगाकडे बघता बघताच गम्मत वाटाय लागली. कधीकधी असं होतं. ढग अचानक जमा होतात. सगळीकडून काळवंडून येतं. पाऊस तर पडत नाहीच. पण काहीवेळा फक्क उजेड. कशाचंच नामोनिशान उरत नाही. कबीरनं बसलेली जागा सोडली." (पृ.७)

निवेदनाचा दुसरा प्रकार म्हणजे प्रथमपुरूषी निवेदन. यामध्ये कथानकातील पात्रच कथानक सांगण्याचे कार्य करते. ज्याला 'कथांतर्गत निवेदक' ही म्हणतात. अशा कादंब-यांमध्ये आत्मनिवेदनपर निवेदन असते. या निवेदनाचे वैशिष्टय म्हणजे या कृतीतील मुख्य पात्रच स्वत: निवेदन करत असते. कथानकात घडणा-या प्रत्येक गोष्टीकडे स्वत:च्या दृष्टिकोणातून पाहत असते. यातूनच ज्याला जे दिसते, जाणवते, त्याचा शोध घेऊन निवेदन करत असते. आत्मनिवेदनपर कादंबरीतील मुख्य पात्र हे लेखकाच्या लेखन कौशल्याची निर्मिती असते. उदा. 'धिंगाणा' मध्ये, "आमचा बाप मला उपकाराखातर जेवाय घालतो. हा त्याचा समज. बापाचा हा समज मी दहवीला असल्यापासूनचा. तेव्हापासून त्याला सारखं वाटतं. मला खायला घातलेली खाद फुकटच गेली. त्याचं म्हणणं कदाचित खरं ही असेल. पण माझ्या सारखंच पक्या आणि बाळ्या बाबत मात्र नाही. ते त्याचे लाडके. बाळ्या तर आता नोकरी लागल्यापासून बापासारखीच समजूत करून आहे. बोलत नाही. पण त्यालाही वाटतं, आपण मिळवतो. हा वळूसारखा फिरून खातो. त्याचं म्हणणं खोटं नाही. मी फिरून खातो. पण वळूसारखं फिरून खातो, हे काय म्हणणं झालं ?" (पृ.१) हे चेअरमन (संग्या) चे निवेदन आहे.

'कळप' मध्ये रघू हे मुख्यपात्र निवेदक म्हणून येते. रघू माध्यमिक शाळेत शिकत

असतानाच लेखन करत असतो. लेखनात त्याला तेव्हा पासूनच रस असतो. पुढे कॉलेज विश्वातील अनुभव सांगत असताना, त्याच्याभोवतीचे शैक्षणिक, सामाजिक, वाङ्मयीन वातावरण त्याच्या निवेदनातून प्रकट होते. वाङ्मयात रस घैणारे अध्यापक, देवदासी पुनर्वसन करणारे कार्यकर्ते, सहकारी पतसंस्था, ग्रामीण साहित्य चळवळ, काव्यवाचन, वाङ्मयाचे चर्चासत्र, जिल्हा स्तरावर चालणा-या साहित्य संस्था, संमेलने यात दिसणारा दांभिकपणा, खोटेपणा, प्रसिद्धीचा सोस इ. अनेक गोष्टी निवेदनातून वाचकांसमोर येतात.

त्याच बरोबर शैक्षणिक संस्थांमध्ये चालणारे गैरव्यवहार, नेत्यांचे हितसंबंध, सामाजिक चळवळी करणा-या ख-या कार्यकर्त्यांची मानसिकता, राजकीय श्रेय घेण्याची घोसरवाडकर सारख्या नेत्याची हुशारी, व्याख्यानाला येणारे लेखक, कवी यांचे मनस्वी वर्तन, पुस्तक प्रकाशकांची बनवाबनवी, सुरेश सारखे अध्यापक, स्वत:च्या खर्चाने स्वत:च्या कादंबरीवर चर्चासत्र घडवून आणण्याचा प्रसंग इ. अनेक बाबीतून रघू त्यातला खोटारडेपणा, दांभिकपणा दाखवत निवेदन करत असतो. तेथे हंबीरराव महागावकर सरकार यांचा दिलदारपणा, मोठेपणाही रघू तपशीलवार सांगत असतो.

कथानकात निवेदक वाचकांशी बोलत असतो. तसा स्वत:शीही वारंवार बोलत असतो. या कादंब-यांमधील निवेदक आत्मनिष्ठ असून, समाजातील दोष, भ्रष्टता दाखवत जाण्याचे सामर्थ्य बाळगत असतो. उदा. 'कळप' मध्ये रघू हा निवेदक विचार करतो, "वास्तविक मी चळवळ, लेखन, वाङ्मयीन चळवळ, तात्त्विकता, नैतिकता असल्या फालतू लफडयात पडायलाच नको होते, मीही माझा एक कळप केला असता तर दादाला विसरू शकलो असतो. महात्म्याला वंदन केलं असतं. पानक्याचा शिष्य झालो असतो. च्यायला चुकलंच ! जाऊ द्या. घडलं ते घडून गेलं. पण माझ्या मेंदूला कायमचंच भगदाड पडलं, पण हे फक्त माझ्याबाबत घडलं का माझ्या पिढीबाबत हे सांगणं मात्र कठिणच." (पृ.३९५)

हे सर्व प्रकट होत असतानाच त्याच्या त्यामागील नैतिक भूमिकेचा दृष्टिकोनही व्यक्त होत असतो. प्रथमपुरूषी एकवचनी निवेदनाला कथांतर्गत निवेदकाचा आधार असल्याने तो

एकाच वेळेला बाह्यवास्तव दर्शविण्याचे काम करीत असतो, तसेच बाह्यवास्तव व आपण यांच्या मानसिक क्रियाप्रतिक्रिया दाखवणे ही त्याला शक्य होते. अनेकवेळेला हा कथांतर्गत निवेदक त्याच्या खोलवरचे मानसिक चलनवलन, विविध भावावस्थ अथवा जाणीवनेणीव पातळीवरील तरलतेलाही प्रकट करू शकतो. उदा. 'कळप' मध्ये हंबीरराव महागावकर यांच्याबरोबर रघू ही शिकारीला जातो. त्या प्रसंगी, "मागचा म्हातारा उतरून पुढं येत म्हणाला, ह्या हितं पाण्याला वागाट आल्तं. सरकार ह्या हितं वर झाडावर बसलंतं. भगटाय आल्तं म्हणा की. बॅटरी टाकली. जनावर गदबाळलं. तवाच मालकांनी बार टाकला ............ म्हातारा गोष्टीत रमलेला तर सरकार भूतकाळात. मी ह्या जागी त्याकाळी किर्र झाडी असताना अंधारात काय वाटत असेल ह्याची कल्पना करत. तर एकदम झाडांच्या झुंडीच माझ्या अंगावर येताहेत असं वाटाय लागलं." (पृ.३०४-३०५) निवेदन पाहू शकतो.

कादंब-यांमध्ये पात्रे बोलत असतात. ते वाचकांसमोर संवादाच्या स्वरूपात येते. या पात्रांच्या संवादाच्यावेळी निवेदक थोडासा बाजूला झालेला दिसतो. उदा. 'चौंडकं' मध्ये निवेदक सांगतो, "कोण कायच बोललं नाही, म्हातारी आपली आपल्याच विचारात गुतपाळली... अवघाडतय कुटलं... हे देवाधरमाचंच कायंतरी असाय पायजे. न्हाईतर असा एकाएकी बावटा कसा दुखावलं. तोबी सुलीची केसं इंचरतानं ? हेच्यात काय तरी आसंलच. त्या एवढया देवरश्यांनी सांगितलं ते काय खोटं आसंल .... दुखतोय तो दुखतो, तेबी रात्रीचंच कसं.....ऽऽ' म्हातारी आपल्याच विचारात वाहात गेली. सुबाना ताटावरनं उठला. त्यानं दांडीवरचं घोंगडं वडलं आणि घरशांत झालं." (पृ.५) असे निवेदक सांगतो. येथे लेखक आपले आशयविश्व प्रकट करताना तृतीयपुरूषी निवेदनात निवेदकाची भाषा येते. तेथे प्रथमपुरूषी निवेदन आल्यावर मात्र त्या त्या पात्राच्या तोंडून त्यांच्या बोलीतूनच संवाद आलेले दिसतात. त्यातूनच लेखकाचे आशयविश्व अधिक प्रत्ययकारी होताना दिसते.

कादंबरीतील भाषेचा विचार पुढीलप्रमाणे आहे.

(१) राजन गवस यांच्या, 'चौंडकं' ते 'तणकट' या कादंब-यांमध्ये आलेला अवकाश हा महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरचा आहे. या कादंब-यांमध्ये निवेदकाची भाषा आणि पात्रांची भाषा यामध्ये अंतर दिसून येते. निवेदकाचे प्रमाणभाषेत निवेदन येते आणि पात्रांचे त्यांच्या बोलीभाषेत संवाद येतात. राजन गवस यांनी त्यांच्या कादंब-यांमध्ये बोलीभाषेचा सहज स्वाभाविक वापर योग्य तेथे केल्याने त्या परिसरातील लोकमानस त्यांच्या बोलीभाषेतूनच मांडलेले दिसते. उदा. 'भंडारभोग' मध्ये निवेदक सांगतो, "मघापास्नं आपल्याच तालात असलेली जनाक्का हिकडं-तिकडं बघतच कल्लव्वाजवळ सरकली.

"आता पोराचं कसं हाय ग ऽऽ ?" तिनं आवाज बारीक करतच विचारलं.

"हाय तसंच हाय"

"मदी दवाखाना बघितल्यासा न्हवं ?" कसाळ्याच्या गंगव्वानं मध्येच तोंड घातलं.

"बघितलं खरं काय गुण आला न्हाई...."

"त्ये तसलं काय नसणारच, घे. बाई......... ह्या आदीच जरा हिकडचं तिकडचं बघाय पायजे व्हतं ........" न्हाव्याची जनाक्का विषय वाढवत बोलली." (पृ.२)

तसेच 'कळप' या कादंबरीमध्ये "गणू आजा आणि चारपाच जण पेपरावर उपडी पडलेले. दाबून मुंडकं आत घुसवलं. तर कविता छापून आलेली. गणू आजा म्हणाला, शाब्बास रे ऽऽ हुडगा ऽऽ तुझं नाव छापून आलंय. खरं, वर लिवलास त्येला काय म्हणायचं?" (पृ.४४-४५) ही निवेदक आणि पात्रे यांच्या भाषेत असलेले अंतर दिसून येते. तसेच पात्रांची भाषा ही त्या परिसरातीलच भाषा आहे. हे लक्षात येते.

(२) राजन गवस यांच्या कादंबरीतील अवकाशात वावरणा-या पात्रांचा जगण्याचा अनुभव, प्रत्ययकारिकत्वानं प्रकट होतात, ते भाषिकरूपातून लेखकाचे अनुभवविश्व, आपल्या परिसरातील निरनिराळ्या व्यक्तींच्या जगण्यातील रोजची दैनंदिन व्यवहारातील भाषारूपे, त्यातील जाती, वर्ण, स्तर, लिंग यानुसार प्रकटीकरणाची विविधता या सा-यांचे लेखकाचे सूक्ष्म निरीक्षण सामर्थ्य व वास्तवाचे साहित्यरूपात रूपांतरीकरणाचे तिचे सामर्थ्य यामधून

प्रकट होते. उदा. 'चौंडकं' मध्ये आलेल्या शेतमजूर कुटुंबातील संवाद –"…. सुबाना घरात आला तवा जेवणवकोत झालता. म्हातारीला तेचं हे आसलं वागणं पसंत नव्हतं. त्यानं घरात पाय ठेवल्या ठेवल्या ती ठिसाकली ;

"एवढा उशीर कुठं घरं ववसालतास ऽऽ "

"बसलोतो जरा तात्याच्यात ऽऽ " म्हणतच सुबाना मदघरात गेला. अंगावरचा टावेल दांडीवर टाकला. न्हाणी गाठली हातपाय वल्ल केलं. चुली म्होरं आला. तशी बायजा कातर आवाजातच म्हणाली,

"उद्याच्या आईतवारी जुंधळं आणाय पायजेत ऽऽ "

तवर न्हाईत न्हवं ऽऽ " त्यानं तोंडावरचं पाणी निपचत विचारलं. (पृ.३)

त्यावरून त्या शेतकरी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती त्यांच्या बोलीभाषेतून अधिक प्रभावीपणे दिसून येते. 'तणकट' मध्ये आक्काबा राणे यांची इनामदारी भाषा पुढील संवादातून कळते. आक्काबा राणे सांगतात, "गाव म्हारोडयाच्या राजकारणासाठी सायकल दिलीया म्हणशील तर तसं नाही. तुझं जरा जरा ऐकून हाय म्हणून तुला संशय वाटंल म्हणून सांगतोय. तुझा आजा आमच्या बांधावर मेला. तुझा बा आमच्यात न्हाणाचा मोठा झालंय. म्हणून ही घालोय म्हण वाटलं तर, आनी ह्या वर्षी जोरात आब्यास कर, पुढच्या वर्षी तुझ्या नोकरीचं माझ्याकडं, जा आता !" म्हणत म्हाता–यानं कबीरला दंडाला धरून उठवलं आणि सायकलीजवळ उभा केलं. (पृ. १६०)

(३) राजन गवस यांच्या कादंब–यांमधील काही पात्रांमध्ये बदल घडत गेलेले दिसतात. उदा. 'कळप' मध्ये तांबट नांवाचा रघूचा मित्र आहे. ह्या तांबटची सुरवातीला भाषा पुढीलप्रमाणे असते. एका प्रसंगी रघूला तांबट सांगतो, "तसं न्हाई रं ऽऽ ती त्याची सवय हाय. मान्साचं सवय लाऊन घेण्यावर आस्तंय सगळं. माझंच बघ की, कितीबी ठरीवलं तरी माझी भाषा बदलत न्हाई. लागल्याली सवय. त्यावर काय आवशिद हाय ?" (पृ. १९७) अशी बोलीभाषा बोलणारा तांबट शहरात जाऊन मात्र बदलतो. त्याचा प्रत्यय रघू तांबटच्या पुढील संवादातून येतो."रघू विचारतो, त्याच्या घरी काय आहे ? तो म्हणाला, काय तरी

सरप्रायसिंग आसणार. त्येंच्या ग्रुपचं हे लई मस्त. एकमेकाला सरप्रायिज करतात. त्यातबी गम्मत असते. रिअली, मला त्येंचं त्ये आवडतं.

मला तांबटच हसू यायला लागलं. म्हटलं, तांबटया, तुझा भाषा सुधारण्याचा कार्यक्रम पुढं गेलेला दिसतो. आता बोलता बोलता तू इंग्रजी शब्द बोलाय लागलास." (पृ.२३७)

(४) निवेदनातून दिसणारे वातावरणाचे विशेष –

'भंडारभोग' मध्ये निवेदक सांगतो, "हळूहळू सूर्याची किरणं गडद होऊ लागली. सगळ्या शिवारभर हळद लावल्यागत ऊन पसरलं. रानातली कसली-बसली झाडं कोवळ्या उन्हात भलतीच गोड दिसू लागली. मध्येच एखाद दुसरं पाखरू रानातनं भुर्रकन उडत जाऊ लागलं. रस्त्याच्या कडेनं वाढलेल्या हिरव्यागार पिकावरनं उन्हं घरंगळू लागली. बैलं एका तालात वाट कापत होती. तायाप्पा ब-याच दिवसानं असा रानात आल्यामुळं नवंनवं कायबाय बघितल्यागत सगळं बघत होता." (पृ.१५)

(५) कादंबरीतील अवकाश, पात्रे, व्यक्तिरेखा, वातावरण, व्यक्ती आणि भाषा यांचे आशयाशी अन्योन्य असे नाते भाषिकरूपात दिसून येते. कारण जगणे आणि लिहिणे यात अंतर असू नये या जाणिवेतून लेखननिर्मिती होत असते. 'कळप' मध्ये रघू सांगतो, "एक जोगतिण एक कादंबरी. जोगतिणीचे डोळे एक कविता. जोगतिणीचा देव्हारा एक नाटक.

कशाला वाचायची पुस्तकं ?

फक्त ही माणसं वाचता आली तरी चिक्कर !" (पृ. ५१)

असा साहित्य आणि प्रत्यक्ष जगणं यांचा संबंध रघू सांगतो.

(६) कादंबरीचे निवेदन करण्यासाठी भाषेचाच उपयोग होत असतो. कादंबरीतून जो आशय व्यक्त करायचा असतो तो निवेदनातून, कादंबरीकाराच्या भाषेतून केला जातो. कादंबरीकाराचा असलेला स्वत:चा विशिष्ट भाषेचा वारसा, त्याच्या ह्या भाषेची झालेली घडण, त्याच्या काळात असलेला व्यावहारिक वाङ्मयीन भाषेचा होत असलेला वापर, लहानपणापासून त्याच्यावर झालेले भाषेचे संस्कार या सगळ्यातूनच कादंबरीकाराची भाषा घडत जाते. कादंबरीमध्ये निवेदनासाठी या भाषेचाच उपयोग केला जातो.

## ➢ संदर्भ ग्रंथ टीपा


१) कुलकर्णी मदन-देवदासी:यल्लम्माच्या जोगतिणी-विजय प्रकाशन,नागपूर-आवृत्ती पहिली-१९९४ –पृ.११२

२) मेहता सुनील (संपादक)- मराठी ग्रंथजगत-फेब्रुवारी १९९९-पृ.४२

३) कुलकर्णी मदन- पूर्वोक्त –पृ.१११

४) कानडजे एस.एम.-विशाखा-सप्टेंबर-१९८७-पृ.२८

५) कुलकर्णी मदन- पूर्वोक्त –पृ.१३६

६) घारे दीपक-महाराष्ट्र टाईम्स-२१ मे १९८९-पृ.४

७) कर्वे माधव – केसरी – २६ जून १९८८-पृ.४

८) कुलकर्णी अंजली-सत्याग्रही विचारधारा-जानेवारी १९९९-पृ.६८

९) कदम महेंद्र सुदाम-नवभारत-नोव्हेंबर,डिसेंबर-२००१-पृ.८८

१०) बाबर अशोक- सत्याग्रही विचारधारा-ऑगस्ट १९९९-पृ.६९

११) सरदार गंगाधर बाळकृष्ण –गांधी आणि आंबेडकर-सुगावा प्रकाशन,पुणे-३०-पुनर्मुद्रण २० जुलै२००४ –पृ.९७

१२) बाबर अशोक- पूर्वोक्त –पृ.६९

१३) कदम महेंद्र सुदाम – पूर्वोक्त – पृ.९२

१४) कदम महेंद्र सुदाम – पूर्वोक्त – पृ.९३

१५) देशमुख सदानंद – ललित – फेब्रुवारी २००२ – पृ.२४

१६) ऐनापुरे जी.के. – अनुष्टुभ – जुलै- ऑगस्ट – १९९८ – पृ.६०

१७) भंडारी चंद्रकांत – मुंबई तरूणभारत – २ जानेवारी-२००२

१८) कर्वे माधव – पूर्वोक्त – पृ.४

१९) कर्वे माधव – पूर्वोक्त – पृ.४

२०) कुलकर्णी अंजली – पूर्वोक्त – पृ.६८

२१) कदम महेंद्र सुदाम – पूर्वोक्त – पृ.८८

२२) कदम महेंद्र सुदाम – नवभारत – नोव्हेंबर– डिसेंबर – २००१ – पृ.९३

२३) सानप किशोर – भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी : एक चिकित्सा–साकेत प्रकाशन औरंगाबाद –पहिली आवृत्ती १९९६ – पृ.७५

२४) वडस्कर या.वा. – 'साहित्यातील नायक, प्रतिनायक, व्यस्त नायक व जनवादी नायक'– युगवाणी, नागपूर (दिवाळी अंक) १९८१– पृ. ३६१.

२५) नेमाडे भालचंद्र – टीकास्वयंवर– साकेत प्रकाशन,औरंगाबाद – पहिली आवृत्ती,१९९०–पृ.२२०

२६) हस्तक उषा – कादंबरी आणि मराठी कादंबरी – साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद – पहिली आवृत्ती – १९९३ – पृ.३८

२७) हस्तक उषा – पूर्वोक्त – पृ.४०

२८) हस्तक उषा – पूर्वोक्त – पृ.

२९) थोरात हरिश्चंद्र – अनुष्टुभ – जानेवारी – फेब्रुवारी – २००५ – पृ.३४

३०) सानप किशोर – प्रायोगिक कादंबरी आणि श्याम मनोहर – बजाज पब्लिकेशन्स् – अमरावती – पहिली आवृत्ती – १९९८ – पृ.१४

३१) सानप किशोर – पूर्वोक्त – पृ. १४.

३२) बापट आणि गोडबोले – मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास) व्हीनस प्रकाशन, पुणे – तिसरी आवृत्ती १९७३ – पृ.५४

३३) बापट आणि गोडबोले – पूर्वोक्त – पृ.६८

३४) बापट आणि गोडबोले – पूर्वोक्त – पृ.६८

३५) थोरात हरिश्चंद्र – पूर्वोक्त – पृ.३५

३६) कदम महेंद्र सुदाम – पूर्वोक्त – पृ.९३